# SHABDSANCHAY

# शब्दसंचय


## The Online Journal
## Peer Reviewed and Refereed

## Multidisciplinary Research Journal

**ISSN 3749-0731**

**Issue II, Vol. III**

## March- 2025

**Starting year: 2024**
**Frequency: Monthly**
**Publication Format: Online**
**Subject: Multidisciplinary Subjects**
**Languages: Marathi, Hindi, English and Urdu**



## Chief Editor

## Dr. Ganesh Digambar Saoji



Painganga Publication, Mehkar

**SHABDSANCHAY** शब्दसंचय
**Peer Reviewed and Refereed**
**Multidisciplinary Research Journal**
**ISSN 3049-0731**

**March 2025, Issue II, Vol. III**

**Starting year: 2024**
**Frequency: Monthly**
**Publication Format: Online**
**Subject: Multidisciplinary Subjects**
**Languages: Marathi, Hindi, English and Urdu**

**©Publisher**

Chief Editor
**Dr. Ganesh Digambar Saoji**

**Publishers**
**Painganga Publication, Ram Nagar, Mehkar,**
**Dist.Buldhana, (M.S.), 443301**
Email : paingangaprakashan@gmail.com
Mobile : 9975132211, 9850927424

**Price**
1000/-

---

**Note :** The views and opinions expressed by the authors/researchers in their research papers, which are included in this book, are their own and they are responsible for them. The Editor/Publisheris not responsible for them.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

# EDITORIAL AND REVIEW BOARD

- **CHIEF EDITOR**
- **DR. GANESH DIGAMBAR SAOJI**
  **Post Address : MES Arts And Commerce College, Mehkar, Dist. Buldhana,443301, Maharashtra**
  **Department : Department of Marathi**
  **Contact : 9975132211**
  **Designation : AssitantProfesor,**
  **Faculty : Humanities**
  **Email : drgdsaoji@mesacc.ac.in**
  **https://www.mesacc.ac.in/pdf/profile%20of%20prof_g_d_saoji%20sir.pdf**

- **DR. PRAVIN ANANTRAO JOSHI**
  **Post Address : MES Arts And Commerce College, Mehkar, Dist. Buldhana,443301, Maharashtra**
  **Department : Department of Library and Information Science**
  **Contact : 9850927424**
  **Designation : Assistanr Profesor**
  **Faculty : Library and Information Science**
  **Email : drpajoshi@mesacc.ac.in**
  **https://www.mesacc.ac.in/pdf/Profile%20of%20Dr_P_Joshi%20Sir.pdf**

- **DR. SANJAY MOTIRAM DANDADE**
  **Post Address : MES Arts And Commerce College, Mehkar, Dist. Buldhana,443301, Maharashtra**
  **Department : Department of Economics**
  **Contact : 9422535455**
  **Designation : Profesor**
  **Faculty : Humanities and Social Science**
  **Email : drsmdandade@mesacc.ac.in**
  **https://www.mesacc.ac.in/pdf/Dr_Dandade%20sir%20Personal%20Profile.pdf**

- **DR. ABHAY MADHUKARRAO PATIL**
  **Post Address : MES Arts And Commerce College, Mehkar, Dist. Buldhana,443301, Maharashtra**
  **Department : Department of English**
  **Contact : 8623011073**
  **Designation : Profesor**
  **Faculty : Humanities**
  **Email : drampatil@mesacc.ac.in**
  **https://www.mesacc.ac.in/pdf/Dr_Abhay_Patil_profile.pdf**

- **DR. UDAY SHRIKRUSHNA KALE**
  **Post Address : MES Arts And Commerce College, Mehkar, Dist. Buldhana,443301, Maharashtra**
  **Department : Department of Commerce**
  **Contact : 9422323334**
  **Designation : Profesor**
  **Faculty : Commerce and Management**
  **Email : druskale@mesacc.ac.in**
  **https://www.mesacc.ac.in/pdf/Dr_U_S_Kale%20Profile%20pdf.pdf**

- **DR. WASUDEO DATTATRAY GOLAIT**
  **Post Address : MES Arts And Commerce College, Mehkar, Dist. Buldhana,443301, Maharashtra**
  **Department : Department of Commerce**
  **Contact : 8007291004**
  **Designation : Profesor**
  **Faculty : Commerce and Management**
  **Email : drwdgolait@mesacc.ac.in**
  **https://www.mesacc.ac.in/pdf/Dr_Wasudeo%20Golait%20Profile.pdf**

- **DR. SHRIKRUSHNA WAMAN PADMANE**
  **Post Address : MES Arts And Commerce College, Mehkar, Dist. Buldhana,443301, Maharashtra**
  **Department : Department of Marathi**
  **Contact : 9921872668**
  **Designation : Assistanat Profesor**
  **Faculty : Humanities**
  **Email : Drswpadmane@mesacc.ac.in**
  **https://www.mesacc.ac.in/pdf/Profile%20of%20Dr.S_W_Padmane%20sir.pdf**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

# INDEX


| | | |
|---|---|---|
| 1 | **गुरु ते ग्रंथ: शीख धर्माचा ऐतिहासिक व तात्त्विक प्रवास**<br>डॉ.मंजुश्री श्रीपाद नेव्हल | 01-10 |
| 2 | **गो.पु.देशपांडे यांची प्रायोगिक नाटके**<br>प्रा. डॉ. ललिता मानसिंग गोपाळ | 11-14 |
| 3 | **पंढरपूरची वारी : एक अभ्यास**<br>अंकुश भागवत सोनवणे | 15-23 |
| 4 | **इतिहास लेखनातील नवे प्रवाह**<br>प्रा.डॉ.ओ.म.गजभिये | 24-29 |
| 5 | **"वारकरी संप्रदाय व संत तुकारामांचे तत्वज्ञान"**<br>**लक्ष्मण गजानन गणगे** | 30-39 |
| 6 | **मध्ययुगीन साहित्यातील संत कवयित्रींचे योगदान**<br>**प्रा. मीरा दत्तू गायकवाड** | 40-51 |
| 7 | प्रतिमा इंगोले यांच्या पार्टटाईम मधील शैक्षणिक जीवनजाणीव<br>डॉ. पंढरी डोईफोडे | 52-65 |
| 8 | महात्मा बसवेश्वर यांचे विचार : वैश्विक परीप्रेक्ष्य<br>सायली उमाकांत शेटे | 66-68 |
| 9 | **वैश्विक साहित्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्थान**<br>स्मिता संदेशराव मांडेकर (नागपूरकर) | 69-72 |
| 10 | **मराठी मुस्लीम कादंबरीतील** भाषा<br>**विलास माणिकराव शिंदे** | 73-79 |
| 11 | गुलमोहर.....लाली मेरे लाल की!<br>प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे | 80-84 |
| 12 | वारी<br>बंडोपंत दि. कुलकर्णी | 85-92 |

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

1 .

# गुरु ते ग्रंथ: शीख धर्माचा ऐतिहासिक व तात्त्विक प्रवास

**डॉ.मंजुश्री श्रीपाद नेव्हल**
सहाय्यक प्राध्यापक / शैक्षणिक संयोजक,
बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा आणि भारतीय ज्ञान परंपरा केंद्र
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**सारांश :-**

शीख धर्म हा मानवतेचा धर्म आहे, जो समता, न्याय, आणि सत्याचा प्रचार करतो. गुरुग्रंथसाहिब हा त्याचा अंतिम गुरु आहे आणि तो सर्व धर्म, जाती, आणि लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन मानवतेचा संदेश देतो. श्रम, सेवा, आणि समर्पण या तत्त्वांमुळे शीख धर्माने भारतीय तत्त्वज्ञानात मौलिक योगदान दिले आहे. शीख धर्माच्या दहा गुरुंनी समाजात समता, शिक्षण, धर्मस्वातंत्र्य, आणि आत्मरक्षण यांचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी धार्मिक सुधारणा आणि संघर्ष दोन्ही मार्गांनी शीख समुदायाच्या उभारणीस हातभार लावला. त्यांचा आदर्श आजही शीख धर्माच्या मूल्यांमध्ये दिसून येतो. १६९९ मध्ये बैसाखीच्या दिवशी आनंदपूर साहिब येथे गुरु गोविंदसिंह यांनी खालसा पंथाची स्थापना केली. या वेळी त्यांनी पाच निष्ठावान शिखांना दयासिंह, धर्मसिंह, मोहकमसिंह, साहबसिंह आणि हिम्मतसिंह यांना 'पंच प्यारे' म्हणून गौरविले आणि शीख धर्माचे पाच आवश्यक चिन्हे (पाच ककार) स्वीकारण्याचा आदेश दिला.

श्री गुरुग्रंथसाहिब हा केवळ शीख धर्माचा ग्रंथ नसून संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे. सत्य, समता आणि सेवाभाव यांचा संदेश देणारा हा ग्रंथ आत्मिक उन्नती आणि सामाजिक सुधारणा घडवतो. गुरु ग्रंथ साहिबाची शिकवण भारतीय ज्ञान प्रणालीत महत्त्वपूर्ण स्थान राखते. यात भारतीय तत्त्वज्ञानाशी सुसंगत मूल्ये आणि तत्वज्ञान आहेत. विविध संतांच्या शिकवणींचा समावेश करून सर्वधर्मीय सहिष्णुतेला महत्त्व दिले आहे. सर्व धर्मांच्या तत्त्वज्ञानाचा आदर करण्याचा संदेश दिला आहे. गुरुग्रंथसाहिब ही फक्त शीख धर्माची शिकवण नसून संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक आहे.

**प्रस्तावना:-**

मध्ययुगीन भारतात हिंदू आणि मुस्लिम धर्मीयांमध्ये धार्मिक संघर्ष मोठ्या प्रमाणावर वाढला होता. हिंदू धर्मातील जातिव्यवस्था, अंधश्रद्धा, आणि कर्मकांडांमुळे समाजात मोठा भेदभाव होता. दुसरीकडे, मुस्लिम राजवटीत हिंदूंवर होणारा अत्याचार, जबरदस्तीने धर्मांतर, आणि सामाजिक तणावाने वातावरण अस्थिर झाले होते.गुरु नानकांनी या भेदभावांना विरोध करत एक नवा मार्ग दिला, जो सर्वांना समानतेचा आणि प्रेमाचा संदेश देतो. असा शीख धर्म आपण आजच्या या भागात जाणून घेणार आहोत.

**उद्दिष्ट्ये :-**

- **शीख धर्म म्हणजे काय हे जाणून घेणे.**
- **शीख धर्मातील दहा गुरुंचा ऐतिहासिक परिचय करून घेणे.**

- **शीखधर्मियांच्या केश, कंगा, किरपाण , कडा आणि कच्छ असे पाच चिन्ह धारण करण्याची कारणे, त्याचे आध्यात्मिक महत्त्व जाणणे**
- **गुरुग्रंथसाहेबांची विशेषता आणि शिकवणीचे महत्त्व अभ्यासने.**

**शीख धर्मपरिभाषा:-**

शीख धर्माला "सिखी" किंवा "गुरु मत"असे ही म्हणतात. शीख धर्माची स्थापना 15 व्या शतकात गुरु नानकदेवजी यांनी पंजाब प्रांतात केली. हा धर्म मुख्यतः गुरुग्रंथसाहिब या धार्मिक ग्रंथावर आधारित आहे, जो शीख धर्माचा प्रमुख ग्रंथ आणि आध्यात्मिक मार्गदर्शक मानला जातो.शीख अथवा सिख हा शब्द मूळ संस्कृत मधील "शिष्य" या शब्दावरून आला आहे, ज्याचा अर्थ आहे "शिकणारा" किंवा "विद्यार्थी". शीख म्हणजे असा व्यक्ती जो गुरुंच्या शिकवणीचे अनुकरण करतो आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली अध्यात्मिक, नैतिक, आणि सामाजिक जीवन जगतो.

शीख म्हणजे कोण ? तर

1. शीख तो आहे जो गुरुग्रंथसाहिब या धर्मग्रंथाला अंतिम गुरु मानतो आणि गुरूंच्या शिकवणीनुसार जीवन जगतो.
2. शीख तो आहे जो "एक ओंकार" म्हणजेच एकाच परमेश्वराच्या अस्तित्वावर विश्वास ठेवतो.
3. धार्मिक भेदभाव न करता सर्व मानवजातीला समान मानतो. आणि
4. नाम जपो म्हणजेच ईश्वराचे स्मरण करा., कीरत करो अर्थात प्रामाणिक काम करा, वंड छको म्हणजे मिळालेले इतरांबरोबर वाटून घ्या. या तीन तत्त्वांचे पालन करणारा तो शीख आहे.

   शीख धर्माचे तीन प्रमुख तत्त्वे आहेत:
5. गुरूंच्या शिकवणीनुसार वर्तन करणारा तो शीख आहे.

ईश्वर सिंह ठाकूर म्हणतात - शीखधर्म एकाएकी जन्माला आलेला नसून अनेक सुधारणावादि चळवळी व असंतोष ह्यामधून निघालेला आहे.

शीख धर्माची स्थापना ही एका ऐतिहासिक व आध्यात्मिक गरजेतून झाली होती. 15 व्या शतकात, भारतात सामाजिक, धार्मिक, आणि राजकीय परिस्थिती अस्थिर होती. जातीभेद, धर्मीय कट्टरता, महिलांवर होणारे अत्याचार आणि अंधश्रद्धा यामुळे समाज विभक्त झाला होता. या पार्श्वभूमीवर, गुरु नानकदेवजी यांनी शीख धर्माची स्थापना केली, ज्याचा उद्देश मानवतेचे कल्याण आणि सत्याचा प्रचार करणे हा होता.

गुरु नानकदेवजी यांचा जन्म १४६९ ला पंजाबच्या तलवंडी गावात झाला. हे गाव आता पाकिस्थान मध्ये ननकाना साहिब आहे म्हणून ओळखले जाते. बालपणापासूनच नानकदेवजींना अध्यात्माची आवड होती. ते नेहमी एक प्रश्न विचारायचे:

"जर सर्व माणसे ईश्वराणे निर्माण केलेली आहेत, तर त्यांच्यात जात, धर्म, किंवा वर्गाचा भेद का असावा ?" त्यांचा हा प्रश्नच त्यांच्या जीवनप्रवासाची सुरुवात म्हणावी लागेल.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

एके दिवशी, गुरु नानकदेवजी बेई नदीवर ध्यान करत होते. असे सांगितले जाते की ध्यानात त्यांना दिव्य साक्षात्कार झाला. ते तीन दिवस अदृश्य होते, आणि लोकांना वाटले की ते नदीत बुडाले आहेत. परंतु तीन दिवसांनंतर ते परत आले तेव्हा त्यांचे पहिले शब्द होते: "ना कोई हिंदू, ना कोई मुसलमान।" म्हणजेच न कोणी हिंदू आहे, न कोणी मुसलमान, सर्व माणसे एकाच ईश्वराची निर्मिती आहेत. नानकदेवजींनी समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, आणि धार्मिक कट्टरता यांच्यावर प्रश्न उपस्थित केले. त्यांनी सर्व धर्मांमध्ये समानता आहे असे मानले आणि मानवतेचा संदेश दिला. त्यांच्या प्रवचनांद्वारे नानकदेवजींनी समाजातील अंधश्रद्धा आणि अन्याय यांना विरोध केला.

- त्यांनी हिंदू आणि मुस्लीम दोन्ही धर्मांतील कट्टरपंथीयता दूर करण्याचा प्रयत्न केला.
- महिलांना समान अधिकार मिळावेत यावर भर दिला.
- कर्मकांड आणि पुजाऱ्यांवर अवलंबून राहणे नाकारले.

गुरु नानकदेवजींच्या शिकवणींनी एक नवीन समाज निर्माण केला, जिथे:

- धर्माच्या नावाखाली कोणावरही अत्याचार केला जात नव्हता.
- सर्वांना समानतेने वागवले जात होते.
- मेहनत, प्रामाणिकपणा, आणि सेवा हे त्यांचे मुख्य तत्त्व होते.
- गुरु नानकदेवजींनी अखेरीस "सर्व मानवजात एकाच प्रकाशातून निर्माण झाली आहे. म्हणून कोणताही भेदभाव असता कामा नये." असे सांगितले:

गुरु नानकदेवजींनंतर त्यांचे अनुयायी असलेल्या दहाही गुरूंनी शिकवण वाढवली आणि शेवटी गुरुग्रंथसाहिब या धर्मग्रंथाच्या रूपाने शीख धर्माची शिकवण कायम केली.

**शीख धर्मातील दहा गुरुंचा ऐतिहासिक परिचय**

शीख धर्मातील १० गुरू हे धर्माच्या स्थापनेपासूनच वीर, बलिदानी आणि प्रेरणादायक व्यक्तिमत्व असणारी होती. त्यांचे कार्य फक्त धार्मिक शिकवणी देण्यापर्यंतच मर्यादित नव्हते, तर त्यांनी समाजातील अन्याय, अत्याचार आणि दमनाविरुद्ध आवाज उठवला. प्रत्येक गुरूंचे जीवन किल्ल्यांच्या, युद्धांच्या आणि संघर्षांच्या बाबतीत लढाईचा आणि बलिदानाचा प्रतीक ठरले.

**१.गुरु नानकदेवजी - यांचा कार्यकाळ 1469 ते 1539 पर्यंतचा**

गुरु नानकदेवजी हे शीख धर्माचे संस्थापक आणि पहिले गुरु होते. त्यांच्या जीवनातील प्रमुख संदेश होता "एक ओंकार" अर्थात एक ईश्वर आणि सर्व धर्मांतील समानता. त्यांनी समाजातील जातीभेद, धार्मिक कट्टरता, आणि अंधश्रद्धेचा विरोध केला. त्यांच्या जीवनातील प्रमुख घटना म्हणजे त्यांच्या भटकंतीतून इतर धार्मिक व सामाजिक दुरवस्थांची तपासणी केली गेली आणि सर्वांना समानतेचा संदेश दिला.

**२.गुरु अंगददेवजी - यांचा कार्यकाळ 1504 ते 1552 पर्यंतचा**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

गुरु अंगद देवजी हे गुरु नानकदेवजींचे अनुयायी आणि शीख धर्माचे दुसरे गुरु होते. त्यांनी गुरुमुखी लिपीची रचना केली. शीख धर्माचे लिखाण याच लिपीत लिहिल्या गेले आहे. त्यांनी समाजातील शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी "लंगर" अर्थात सार्वजनिक भोजनाची पद्धत सुरू केली, याचा उद्देश समानता निर्माण करून भेदभाव नष्ट करणे हा होता.

स्वप्राणापेक्षाही गुरूची सेवा श्रेष्ठ मानणारे गुरु अंगददेवजी होते. यांच्या अनेक कथा शीख धर्म साहित्यात येतात. गुरुनानक देव एकदा जिथे आराम करत होते, तिथल्या धर्मशाळेचा स्तंभ वाहून गेला. गुरुअंगददेव हे तो पाऊस संपूर्ण थांबेपर्यंत खांबा प्रमाणे रात्रभर तिथे पावसात उभे राहिले, मात्र आपल्या गुरुनानक देवांची निद्रा भंग होऊ दिली नाही.

पुन्हा एक कथा येते, की काचाच्या खड्ड्यामध्ये गुरुदेवांची कटोरी होती. ही कटोरी वापस आणण्याकरिता गुरू नानकांनी आपल्या सर्व शिष्यांना सांगितले, मात्र कोणीही हे कार्य करायला तयार नव्हते. अशावेळी एकट्या अंगददेवांनी आपल्या गुरुचे कार्य केले. गुरुचे कोणतंही काम करण्याचं सामर्थ्य, इच्छाशक्ती ह्या वैरागी, तपस्वी आणि त्यागी असलेल्या अंगददेवामध्ये होती.

**३.गुरु अमरदासजी - यांचा कार्यकाळ 1479 ते 1574 पर्यंतचा**

गुरु अमरदासजी हे शीख धर्माचे तिसरे गुरु होते. यांनी महिला आणि दलितांना समान अधिकार देण्यावर जोर दिला. यांनी "गोविंदवाल" या जागेवर गुरुद्वारा स्थापन करून तेथे सर्व समुदायांसाठी शालेय शिक्षण, प्रार्थना आणि सामाजिक सेवा सुरू केली. त्यांनी लंगर पद्धतीला अधिक शिस्तबद्ध आणि व्यापक बनवले. अमृतसर वरून हरिद्वारला यांनी 21 वेळा पैदल यात्रा केलेली. याशिवाय यांच्या विषयी सांगितल्या जाते की जेव्हा **गुरु अमरदासजी** त्यांचे गुरु अंगददेव यांच्यासोबत बाहेर जात, तेव्हा ते उलट्या पायाने चालत होते. याचे एकमेव कारण म्हणजे गुरूंना पाठ दाखविली जाऊ नये.

**४.गुरु रामदासजी - यांचा कार्यकाळ 1534 ते 1581 पर्यंतचा**

गुरु रामदासजी हे शीख धर्माचे चौथे गुरु होते. त्यांच्या कार्यात गुरुद्वारा स्थापनेसाठी योगदान आणि धार्मिक अनुशासन महत्त्वाचे होते. त्यांनी अमृतसर शहराची स्थापना केली, जे पुढे शीख धर्माचे पवित्र केंद्र बनले. ते शांततेचे प्रचारक होते, परंतु त्यांनी साम्राज्यवादी अत्याचारांना विरोध केला. वयाच्या सातव्या वर्षी यांनी शीख धर्मीयांना बल आणि संघटन यांचे महत्त्व समजावून दिले.

**५.गुरु अर्जनदेवजी - यांचा कार्यकाळ 1563 ते 1606 पर्यंतचा**

गुरु अर्जनदेवजी हे शीख धर्माचे पाचवे गुरु होते. त्यांना शहिद म्हणून ओळखले जात. त्यांनी गुरु ग्रंथसाहिब या ग्रंथात असलेल्या गुरुमताचे संकलन केले. त्यात विविध संत कवींच्या कविता समाविष्ट केल्यात. त्यांच्या या कार्यावर आणि गुरू ग्रंथसाहिबावर आधारित धार्मिक शिक्षणाच्या प्रसारामुळे मुघल सम्राट जहांगीरने त्यांना शाही अत्याचारांचा सामना करण्यास भाग पाडले होते. गुरु अर्जनदेवजींनी कडवे अत्याचार सहन केले आणि अखेर बलिदान दिले. यांच्या विषयी सांगितले जाते, की गुरु ग्रंथसाहेबची रचना करत होते त्यावेळी कोण्या एका व्यक्तीने बादशाही अकबराकडे तक्रार केली, की गुरु अर्जुनदेवजी हिंदू मुस्लिम धर्माचा अपमान करीत आहे. हे ऐकून बादशहा अकबराने गुरु अर्जुनदेवजींना आणि त्यांच्या लिखाणाला समक्ष

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

उपस्थित करण्याचा आदेश दिला. आता मात्र गुरु अर्जुनदेवजी स्वतः गेले नाहीत. त्यांनी गुरु ग्रंथसाहेबांनाच सैनिकांसह पाठवला. या गुरुग्रंथसाहेबाचे वाचन राजानं दुसऱ्या कोणाकडून करून घेतले. राजाने कोणतेही पान सांगायचं आणि वाचायला लावायच असं चाललं होतं. त्यातली एक पंक्ती होती -

कोई बोले राम राम कोई खुदाई |

कोई से वै गुसाइग्रा कोई अलाहि ||

कारण करू किरिपा धारि रहिम ||

अकबराला ही पंक्ती ऐकूण लोक खोटं सांगत असल्याचे लक्षात आले. हा 'सत् ग्रंथ' आहे म्हणून यासाठी एक्कावन्न अशर्फी बादशहाने भेट दिलीत.

**६.गुरु हरगोविंदजी - यांचा कार्यकाळ 1595 ते 1644 पर्यंतचा**

गुरु हरगोविंदजी हे शीख धर्माचे सहावे गुरु होते आणि त्यांचा कालखंड युद्धाचा आणि संघर्षांचा होता. त्यांनी शीख समुदायाला आध्यात्मिकते बरोबरच शारीरिक संरक्षणाचे महत्त्व शिकवले. गुरु हरगोविंदजीं द्वारपाल म्हणजे दोन्ही हातांनी शस्त्रधारी असणारा म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांनी शीखांना शस्त्र चालवण्याचे शिक्षण दिले. त्यांच्या नेतृत्वाखाली शीख सैन्याने मुघलांच्या अत्याचारांवर प्रतिकार केला. प्रत्येक शीखाच्या हृदयामध्ये वीर रस प्रवाहित होत राहावा म्हणून सकाळ - संध्याकाळ हरिकीर्तनाच्या नंतर लोकांकडून वीर रागाचे गायन करून घेतल्या जात होते. हे ऐकून शीखांचे हृदय निर्भीड, धैर्यवान आणि तेजपुंजाप्रमाणे रहावे. प्रत्येक शीखात अशा शस्त्रांचे संघटना असावे. यासाठी गुरुगोविंदजी सदैव कोणतीही चूक बाकी राहू नये, म्हणून सदैव ते प्रयत्न करत राहत होते.

**७.गुरु हररायजी - यांचा कार्यकाळ 1630 ते 1661 पर्यंतचा**

गुरु हररायजी हे शीख धर्माचे सातवे गुरु आणि शांततेचा प्रचार करणारे होते. त्यांनी निरंतर सत्याचा आणि न्यायाचा पाठपुरावा केला, परंतु त्यांना मुघल सम्राट औरंगजेब याच्या अत्याचारांचा सामना करावा लागला होता. गुरु हररायजींनी रोगप्रतिकारक औषधांची निर्मिती केली आणि समाजात तंत्रज्ञानाचा प्रसार केला.

गुरु हरिरायजी यांच्या कडे एकदा रुस बादशहाच्या वकिलाने शिखांची धार्मिकता, गुरुजींचे राहणीमान पाहिले आणि प्रश्न केला, की सांसारिक कष्टातून बाहेर पडण्याकरिता कोणता पैगंबर मदत करू शकते ? गुरुजी म्हणाले "संकटातून स्वतःचे शुभ कर्मच सोडवु शकते, कारण अवतार आणि पैगंबर हे सुद्धा स्वकर्माचेच फळ आहे".

**८.गुरु हरकिशनजी - यांचा कार्यकाळ 1656 ते 1664 पर्यंतचा**

गुरु हरकिशनजी हे शीख धर्माचे आठवे गुरु होते. त्यांचे जीवन लहान होते, परंतु त्यांनी शस्त्रधारी, शौर्य आणि समर्पणाचे प्रतीक म्हणून काम केले. त्यांना दिल्लीतील प्लेग आणि इतर रोगांच्या प्रसाराशी लढण्याचे कार्य करावे लागले. त्यांच्या काळात त्यांचं कार्य समाजसेवेसाठी आणि दिन-दु:खीतासाठी ओळखलं जात.

**९.गुरु तेगबहादुरजी - यांचा कार्यकाळ 1621 ते 1675 पर्यंतचा**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

गुरु तेगबहादुरजी हे शीख धर्माचे नववे गुरु आणि त्यांचे जीवन बलिदानाचं प्रतीक आहे. त्यांनी हिंदू धर्माच्या संरक्षणासाठी आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या हक्कासाठी प्राणांची आहुती दिली. मुघल सम्राट औरंगजेबने त्यांना धर्म परिवर्तनासाठी दबाव टाकला, पण गुरु तेगबहादुरजींनी त्याचे विरोध करत प्राण त्यागले. त्यांच्या बलिदानाने शीख धर्माची आदर्श शिकवण स्थिर केली.

**१०.गुरु गोविंदसिंगजी - यांचा कार्यकाळ 1666 ते 1708 पर्यंतचा**

गुरु गोविंद सिंगजी हे शीख धर्माचे दहावे गुरु. ते शीख धर्माच्या ऐतिहासिक आणि लढाऊ पद्धतींचे अंतिम प्रतीक होते. त्यांनी खालसा पंथ स्थापन केला. ज्यामध्ये विशिष्ट शारीरिक चिन्हे अर्थात पांच ककार धारण करणे अनिवार्य केले. त्यांनीसुरक्षा आणि आत्मनिर्भरतेचा विचार करीत शीखांना शस्त्रधारी आणि लढाऊ बनवले. गुरु गोविंदसिंगजींनी "जफरनामा" लिहून मुगलांना आव्हान दिले आणि आपल्या जीवनातील अंतिम क्षणापर्यंत लढाईत भाग घेतला. त्यांचे बलिदान आणि नेतृत्व आजही शीख समुदायासाठी प्रेरणादायक आहे.

**शीखांच्या पाच चिन्हाचे महत्त्व**

१५००-१६०० च्या काळात भारतात मोठ्या प्रमाणात उच्चनीच्चतेच्या भेदाने जोर धरला होता. अशावेळी गुरुगोविंद सिंहांनी धारदार तलवार बाहेर काढली आणि उपस्थित असणाऱ्या सर्वांना प्रश्न केला. –

"दुष्ट्यांच्या अत्याचारात भडकणाऱ्या या अग्नीला विजवण्यासाठी, धर्मरक्षणासाठी आणि राष्ट्राला बलिदान करण्यासाठी मला एका मस्तकाची आवश्यकता आहे. असा कोणी शूरवीर आहे का जो आपले मस्तक या तलवारीच्या धारेवर कुर्बान करू शकेल?" गुरुदेवांच्या या प्रश्नाने सभेतील सर्व शीख बांधव आवाक राहिले. एका सिंहहृदयी शीखभाई दयाराम खत्रीने आपले शीर किरपाणाच्या हवाली केले. भाई दयारामचा हात पकडून गुरुजी त्याला तंबूत आत घेऊन गेले. भाई दयाराम आत पोहोचताच तलवारीचा मोठा आवाज झाला आणि रक्ताची लाट प्रवाहित झाली. हे सर्व पाहून उपस्थित असणारे शीख सुन्न झाले. पुन्हा गुरुजींनी तोच प्रश्न उपस्थित केला. तेव्हा हस्तीनापुर निवासी भाई धर्माजात धर्मरक्षणासाठी बलिदान देण्याकरिता तयार झाले. त्यानाही लगेच तंबूत नेले. आता पूर्वीपेक्षा तलवारीचा आवाज अधिकच मोठा झाला होता. रक्ताची धारही मोठी वाहू लागली होती. असं गुरुदेव बऱ्याच वेळपर्यंत करत होते. एक एक करून अनेक शीख आत घेऊन जात होते आणि गुरुजी आपली रक्ताने सळसळणारी तलवार घेऊन पुन्हा पुन्हा विचारत होते. हा गुरुदेव सिंहांच्या परीक्षेचा एक प्रकार होता. ते शीखांना भयभीत करून समाजासमोर आदर्श ठेवत होते की शीखगुरू कुर्बानी देण्यासही तयार होतात. कारण शीख, गुरुनानक देव आणि गुरुगोविंद सिंहांचे अनुयायी आहेत, ज्या मार्गावर गुरु अर्जुनदेव ते गुरु तेकबहादुरही चाललेत. कुर्बानीच्या नावावर आत नेलेल्या पाचही त्या शीखांना गुरुगोविंद सिंहांनी नवीन वस्त्र आणि शस्त्र देऊन तंबूच्या बाहेर आणले.

गुरु गोविंदसिंहानी १६९९ साली बैसाखीच्या दिवशी आनंदपूरसाहिब येथे एक ऐतिहासिक संमेलन आयोजित केले. या संमेलनात त्यांनी शीख समुदायाला एक नवीन मार्ग दाखवला. त्यावेळी, गुरु गोविंदसिंहानी एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आणि दयासिंह, धर्मसिंह, मोहकमसिंह, साहबसिंह, हिम्मतसिंह या पाच वीरांना खालसा पंथ म्हणून घोषित केले. यांना गुरुगोविंदसिंहांनी केश, कंगा, किरपाण, कडा आणि कच्छ असे पाच चिन्ह धारण करण्यास सांगितले.ही पाच चिन्हे सर्व देशवासियांमध्ये असलेल्या देश रक्षकाची ओळख म्हणून निश्चित केलेले आहे. शीख धर्मात

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

वापरल्या जाणाऱ्या या  पाच महत्त्वाच्या वस्तू बंधनकारक आहेत, ज्यांना पाच ककार म्हणतात. या वस्तू प्रत्येक शीखांसाठी आवश्यक आहेत, कारण हि शीख धर्माची ओळख, तत्त्वज्ञान आणि शिकवणीचे प्रतीक आहेत.

**1. केस** :- शीख लोकांनी त्यांच्या केसांची नैसर्गिक वाढ राखावी आणि कधीही केस कापू नयेत. केस वाढवणे म्हणजे ईश्वराच्या निर्मितीचा सन्मान करणे. हे नैसर्गिकतेचे प्रतीक आहे. केस न कापणे म्हणजे आपल्या शरीरावर नियंत्रण ठेवणे आणि ईश्वराने दिलेल्या स्वरूपाचा आदर करणे. असे आध्यात्मिक कारण आहे.

**2. कंघा -** शीख लोक कंघा नेहमी त्यांच्या केसांमध्ये ठेवतात, ज्यामुळे केस स्वच्छ आणि व्यवस्थित राहतात. बाह्य स्वच्छता हा आत्म्याच्या शुद्धतेकडे नेणारा मार्ग आहे. यातून हा संदेश देतात कि, शरीर आणि मन दोन्ही स्वच्छ ठेवले पाहिजेत.

**3. कड़ा -** कड़ा म्हणजे एक गोलाकार बांगडी, जी शीख लोक त्यांच्या उजव्या हाताला घालतात. ती सतत आठवण करून देते की, आपण सत्कर्म करावे आणि ईश्वराची शिकवण पाळावी.  जे ईश्वराच्या अनंत शक्तीचे प्रतीक आहे. या कड्याचा गोल आकार एकतेचे प्रतीक आहे, ज्यामुळे मानवाचे कर्म सतत ईश्वराशी जोडलेले राहते.

**4. कच्छा -** कच्छा म्हणजे परंपरागत सुती अंतर्वस्त्र, जे शुद्धतेचे आणि नैतिकतेचे प्रतीक आहे. ती शीख लोकांना संयम आणि शिस्त पाळण्याची शिकवण देते. संयमी जीवनशैली आणि शुद्धवर्तन याचे महत्त्व दर्शविण्यासाठी कच्छा परिधान केला जातो.

**5. किरपान -**  किरपान म्हणजे शीख धर्मातील सत्यासाठी लढण्याचे आणि दुर्बलांचे संरक्षण करण्याचे प्रतीक आहे. याशिवाय आत्मसंरक्षण आणि सत्याचे रक्षण करण्याचेही हे प्रतीक आहे. ती केवळ बाह्य शत्रूंपासून संरक्षण करण्यासाठी नाही, तर ते आत्मशुद्धीसाठी सुद्धा आहे.

हे पाच ककार म्हणजे केवळ धार्मिक वस्त्र किंवा चिन्ह नव्हेत, तर शीख धर्माच्या आत्मिक, नैतिक, आणि सामाजिक तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहेत. जे शीख लोकांना त्यांच्या धार्मिक परंपरांशी जोडून ठेवतात आणि सत्कर्माची प्रेरणा देतात. त्यामुळे या वस्तू बंधनकारक असून प्रत्येक शीख व्यक्तीने त्यांचे पालन करणे अनिवार्य मानले जाते.

**गुरुग्रंथसाहेबाची विशेषता** :-

पाचवे गुरु, गुरुअर्जुनदेव यांनी १६०४ साली श्री गुरुग्रंथसाहिबाची रचना केली.  त्यांनी शीख धर्माच्या आध्यात्मिक शिक्षणाला एकत्रित स्वरूपात बांधण्यासाठी या ग्रंथाची संकल्पना मांडली. गुरु अर्जुनदेव यांनी गुरुनानक, गुरुअंगद, गुरुअमरदास, गुरुरामदास या चार गुरूंच्या शिकवणी गोळा केल्या. त्यारचना आणि उपदेश या ग्रंथात समाविष्ट केल्यात. इतर धर्मातील संत कवि, जसे की संत कबीर, नामदेव, रविदास, आणि फारसी कवी फरिद यांच्या रचनांना या ग्रंथात स्थान मिळाले, कारण त्यांचा संदेश सार्वत्रिक सत्य आणि मानवतेच्या कल्याणासाठी होता. १६०४ मध्ये *आदिग्रंथ* श्रीगुरुग्रंथसाहिबाचे प्रारंभिक स्वरूप तयार झाले. या ग्रंथाचे पहिले हस्तलिखित अमृतसर येथील हरमंदिर साहिब अर्थात सुवर्णमंदिर येथे ठेवले गेले. दहावे गुरु, गुरु गोविंदसिंह यांनी १७०८  मध्ये आपल्या जीवनाच्या अखेरीस श्री गुरुग्रंथसाहिबाला 'गुरु' म्हणून घोषित केले. त्यांनी या ग्रंथात नववे गुरु,

गुरुतेगबहादुर यांच्या रचना समाविष्ट केल्या आणि ग्रंथाला अंतिम स्वरूप दिले. गुरु गोविंदसिंग यांनी सांगितले की, यापुढे कोणताही मानवी गुरु होणार नाही; श्रीगुरुग्रंथसाहिब हा शेवटचा आणि कायमचा गुरु असेल.

**श्रीगुरुग्रंथसाहिब चा परिचय** :-

श्रीगुरुग्रंथसाहिबात १४३० पृष्ठे अर्थात अंग आहेत. या रचना गाथा, शब्द, श्लोक, आणि भजन स्वरूपात आहेत. ग्रंथात *गुरमुखी लिपी* वापरली आहे. या ग्रंथाच्या मूलतत्त्वात प्रामुख्याने

- ईश्वर एक आहे .
- मानवजातीची समानता.
- आत्मिक शुद्धी आणि सत्याचे पालन.
- कर्म, सेवा, आणि निस्वार्थ भक्ती सांगितली आहे .

१६०४ साली गुरुअर्जुनदेव यांनी *आदिग्रंथ* तयार केला, तर १७०८ साली गुरु गोविंदसिंह यांनी गुरुग्रंथ साहिबाला अंतिम रूप दिले आणि त्याला शीख धर्माचा *शाश्वत गुरु म्हणून* घोषित केले.

श्रीगुरुग्रंथसाहिब हा फक्त शीख धर्माचा ग्रंथ नसून, त्यातील शिकवणी संपूर्ण मानवजातीसाठी आहे. हा ग्रंथ सर्व धर्म, जाती, आणि सर्व वयोगटांतील लोकांना सत्य, सेवा आणि समानतेचा संदेश देतो. या ग्रंथाच्या वाचनाने आणि चिंतनाने आत्मिक उन्नती आणि सामाजिक सुधारणा साधता येते. या ग्रंथाची वाणी ही ३१ रागात आहे. ज्यात गुरुतेगबहादूर यांचा राग जैजवंती आहे. गुरुनानकदेव, गुरुअंगदेव, गुरुअमरदास, गुरुरामदास, गुरुअर्जुनदेव यांनी लिहिलेल्या यातील पदाला महल म्हटले आहे. कबीर, शेख फरीद, नामदेव, रविदास, धन्ना, त्रिलोचन फेणी, जयदेव, भिकन, रामानंद साधना, टिपा सैनी, परमानंद, सूरदास या संतांच्या वाणींचा संग्रह सुद्धा या ग्रंथात आहे. या ग्रंथाचे सर्व गुरु हे गुरुनानकदेवांच्या जीवन ज्योतीलाच आपला प्रकाश मानतात. या ग्रंथात पंजाबी, संस्कृत, हिंदी, अरबी, फारसी या शब्दांचाही समावेश दिसून येतो. यामुळे कित्येक भाषा भगिनी या ग्रंथात दिवाळी सण जणू साजरा करत आहे असे वाटते.

**गुरुग्रंथसाहिबांची शिकवण** :-

गुरुग्रंथसाहिबाची शिकवण भारतीय ज्ञान प्रणालीत अत्यंत महत्त्वाची आहे, कारण या शिकवणीमध्ये भारतीय तत्त्वज्ञानाच्या पारंपरिक तत्वांचा समावेश आहे. गुरुग्रंथसाहिब एक सार्वभौम आणि अत्यंत व्यापक धार्मिक ग्रंथ आहे, जो केवळ शीख धर्माचे आध्यात्मिक मार्गदर्शन करतो असे नाही, तर तो भारतीय ज्ञान परंपरेच्या अन्य ग्रंथातील मुख्य तत्त्वांशी देखील सुसंगत आहे.

**1. आत्मज्ञान आणि अद्वैत तत्त्वज्ञान:** - गुरु ग्रंथसाहिबमध्ये "एक ओंकार" अर्थात एक ईश्वर ही संकल्पना आहे, जी वेदांत तत्त्वज्ञानाच्या "अद्वैत" संकल्पनेशी संबंधित आहे. वेदांत सांगते की आत्मा आणि परमात्मा अर्थात ब्रह्म एकच आहेत, आणि गुरुग्रंथसाहिब देखील हाच सिद्धांत प्रकट करतात. यामध्ये आत्मज्ञान प्राप्त करण्याचा मार्ग स्पष्ट केला जातो, जो प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

**2. सामाजिक समानता आणि न्याय:-** गुरुग्रंथसाहिबाने सामाजिक समानता आणि जातिवाद विरोध यांवर भर दिला आहे. भारतीय समाजात जातिवाद आणि वर्ग भेद यांचे महत्त्व होते, पण गुरुग्रंथसाहिबाने त्यांचा विरोध केला. यामध्ये प्रत्येक व्यक्तीला समान अधिकार दिले आहेत, ज्यामुळे सामाजिक न्याय आणि समानतेच्या तत्त्वांची पुष्टी होते.

उदाहरणार्थ "सर्व शीखांना गुरूंच्या शिकवणीचे पालन करणे आवश्यक आहे." यात हे दर्शविते की, सर्व मानव समान आहेत आणि त्यांना समान अधिकार मिळायला हवेत, जे प्राचीन भारतीय ज्ञान प्रणालीतील समानतेच्या तत्त्वाची शिकवण देते.

3. **नैतिकतेचे पालन:-** गुरुग्रंथसाहिब मध्ये नैतिकतेचे पालन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. सत्य, दया, सहनशीलता आणि निस्वार्थ सेवा यांना आदर्श मानले आहे. ज्यामुळे मानवता आणि नैतिकता यांचे महत्त्व वाढते, जो भारतीय तत्त्वज्ञानाच्या शिकवणीचा एक भाग आहे.

उदाहरणार्थ: "सत् गुरुची संगत मिळवून आनंद सागराची प्राप्ती होते" या वचनातून ज्ञात होते की सत्याच्या मार्गावर चालूनच शुद्धता आणि नैतिकता प्राप्त करता येते.

**4. आध्यात्मिकता आणि ध्यान:-** गुरुग्रंथसाहिबात ध्यान आणि साधना यांच्या महत्त्वावर भर दिला आहे. यामध्ये भक्तिरस आणि मन:शांति प्राप्त करण्याचे मार्ग सांगितले जातात, जे भारतीय तत्त्वज्ञानाच्या ध्यान प्रणालीशी निगडीत आहेत. ध्यान म्हणजे ईश्वराशी एकात्मतेचा मार्ग, जो आत्मज्ञानाच्या प्राप्तीसाठी आवश्यक आहे.

उदाहरणार्थ "जो मनावर नियंत्रण ठेवतो, तोच जग जिंकतो" हे वचन ध्यान आणि साधनेच्या महत्त्वाची शिकवण देते. यामुळे, भारतीय ध्यान पद्धती आणि गुरु ग्रंथसाहिबातील तत्त्वज्ञान एकमेकांना जोडतात.

**5. सर्व धर्मांचा आदर आणि धार्मिक सहिष्णुता:-** गुरुग्रंथसाहिबात विविध धार्मिक संतांची शिकवण आहे. ज्यामुळे सर्वधार्मिक सहिष्णुतेला महत्त्व दिले गेले आहे. जो भारतीय समाजातील विविध धर्मांच्या तत्त्वज्ञानांचा आदर करण्याची शिकवण देतो.

**निष्कर्ष**

शीख धर्माने मानवतेसाठी समानता, धर्मनिरपेक्षता, आणि समाज सुधारणा यांचा आदर्श दिला. दहा गुरूंनी आपल्या शिकवणी, बलिदान, आणि प्रेरणादायक जीवनाद्वारे समाजाला एक नवीन दिशा दिली. गुरुग्रंथसाहिबाच्या शिकवणीत एक नवा दृष्टिकोन दिलेला आहे. राष्ट्र प्रेमाच्या अनुषंगाने, मानवीय कर्तव्याला देशसेवेशी आणि सामाजिक जबाबदारीशी जोडले आहे. या शिकवणींमध्ये आत्मज्ञान, सामाजिक समानता, नैतिकता, आध्यात्मिक साधना आणि समर्पण यांचे महत्त्व समजवले गेले आहे. या तत्त्वज्ञानाने भारतातील विविध ज्ञान परंपरांना एकत्र केले आहे आणि भारतीय तत्त्वज्ञानाला एकत्रित, शांतिपूर्ण आणि सकारात्मक दृष्टिकोन दिला आहे. ज्याचे अनुपालन हेच आपणास विश्वगुरुत्वाकडे नेणारे आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1. ठाकूर देशराज, (१९५४), सिख इतिहास, प्रमित्थान विद्यापीठ, संगरीया, गंगानगर राजस्थान, पंचम संस्करण
2. श्रीसुखलाल गुरु विद्यारत्, (सन् १९०७), श्रीगुरघर में दान विधि, सनातन धर्म छापखाना, प्रथम आवृत्ती

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

3. मिश्र डॉ जयराम, (सन् १९६०), गुरुग्रंथदर्शन, साहित्य भवन प्राइवेट लि. इलाहाबाद, प्रथम आवृत्ती
4. महिप सिंह, (१९९७), गुरुगोविंदसिंह, साहित्य अकादमी नई दिल्ली, प्रथम संस्करण
5. महिप सिंह, श्रीगुरुहरीरायजी, साहित्य अकादमी नई दिल्ली, प्रथम संस्करण
6. महिप सिंह, श्रीगुरुअरजनदेवजी, साहित्य अकादमी नई दिल्ली
7. महिप सिंह, श्रीगुरुअमरदासजी, साहित्य अकादमी नई दिल्ली
8. महिप सिंह, श्रीगुरुतेगबहादूरसाहबजी, साहित्य अकादमी नई दिल्ली
9. महिप सिंह, श्रीगुरुनानकदेवजी, साहित्य अकादमी नई दिल्ली
10. महिप सिंह, श्रीगुरुरामदासजी, साहित्य अकादमी नई दिल्ली
11. महिप सिंह, श्रीगुरुअंगददेवजी, साहित्य अकादमी नई दिल्ली
12. महिप सिंह, श्रीगुरुहरीकिशनसाहबजी, साहित्य अकादमी नई दिल्ली
13. महिप सिंह, श्रीगुरुग्रंथसाहिब जान पहचान, साहित्य अकादमी नई दिल्ली
14. संपादक विनोबा, (२००३), जपूजी (शिखांचा हरिपाठ), परंधाम प्रकाशन पवनार, वर्धा द्वितीय आवृत्ती
15. अनुवादक साहिबसिंघ , चरण सिंघ ,सिंघ औलख अजित, (२००९), आदिश्रीगुरु ग्रंथसाहिबजी भाग १ ते ४, भा.चतरसिंघ , जीवनसिंघ, अमृतसर, प्रथम संस्करण
16. श्रीस्वामीशांतानंदजी, (विक्रम सं . ९९०), वैदिक जपूजी, पं. गुरुप्रसाद वैद्य कविराज प्रेम औषधालय जेहलम.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

२

# गो.पु.देशपांडे यांची प्रायोगिक नाटके

प्रा. डॉ. ललिता मानसिंग गोपाळ
श्री आसारामजी भांडवलदार कलाएवाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
देवगाव (रं)ए ता -कन्नडए जि- छत्रपती संभाजीनगर
संसपजंहवचंस१ / हउंपसण्बवउ

मराठी नाट्यक्षेत्रात गो.प.देशपांडे यांनी आपल्या नाटयलेखनाने एक वेगळाच प्रवाह निर्माण केला आहे. त्यांची नाटके दिपस्तभांची काम करताना दिसतात. त्यांनी आपल्या नाटकातून राजकीय जाणीवांचा विचार मांडला आहे. हा विचार मांडत असताना त्यात जाणवणा—या अपरिहार्य सामुहिकतेचा आणि त्या समुहाचे असणा—या राजकारणाचाही आढावा घेतला आहे. राजकारणात दिसून येणा—या राजकारणाचाही आढावा घेतला आहे. राजकारणात दिसन येणाऱ्या व्यक्तीचे खाजगी जीवन, त्यांना दिले जाणारे सामाजिकपण, राजकीय संदर्भ व सांस्कृतिक परिस्थिती यांचा शोध त्यांनी आपल्या लेखनातुन घेतला आहे. यातुन त्या व्यक्तीच्या जीवनात निर्माण होणारा गुंता त्यांनी सहृदयतेने हळुवारपणे सोडविणयाचा केलेला प्रयत्न व त्या व्यक्तीची होणारी मानसिक अवस्था यांचे दर्शन त्यांच्या नाटकातून होते.

उद्धवस्त धर्मशाळाश, श्अंधारयात्राश श्चाणक्य विष्णुगुप्तश मामक:, पांडवाश्चौव, असा नवरा सुरेख बाई, एक वाजुन गेला, सत्यशोधक रस्ते, म्युझिक सिस्टिम ही नाटके गो.पु.देशपांडे यांनी लिहिली. गो.पु. देशपांडे यांना राजकीय — सामाजिक परिस्थितीची विलक्षण जाण असणारे ते नाटककार होते.

गो.पु. देशपांडे यांच्या नाट्यलेखनाने एक वेगळाच प्रवाह निर्माण केला आपल्या नाटकांतुन राजकीय सामाजिक आणि सांस्कृतिक परिस्थिती यांचा शोध घेतला. गो.पु. देशपांडे यांची प्रायोगिक नाटके यांचा प्रस्तुत ठिकाणी शोध घेण्याचे योजिले आहे.

उद्धवस्त धर्मशाळा या नाटकातील श्रीधर हा विद्यापीठात प्राध्यापक आहे. त्याने क्रांतिकारी शिक्षक संघटनाश नावाची संघटना स्थापन केल्याने त्या आवारात शांतता नाहीशी होत असल्याचा आरोप त्याच्यावर ठेवला जातो. यासाठी समिती नेमली जाते. आणि या चौकशीतुन हे नाट्य उलगडत जाते. या नाटकात चौकशी हे रूप वापरले आहे. या चौकशीतून श्रीधर व त्याच्या वडिलांशी असणारे संबंध, श्रीधरचे व सरस्वतीचे

वैवाहीक जीवन, माधवीशी श्रीधरचे असणारे संबंध यांचे विश्लेषण केले जाते. या चौकशीचा राजकारणाशी संबंध असल्याने एखाद्या व्यक्तीला किंवा त्याच्या व्यक्तिमत्वाला कसे बरबाद करायचे, हे त्यांना चांगलेच माहित आहे.

या नाटकाचे दोन अंक आहेत. पहिल्या अंकात पाच दृश्ये व दुसऱ्या अंकात चार दृश्ये। येतात. या नाटकात फ्लॅश बॅक तंत्राचाही वापर केला गेला आहे. या तंत्राने वर्तमान व भूतकाळ। या दोन पातळया जोडण्याचे काम होते. या तंत्राद्वारे श्रीधरने आपल्या वडिलांशी, सरस्वतीशी। आणि माधवीशी असणारे नाते दाखविले जाते म्हणजे या नाटकात येणारे तंत्र गरज म्हणूनच येते. श्रीधर हे एकच एक पात्र संपुर्ण नाटकात वावरताना दिसते. फ्लॅश बॅक मधून घडणारी तीन दृश्ये सोडली तर बाकी दृश्यामधये पात्रच आपल्या जागेवर बसून बोलत राहतात.

अंधारयात्रा हे गो.पु. देशपांडे यांचे राजकीय नाटक आहे. वसुंधरा हे पात्र नाटकाचा केंद्रबिंदु आहे. वसुंधरा भोवती दौलतराव, श्रीपाद अश्वत्थ आणि परिक्षित ही पात्रे फिरताना दिसतात. वसुंधरा आणि परिक्षिता या दोघांचे लग्न होते. परिक्षित वसुंधरा सुंदर असण्याचा उपयोग करून घेतो. वसुंधरा पुर्वी मॉडेलींग करत असते तर दुसरीकडे संस्कृतमधुन एम.ए करत असते. परिक्षिताच्या इच्छेने ती प्रथम दौलतराव या पुढाऱ्याकडे जाते तेव्हा दौलतराव तिच्याशी लग्न करण्यास तयार असुनही ती तयार होत नाही. काही काळाने परिक्षिताशी वसुंधरा घटस्फोट घेते. ती आपले आयुष्य स्वतंत्रपणे जगायचे ठरविते. यातुनच पुढे श्रीपाद येतो. श्रीपाद तिच्याशी लग्न करण्यास तयार होतो पण ती त्याच्याशी लग्न न करता दौलतराव व श्रीपाद यांच्या बरोबर तसेच संबंध ठेवते. तिच्याकडे संस्कृत शिकायला येणाऱ्या अश्वत्थर मात्र ती मनातुन मुलाप्रमाणे प्रेम करू लागते.

या नाटकाचे दोन अंक असुन पहिल्या अंकात चार प्रवेश व दुसऱ्या अंकात पाच प्रवेश आहेत. दुसऱ्या अंकातील सुरूवातीला दौलतरावांची चार भाषणे ही चार भाषणे म्हणजे संस्कृत नाटकातुन येणाऱ्या विष्कंभकाप्रमाणे येथे आली आहेत. या नाटकाच्या सुरूवातीला येणारी नटी ही सुत्रधाराचेच काम करताना दिसते. या नाटकात फ्लॅश बॅक तंत्राचा वापर केला आहे, त्याचप्रमाणे स्वगत, नाटयसंगीत, वादयसंगीत, मारवा श्लोक अशा संगीताचा वापर करून घेतला आहे.

चाणक्य विष्णुगुप्त या नाटकात त्यांनी सुत्रधाराच्या रूपात येणाऱ्या आणि प्राचीन काळात प्रेक्षकांना घेऊन जाणाऱ्या द्रष्टा या पात्राची योजना केली आहे. वैदिक विरूध्द अवैदिक हा भारतीय संघर्ष विष्णगुप्ताचा लक्षात येणे हे या नाटकाचे आशयसूत्र आहे. चंद्रगुप्त मौर्या सम्राट झाल्यानंतर आश्वलायनाच्या विहारात जाऊन बौध्दांचे मौर्याविषयी असणारे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न करतो. विष्णुगुप्त या नाटकात स्वत:ला पराभूत संस्कृतीचा सिध्दांत द्रष्टा। म्हणवुन घेतो. राजकीय सत्ता हा महत्वाचा विषय आहे. सुवासिनीने चंद्रगुप्तावर असणारे प्रेम चाणक्यामुळे उधळुन लावले व यामुळेच चंद्रगुप्त विष्णुगुप्त चाणक्याच्या हातचे बाहुले बनला. सवासिनी नंदाशी लग्न करते पण ती लवकरत विधवा बनते.

हे नाटक दोन अंकी आहे. पहिल्या अंकात अठरा प्रेवशतर दुसऱ्या अंकात तेरा प्रेवश । आहे. या नाटकात द्रष्टा सुत्रधाराचे काम करतो. या नाटकातून संस्कृत श्लोक, मंत्र, ऋग्वेदातील ऋचा, समूहगीत, राजदारी संगीत, बौध्द भिक्षची प्रार्थना यांचा वापर केला आहे.

मामका: पाण्डवाश्चौव या नाटकात आप्पा आणि भास्कर यांचा संघर्ष दाखविला आहे. आप्पा हे वयाने आणि विचाराने पोक्त आहेत. त्यांनी आपल्या आयुष्याचे नियोजन करताना अतिशय संयमपूर्वक केले आहे. जेव्हा आप्पा बाल्टिमोरला परत जायचं असं सांगतात तेव्हा भास्कर त्यांना सरळ सरळ विरोध करतो तर आई मनात नसतानाही आप्पांच्याबरोबर जाण्यास तयार होते. यातुन आंतर्विरोध स्पष्ट होत जातो.

या नाटकाचा एक अंक असून त्यात तीन प्रवेश आहेत. हे ही नाटक चर्चात्मक आहे. यातुन संगीताचे वेगवेगळे प्रकार हाताळले आहेत. या नाटकातुन टेपरेकॉर्डवर रेकॉर्ड केलेले मागील संवाद ऐकविले आहे. तो या नाटकाच्या संहितेतील एक भाग म्हणुन येतो.

एक वाजून गेला हे नाटक आशय आणि तंत्राच्या बाजूने वेगळेपण घेवून येणारे आहे. हे संपुर्ण नाटक नाना या पात्राभोवती फिरत राहते. उमा ही नानांची मुलगी तिचे व नानांचे वैचारिक मतभेद तीव्र असूनही तिला नानांच्या बद्दल आदर आहे. हे नाटक दोन अंकी आहे. नाटकातून निर्माण होणारा ताण राजकीय दृष्टीकोनातून कला, समाजसंस्था आणि व्यक्ती यामध्ये निर्माण होतो. माणसामाणसांमध्ये घडून येणारा संवाद कमी होत असल्याने त्यांची एकमेंकासमोर आल्यावर होणारी अवस्था, आपण स्विकारलेला मार्ग चूक की बरोबर यावरच चर्चा होत राहते। त्यातुन निष्पन्न काहीच होत नाही.

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

या नाटकात पॉप म्युझिक, भैरवी, ठमरी, आरती वेगवेगळ्या संगीताचा उपयोग करून घेतला आहे.

गो. पु.देशपांडे यांनी त्यांच्या बहुतांश नाटकामध्ये स्वगतांचा फार चांगल्या प्रकारे उपयोग केला आहे. माणसामाणसातील विसंवाद, माणसांमाणसातील संघर्ष, द्विधा मनस्थितीचे दर्शन, पात्रांची मनोभुमिका, सुत्रधार, विष्कभक, द्रष्टा यांच्यामार्फत प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो. या स्वगतामधुनही आशावादाचा प्रत्यय वारंवार डोकावत राहतो.

गो.पु.देशपांडे यी समकालीन सामाजिक राजकीय प्रश्नांची मांडणी केली आहे. ही मांडणी करत असताना इतिहास पुराणकथा, जातके यांचा आधार घेऊन प्रभावीपणे मांडणी केली आहे. गो.पु.देशपांडे यांच्या नाटयनिर्मितीद्वारे घ॰*ॅ नंतरच्या कालखंडात नव्या आशयकृती आणल्या. श्सत्तासंघर्षश आणि श्मूल्यसंघर्षश याची मांडणी करून प्रेक्षकांना मुल्यात्मकतेचे भान देतात. मराठी भाषेचे उत्कृष्ट जाण असणारे आणि भाषेचा परिणामकारक वापर करणारे आधुनिक काळातील एक महत्वाचे नाटककार म्हणून त्यांचे योगदान महत्वाचे वाटते.

## संदर्भ

घ. प्रा.रमेश साळुखे – नाटककार गो.पु.देशपांडे समाज प्रबोधन पत्रिका ऑक्टोबर ते डिसेंबर ह्र्ज्घ्ि

ह्र. परिवर्तनाचा वाटसरू – घ ते र्घि जुलै ह्र्ज्घ्ह्र

ि. परिवर्तनाचा वाटसरू – घ ते घ्ह्र ऑगस्ट ह्र्ज्घ्ह्र

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

## ३

# पंढरपूरची वारी : एक अभ्यास

संशोधक विद्यार्थी
अंकुश भागवत सोनवणे
इतिहास विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

- **प्रस्तावना –**

महारा  ट्राच्या सामाजिक आणि धार्मिक जडणघडणीत वारकरी संप्रदायाचे महत्वपूर्ण स्थान आहे. तेराव्या  ातकापासून वारकरी संप्रदायाची परंपरा अविरत चालू आहे. त्याचप्रमाणे वारी ही वारकरी संप्रदायाचा आनंद सोहळा आहे. वारकरी संप्रदायात पंढरपूरच्या वारीला अनन्यसाधारण महत्व आहे. वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूर येथील विठ्ठलाच्या वारीला जाणाऱ्या लोकांचा संप्रदाय होय.

वारी म्हणजे महारा  ट्रातील वेगवेगळया गावातून सुरू होऊन पंढरपूर येथे संपणारी एक सामुदायीक पदयात्रा होय वारीची परपरा ही संत ज्ञानेश्वर माऊलीच्या पूर्वीपासून चालत आलेली आहे. १२६० पूर्वीही पंढरपूरची ख्याती आणि भक्त पुंडलीकच्या अख्यायिकेला जनमाणसात स्थान होते. संत ज्ञानेश्वर माऊलीच्या काळापासून वारीची लोकश्रध्दा अधिक प्रमाणात तळागाळात पोहचली. पालखी सोहळयाची परंपरा मात्र जगतगुरू तूकोबारायांचे पुत्र नारायण देहूकर यांनी तुकोबाच्या निधनानंतर ३६ व  ाानी म्हणजे १६८५ मध्ये सुरू झाली ती आजतागायत अविरत चालू आहे.(लोकराज्य मासिक, ऑगस्ट २०१८)

वारी आ  ाढी आणि कार्तिकी महिण्यातील  ुध्द एकादशी अशा दोन वेळा होते. आळंदी येथून संत ज्ञानेश्वर यांच्या पादुका आणि देहू येथून संत तुकाराम महाराज यांच्या पादुका पालखीत ठेवून ती पालखी पंढरपूरच्या दिशेने पायी चालत मार्गस्थ होते. पंढरपुरच्या दिशेने पायी चालत मार्गस्थ होत असताना वाटेत गावोगावी लोक या पालखीत सामील होतात. अनेक ठिकाणी मुक्काम केले जातात. पुन्हा पंढरपुरच्या दिशेने मार्गस्थ होतात. हातात टाळ, पताका घेऊन नामाचा हरीगजर करत ही पायी दिंडी पंढरपुरच्या दिशेने मार्गस्त होते.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

पंढरपुरच्या विठठ्लाची उपासणा करण्यासाठी महारा ट्रातील निरनिराळया प्रमुख ठिकानावरून संताच्या पालख्या निघतात. टाळ—मृदंगाच्या गजरात जयजयकारात दिंडया पंढरपूरी येऊ लागतात. यामध्ये महारा ट्रातील अनेक जाति धर्मातील लोक आवर्जून सहभागी होतात. सामाजिक ऐक्य बंधुभाव व समता यांचे मुर्तीमंद स्वरूप म्हणजे ही वारी, महारा ट्राला एकसुत्रात आणि एका धाग्यात बांधण्याचे काम हे वारीने ातकानुशतके केलेले आपणास दिसते. (पालखी, रामचंद्र देखणे, पेज नं. १५८)

वारकरी आ ाढी वारीसाठी आपापल्या गावातून दिंडया काढतात. दिंडी तयार करून दिंडीच्या माध्यमातुन नामगजर करण्याची परंपरा प्रामुख्याने संत नामदेव यांच्यापासून सुरू झालेली दिसते. आणि याचे दिंडीत अनेक वारकरी सहभागी होतात. सोबत भगवा झेंडा, हातात टाळ, कपाळावर अ ठगंध व बुका, तोंडात नामाचा गजर व इतर आवश्यक साहित्य सोबत घेउन वारकरी या आनंद सोहळयात सहभागी होतात. अशा या महान परंपरा असणाऱ्या वारी सोहळयाचा अभ्यास प्रस्तुत लेखात करण्याचा प्रयत्न करत आहे.

- **पंढरपुरची वारी म्हणजे काय —**

पंढरपुरची वारी म्हणजे विविध गावांमधून सुरू होऊन पंढरपुर येथे विठठ्लाच्या दर्शनाने संपन्न होणारी एक सामुदायीक पदयात्रा होय. ही वारी आ ाढ आणि कार्तीकी महिनयातील ाुध्द एकादशी अशा दोन वेळा होते. विविध ठिकाणावरून पायी चालत आलेल्या दिंडया म्हणजे वारी होय.वारी करणाऱ्यास वारकरी असे म्हटले जाते. संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे म्हणतात. ''पंढरपूरची वारी वारकरी संप्रदायाचा मुख्य आचार धर्म होय. अध्यात्मिक आणि सांस्कृतीक अशा दोन भक्कम तीरामधुन अखंडपणे वाहणारा महारा ट्राच्या लोकजिवनाचा नैतिक प्रवाह म्हणजे पंढरपूरची वारी होय. भक्तीचे मुर्त रूप म्हणजे पांडूरंग, तर आर्त रूप म्हणजे पंढरीची वारी.

वारी हा भागवतभक्तीचा नुसता अवि कार नसुन भक्तीप्रेमाची अनुभूती घेण्याची ती सहज स्थिती आहे. साहित्यसम्राट आचार्य अत्रे यांनी 'आ ाढस्त्रे प्रथम दिवसे' या पुस्तकात लिहीले आहे की महारा ट्राचा देव विठोबा, मोक्षपीठ पंढरपूर आणि आ ाढी कार्तीकी वारी महारा ट्राचा धर्म अशा प्रकारे साहित्यकारानी आ ाढी वारीबदद्ल चे मत मांडलेले आपणास दिसते.

- **वारीचा उगम व विकास —**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

वारीची परंपरा माऊलीच्या पूर्वीपासून चालत आलेली आहे. १२६० पूर्वीही पंढरपूरची ख्याती आणि भक्त पुंडलिकाच्या अख्यायीकेला जनमाणसात स्थान होते. वारीचे अस्तित्व तेंव्हापासून होते असे मानले तर जानदेवाच्या काळापासून वारीची लोकश्रध्दा अधिक प्रमाणात तळागाळात झिरपलेली दिसते. पालखी सोहळयाची परंपरा मात्र जगद्गूरू तुकोबारायांचे पुत्र नारायण महाराज देहूकर यांनी तुकोबाच्या निर्वणानंतर ३६ व ार्नी म्हणजे १६८५ मध्ये सुरू केली असे संदर्भ सापडतात.

श्रीनारायण महाराज हेसंत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महारांजाच्या पादुका एकाच पालखीत ठेवून ती पालखी समारंभपूर्वक आ ाढी वारीला देहूहून पंढरपुरला घेउन जात असत. हा पालखी सोळा सुमारे तिनशे व ार्पूर्वी सुरू झाला तो आजतागायत सुरू आहे. यापूर्वी संताच्या पालख्या त्यांच्या गावावरून आ ाढी वारीला पंढरपूरला नेली जात नसत. परंतु श्रीनारायण महाराजांनी पालखीच्या सोहळयाची आणि ज्ञानोबा–तुकाराम भजनांची प्रथा सुरू केली. पंढरीच्या वारीची परंपरा तूकाराम महाराजांच्या घराण्यात पिढयाण पिढया चालू असल्याचे उल्लेख मिळतात. वारीचा उगम निश्चित कधी झाला हे सांगने कठिण आहे. परंतु शिलालेख–ताम्रपट यातून वारीच्या उगमाजवळ जाण्याचा प्रयत्न होतो. काही शिलालेखाच्या आधारे आपण वारीच्या उगमाचा इतिहास पुढीलप्रमाणे पाहू. त्यामध्ये ाके ११५९ (इ.स. १२३७) होयसाळ राजाच्या कारकीर्दीतील शिलालेख आहे तो सोहळा खांबी मंडपाच्या तुळईवर तिन्ही बाजूने लिहीलेला आहे. तो संस्कृत आणि कानडी अशा संमिश्र भा ेत, देवनागरी लिपीत आहे. त्याच्यात पुंडलिक मुनींचा व विठठ्ल देवाचा उल्लेख आहे. तसेच तुळईच्या पूर्वभागातील ७१ व्या ओळीत वारीचा उल्लेख आहे. पंढरपुरच्या वारीचा हा प्राचीन उल्लेख होय. दुसरा उल्लेख ाके ११९५ (सन १२७३) मधील याला चौऱ्यांशीचा शिलालेख म्हणतात. या शिलालेखास पंढरपुरास फागनीपूर व विठोबास विठठ्ल असे म्हटले आहे याच्यात रामचंद्रदेव यादवाचा उल्लेख आहे. त्यात त्यांना पांढरीफडमुख म्हणुन संबोधले आहे. ालीवान ाके १११० मधील एक प्राचीन शिलालेख आहे. त्यात विठठ्ल देवाचा उल्लेख आलेला आहे. त्यात देवालय बांधणाऱ्याची नावे आली आहेत. पंढरपूर येथे सापडलेल्या शिलालेखातून विठठ्लाचे उल्लेख मिळतात. पण ताम्रपटात पंढरपुरचे पांडूरंगपल्ली असे नाव आहे. हे त्याचे वैशि टये पंढरी गाव ालीवाहन ाकाच्या प्रारंभापासून वसलेले आहे. विठठ्ल मंदिरही त्या वेळेपासून आहे असे मालू सोनाराने मालूतारण ग्रंथात म्हटले आहे. वरील सर्व गो टी लक्षात घेता श्रीपुंडलिक महामुनींच्या कालासंबधी व विठठ्ल देवाच्या

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

कालासंबंधी निश्चित ऐतिहासीक पुरावा हाती आला नाही. डॉ. भांडारकर, डॉ.डेलटी, डॉ. ोभना गोखले, डॉ. वा.ल.मुजूळ वगैरे इतिहास संशोधकांनी श्रीविठ्ठल देवाचा पंढरीचा ोध घेण्याचा प्रयत्न केला डॉ.न.चि.ढेरे यांनी संशोधनाकरीता पंढरपूर प्रकल्प हाती घेतला. त्यांच्या संशोधनानुसार त्यानी हत्तीची मूर्ती ही आद्य नसुन, माढयाची विठ्ठलमुर्ती आहे असे ठरवले. (लोकराज्य मासीक–ऑगस्ट,२०१८)

- **दिंडीची परंपरा –**

वारीची परंपरेचा निश्चित काळ सांगता येत नाही. वारी ही संत ज्ञानेश्वर यांच्या अगोदरपासून सुरू आहे. ज्ञानदेवाच्या वडिलांनी, आजी आजजोबानी वारी केल्याचा उल्लेख आहे. तेव्हा पायी चालत–चालत जायचे एवढीच परंपरा होती. दिंडी तयार करून नामजप करत पंढरपूरी चालत जायची परंपरा संत नामदेवरायांपासून सुरू झाली ज्यावेळी संत ज्ञानेश्वर माऊलींनी समाधी घेण्याचा मनोदय व्यक्त केला तेंव्हा माऊली समाधी सोहळयासाठी सारी संतमंडळीनीं आळंदीला निघाली, पंढरपुरातील संत नामदेव, गोरा कुंभार, नरहरी सोनार, आदि संतमंडळी भजनाची दिंडी तयार केली. व टाळ मृदंगाचा गजर करीत नामदेव महाराजांच्या नियंत्रणाखली ती दिंडी आळंदिला येण्याचा प्रघात सुरू झाला. परंतु ही पहिली दिंडी पंढरपूर ते आळंदी अशी निघाली असली तरी तेथुन पूढे आजतागायत सर्व दिंडया या आपल्या गावातून पंढरपूर येथेच संपन्न होतात. हीच पहिली दिंडी साक्षात पंढरपूर म्हणजे देवाच्या गावातून आळंदीला म्हणजे संताच्या गावी निघाली होती. वारकऱ्याच्या या समुदायाला दिंडी हे नाव मिळाले हात भगवी पताका झेंडा हे दिंडीचे मुख्य वैशि टे आहे. (पालखी, रामचंद्र देखने, पान. नं. १६३)

- **विविध ठिकानावरून पंढरपूरास येणाऱ्या पालख्या –**

महारा ट्रातुन व महारा ट्रांच्या बाहेरून पंढरपूर येथे आ ाढी एकादिवशी निर्मीती विविध ठिकानावरून दिंडीच्या स्वरूपात पालख्या या पंढरपूर येथे येतात. यामध्ये संत ज्ञानदेवाची पालखी आणि संत तुकोबाची पालखी या दोन अनन्य साधारण महत्वाच्या आहेत. तुकोबाच्या मृत्यूनंतर ३६ व ाीनी म्हणजे १६८५ मध्ये तुकोबाचे पत्र नारायणबाबा यांनी संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या पालख्या पंढरपुरास आणण्याची प्रथा सुरू केली पुढे १८३२ मध्ये तुकोबांच्या वंशजामध्ये मानपान व वहिवाटाच्या हक्कावरून मतभेद होऊन १८३२ नंतर हैबतबाबानी ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत घालून स्वतंत्रपणे दिंडी समारंभासह व सोहळयाने पंढरपूरला नेहण्याची प्रथा चालू केली. ज्ञानेश्वराच्या पालखी सोहळयास तत्कालीन पेशवे, इंग्रज यांच्याकडून

अर्थसहाय्य होत असल्याचे दिसते. तसेच देहू येथून संत तुकाराम महाराज यांच्या पादुका घेऊन पालखी पंढरपुरच्या दिशेने मार्गस्थ होते त्याच प्रमाणे निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, जनार्धन स्वामी, संत एकनाथ, सावता माळी, रामदास स्वामी, भगवान गडावरून संत भगवानबाबा यांची पालखी अशा अनेक संताच्या पालख्या या नामाच्या हरिगजर करत पंढरपूरला येतात व चंद्रभागेच्या स्नानाने व विठठ्लाच्या दर्शनाने पूर्ण होतात. पालखी सोहळयात विविध जाती धर्मातील लोक सहभागी होतात. (व्हेरा, राजेंद्र, आधुनिकता आणि परंपरा)

- **पालखी रथ –**

हा पालखी सोहळा पंढरपुरला घेऊन जाण्याचे काम हे महारा ट्राची ाान खिल्लार बैलाकडे असते हि खिल्लार बैल आपल्या खांद्यावर रथ ओढत नेऊन हा प्रवास करतात. खूप क टाचे काम असल्याने हे काम करण्यासाठी महारा ट्रातील सुंदर धिप्पाड अशा खिल्लार बैलांचीच निवड या सोहळयासाठी केली जाते. या संपूर्ण सोहळयात एक डॉक्टरांची टीम देखील असते कि जे वेळोवेळी प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी या खिल्लार बैलांची आरोग्याची काळजी घेतात. एक विशे ा बाब सांगायची म्हणजे भारतीय गोवंश भरपुर आहे. पण या पालखी सोहळयासाठी फक्त खिल्लार गाय उपजातीच्या पोटी जन्माला येणारे खिल्लार बैलच वापरण्याची प्रथा आहे. माऊलीच्या सोहळयाला बैलजोडीदेण्याचा मान आळंदी गावातील ६ कुटुंबालाच आहे. पालखी रथ आळंदीकडून पंढरपुरला जाताना १८ दिवसाचा प्रवास असतो यात फक्त दोनच खिलार बैल हा पालखी रथ पंढरपूर पर्यंत नेहतात. तर तुकोबांच्या पालखी सोहळयात पुणे जिल्हयातील कोणतेही कुटुंब पालखी रथाच्या बैलजोडीचा अर्ज करू ाकतात. व यातुन दोन कुटुंबाची रितसर निवड करतात. अशा प्रकारे पालखी रथ सज्ज असतो. ( वारकरी संप्रादाय, ा.वा.अभ्यंकर)

- **पालखीची वैशि टये –**
- **१.वारीतील रिंगण**

हैबतबाब यांनी शितोळे सरकारांच्या मदतीने रिंगण सोहळयाची सुरूवात केलेली आहे. वारीमध्ये भावीकांना थोडा विसावा मिळावा हा खर तर रिंगणाचा प्रमुख उददे्श पण हा सोहळा म्हणजे घोडयांना त्यांची भक्ती व्यक्त करता यावी यासाठी असतो कारण रिंगण सोहळयात वारकरी भजन किर्तन करायचे ते पाहून येथील घोडयांच्या मनातही विठठ्लाची भक्ती रूजली त्यांनाही माऊलीचा प्रदक्षिणा घालावाशी वाटायची त्यांना ति घालायला मिळाली म्हणुन रिंगण सोहळयास घोडयांनी धावण्याची प्रथा सुरू झाली यातील मोकळया जागेवर ज्ञानेश्वर महाराजांचा

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

घोडा धावतो. त्याला आदराने 'माऊलीचा अश्व' असे म्हणतात. अशा प्रकारे वारीमध्ये रिंगणाला अनन्यसाधारण असे महत्व आहे.

- **२. भेदभावाचा अभाव —**

वारी/पालखी सोहळयात विविध जाती—धर्मातील वारकरी सामील होतात. इश्वराने सर्व प्राणिमात्रांना निर्माण केले. मग उच्चनिच असा भेदभाव करणार नाही, हा विचार संप्रदायाने मांडला श्रे ठत्व—कनि ठत्व किंवा जातिभेद यांना थारा दिला नाही. परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे. हा विचार या वारकरी संप्रदायाने मांडला. ज्या काळात स्त्रि स्वातंत्र्य, स्त्रियांचे हक्क अशा कल्पनाही सुचणे ाक्य नव्हते अशा काळात संप्रदायाचे हे कार्य फारच मोठे आहे. संत मुक्ताबाई, जनाबाई, बहीणाबाई यांनी भक्ती पंथात आपले स्थान निश्चित केले परमार्थकारणात स्त्रियाही उच्चपदाला पोहचू ाकतात. हे त्यांनी दाखवून दिले आणि म्हणुन स्त्रियाही माळकरी बनून, पंढरपुरची वारी करू लागल्या. तसेच वारीमध्ये स्त्रिया डोक्यावर तुळशी वृंदावन तर काहीच्या डोक्यावर पाण्याने भरलेला हंडा असतो. भजन करत वाटचाल करणाऱ्या वारकऱ्यांची तहान या हंडयातील पाण्याने भागवली जाते. अशा या वारीमधून समाजात भेदभावाचा अभाव होउन सामाजिक भावना निर्माण होण्यास मदत होते. (लोकराज्य मासिक ऑगस्ट, २०१८)

- **३. दिंडयाचे व्यवस्थापन —**

दिंडयात सर्व लोक समावेश होतात सर्वात पुढेझेंडेकरी, त्यामागे मध्यभागी विणा व पकवाज वा मृदंगवादक आणि बाजूणे टाळकरी अशी रचना असते. या सर्व दिंडयाची नोंद आळंदी संस्थानकडे आहे. त्यावर चोपदारांचे नियंत्रन असते. या दिंडीमध्ये जवळपास ४०० दिंडया असुन आणखी वाढत आहेत. सलग ५ व ेि हजेरी लावलेल्या दिंडयांना मागे चालण्यासाठी क्रमांक दिला जातो. माऊलीच्या पालखी सोहळयात २७ दिंडया असतात. सर्वात पुढची २७ नंबरची भोई समाजाची दिंडी असते. त्यानंतर २५,२४,२३ अशा उलट क्रमांकाच्या दिंडया असतात. रथाच्या पुढे क्रमांक एकची दिंडी ही आळंदी करांची असते. अशा प्रकारे नामाच्या हरिगजरासह या दिंडया पंढरपुरास येतात.

- **३. समाज आरती —**

दिंडीत/वारीत पंढरपुराच्या दिशेने जात असताना अनेक ठिकाणी मुक्काम होतात. तसेच पहाटेची पुजा आळंदी संस्थानाच्या वतीने केली जाते. दुपारी मुख्य मानकरी श्रीमंत शितोळे सरकार

यांचा नैवैध असतो. पालखी मुक्कामाच्या ठिकाणी पोहचल्यावर रात्रीची आरती ही सर्व समाज आरती असते. आशा प्रकारे प्रवासात आरत्याची रचना असते.

- **४. वारकऱ्यांची स्वयंशिस्त –**

पंढरपुरच्या दिशेने निघालेल्या दिंडी/वारीमध्ये अनेक गावातून वारकरी सहभागी होतात. वाटचाल करत असतांना वारकरी अत्यंत स्वयंशिस्त पाळताना दिसतो. कोणालाही धक्काबुकी होत नाही, धक्का लागला तर रागवत नाही. त्यामुळे वारीतील बंदोबस्ताला असलेल्या पोलिस बांधवाला कधीही काठी उगारायची वेळ येत नाही. लाखो भक्त एकत्र येऊन स्वयंशिस्त पाळून एका सरळ रांगेत पंढरपुरच्या दिशेने वाटचाल करतात हे होत असताना इतरांना तान न होता स्वता शिस्त पाळून पंढरपूरच्या दिशेने चालण्याचे कार्य करतात. हेच वारीचे सर्वात मोठे वैशि  ट आहे

- **वारीच्या माध्यमातून निर्माण होणारे सामाजिक ऐक्य**

विविध जनसमुहामध्ये विसंवाद होउ नये, संघ  ा होऊ नये यासाठी सर्वांना एकत्र करणे आवश्यक होते. हेच काम वारकरी संप्रदायाने वारीच्या माध्यमातून केलेले दिसते. जे विविध समूह भुते–खेते, जंतरमंतर, जादुटोना इत्यादि पकार तसेच त्यांच्या अंधश्रध्दा पशुबळी, नरबळी इत्यादि आपापल्या कृर प्रथाही सर्व लोक घेऊन आलेले होते. या सर्वामधून बाहेर काढून त्यांना आचरणात आणायला साधा–सोपा धर्म शिकविणे आवश्यक होते हेच काम संतानी केले. अशा परिस्थितीत भागवत धर्माचा आधार घेऊन संतानी समाजाला नेतृत्व देण्याचे कार्य केले यातुनच विविध नातीधर्मातील लोक संत परंपराकडे वळले यातुन पुढे वारीच्या माध्यमातून मोठया प्रमाणावर जनसमुदाय एकत्र येऊ लागला.

वारीमध्ये उच्चशिक्षितापासुन ते निरक्षरापर्यंत, श्रीमंतापासुन ते गरिबापर्यंत सर्वजन एकोप्याने प्रवास करतात. खेडयातील  ेतकरी, देवळातील पुजारी, गावचा जमिनदार आणि त्याच्याकडे असलेला गडी, किर्तन–प्रवचन करणारे महाराज ते स्वयंपाक करणारे आचारी हे सारे तितक्याच भक्तिभावाने आणि श्रध्देने वारीच्या जनसमुदायात एकरूप झालेले असतात. तेथे कोणताही भेदभाव केला जात नाही. विठठ्लाच्या समोर सारे एक आहेत. फक्त विठठ्ल भक्त आहेत. अन्य कोणीही नाही. ही समता आणि माणुसकी शिकवण या वारीच्या माध्यमातुन रूजविली जाते. ही वारी सहअस्तित्वाची जाणिव करून देते. तसेच वारी जातिअंतीच्या दिशेने समाजाला घेऊन जाण्याचे काम करते. वारी भेदभावास थारादेत नाही. एकमेव देव संताचा भक्तीमार्ग, शिस्तिचे पालन अशा अनेक पकारे वारीमधून सामाजिक ऐक्य निर्माण होते.

अशा या महान परंपरा असणाऱ्या वारी सोहळयासाठी समाजाच्या विविध माध्यमातून मदत तसेच सहभागी होउन या सोहळयाचा आनंद घेतात. या सोहळयास सरकारही विविध स्तरावरून सहभाग घेताना दिसते. राज्य सरकराने चंद्रभागा नदी प्रदु णमुक्त करण्याच्या हेतूने २०१६ मध्ये 'नमामी चंद्रभागा' मोहिम हाती घेतली व चंद्रभागेचा उगम असलेली भिमाशंकर ते पंढरपूर असा चंद्रभागा नदीचा ५५२ कि.मी. लांबीचा पटटा या अभियनाच्या माध्यमातुन प्रदू णमुक्त करण्याचा निर्धार केला. तसेच कॅनडा सरकार आणि भारत सरकार यांच्यातील १५० व ींची मैत्री साजरी करण्यासाठी कॅनडा सरकारकडे भारतातील एक तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपुरचा प्रस्ताव ठेवला व कॅनडाच्या माध्यमातून पंढरपूरला स्मार्ट सिटी बनवण्याचा प्रस्ताव आहे.तसेच पालखीचे पुर्ण मार्गक्रमण, आपत्कालीन व्यवस्था, अधिकाऱ्याचे संपर्क क्रमांक, पंढरपुरच्या पांडूरंगाचे व रूक्मिणीचे लाईव्ह दर्शनाची सोय इत्यादि साठी पुणे जिल्हा प्रशासनाने 'आ ाढी वारी – २०१८' मोबाईल ॲप वारकऱ्यांसाठी सारथी' हे ॲप तयार करून वारकऱ्यांना सेवा देण्याचे काम केलेले दिसते.

सध्या कोरोणाच्या परिस्थितीमूळे आळंदी व देहू येथून पालखी काढण्यास ासनाने परवानगी नाकारलेली तरीही पालखी घेउन जाण्याची परंपरेत खंड न पडता सर्व संताच्या पादुकाप्रथमच महामंडळाच्या बसमध्ये ठेवून पंढरपूरला घेउन गेलेली दिसते. अशा प्रकारे पालखी सोहळयाचे २०२१ च्या आ ाढी सोहळयासाठी महत्व स्प ट करता येईल.

- **सारांश –**

पालखी सोहळा हा एक आनंद सोहळा आहे. त्यामध्ये विविध जाती धर्मातील लोक श्रध्देच्या पोटी मोठा जनसमुदाय एकत्र येताना दिसतो. यातुन सामाजिक ऐक्य निर्माण होते, पालखी मध्ये कोणताही भेदभाव होताना दिसत नाही, तितकेच काटेकोरपणे पालन होताना दिसते, उच्च निच्चता असा भेदभाव नाही. वारकरी ऐवढीच ओळख येथे दिसते स्त्रियांचा सक्रीय सहभाग दिसतो. यातुन वारकरी संप्रदायाची शिकवण लक्षात येते. अशा प्रकारे आपणास अविरत चाललेल्या वारीचा सविस्तर अभ्यास वरिलप्रमाणे करता येईल.

- **संदर्भ ग्रथ :**

१. डॉ.रामचंद्र देखणे, पालखी, विक्ष्वकर्मा प्रकाशन, प्रथम आवृत्ती, २०१८.
२. ां.वा.अभ्यंकर, वारकरी संप्रदाय, आदित्य प्रकाशन प्रथम आवृत्ती, २००२.
३. लोकराज्य मासिक, वारी अंक, ऑगस्ट २०१८.

४. ढेरे रां.चि. श्री विठठ्ल : एक महासमन्वय, पदमगंध प्रकाशन पुणे, २००५.
५. दै. लोकसत्ता, १८ व १९ जुलै २०१७.
६. मोरे सदानंद, तुकाराम दर्शन, सकाळ प्रकाशन, २०१४.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

४

# इतिहास लेखनातील नवे प्रवाह

प्रा.डॉ.ओ.म.गजभिये
इतिहास विभाग प्रमुख
एम.इ.एस.कला वाणिज्य
महाविद्यालय, मेहकर
मो.नं. ९८६०८८५२०१
म्उंपसण्वउतंरहंझीपलमण्वह/हउंपसण्बवउ

प्रस्तावना:—

''मानवाची सर्वांगिन कहाणी'' इतिहास कालचक्रा बरोबर घडत राहतो खरा, पण घडणाऱ्या इतिहासातील जो लिहिला जातो, त्यालाच आपण इतिहास म्हणून ओळखतो. इतिहास लेखन हे जरी घडलेल्या इतिहासावर आधारित असले, तरी लिहिणाऱ्या व्यक्तीची ती निर्मिती असते. ही व्यक्ती कोणत्यातरी युगाची, समाजाची , मुख्यव्यवस्थेची प्रतिनिधी असते. या प्रतिनिधीत्वाची छाप तिच्या निर्मितीवर पडलेली असते.

इतिहासलेख ही दिर्घकाळ चालत आलेली आणि अखंड चालू राहणारी शोधयात्रा आहे. म्हणूनच कोणतेही इतिहास लेखन परिपूर्ण आहे असे मानता येत नाही. हे सर्व नमुद करण्याचे कारण असे की जेव्हा एखादा नवीन इतिहास प्रवाह अवतरतो तेव्हा त्याकडे चकीत किंवा कुत्सीत भावनेने पाहणे योग्य नाही. नवीन इतिहास प्रवाहामुळे इतिहासाच्या मुख्य प्रवाहाला नवे वैचारिक व मुल्यात्मक बळ मिळू शकते व मिळत आहे. हाच मुद्दा महत्वाचा मानुन प्रस्तुत निबंधात, इतिहास लेखनात अगदी अलिकडे नव्याने येत असलेल्या लेखनप्रवाहाची मांडणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधन पध्दती :—** प्रस्तुत शोधनिबंधात इतिहासाच्या नवनवीन लेखनप्रवाहाचा व विचारप्रवाहाचा शोध घेउन त्यांची विश्लेषणातत्मक पध्दतीने मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**गृहितके :—** १) इतिहासातील नव्या लेखन प्रवाहामुळे इतिहासाचे सुक्ष्म अध्ययन करणे अधिक सोपे होईल.

२) नव्या लेखनप्रवाहामुळे इतिहासाचा तौलनिक अभ्यास करता येईल.

३) नव्या प्रवाहामुळे इतिहासलेखन विविधांगी पध्दतीने होईल.

**इतिहासलेखनातील नवे प्रवाह:—**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

एकोणीसाच्या शतकातील दुसऱ्या अर्धेशतकात विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीनंतर इतिहासातील संकल्पनांवर खुप प्रभाव पडला. एकीकडे शास्त्रीय इतिहास व ऐतिहासिक उत्क्रांतीचा परिणाम म्हणून दंतकथात्मक इतिहासाची वाढ झाली. या दोन टोकाच्या अंतविरोधी प्रवाहामुळे वास्तव इतिहासाला ग्रहण लागले संशोधकांसाठी , त्यांच्या संशोधनाला इतिहासात स्थान मिळाले तर सामान्य व्यक्तींना इतिहास म्हणजे मृत ओझे वाटले. परंतु सांस्कृतिक प्रगतीबरोबर मानवाला आपल्या अस्तीत्वासाठी इतिहासाचा आश्रय घेणे अपरिहार्य ठरले.

परंपारिक इतिहास लेखनात घटनांचा शोध घेउन अनेक शास्त्रांचे साहय घेउन त्याचे स्पष्टीकरण केले जाते. काळा बरोबर इतिहासाच्या पुनर्लेखनाची गरज पडते. अनेक सिध्दांत व दृष्टीकोण अस्तित्वात येतात. व त्यानुसार ऐतिहासीक घटनांची मांडणी केली जाते. ही प्रक्रिया अव्याहत चालू आहे. आधुनिक लेखनशास्त्रावर मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा, सिगमंड फ्राइडच्या मनोविश्लेषणात्मक पध्दतीचा व अल्बर्ट आइन्स्टइनच्या सापेक्षतावादाचा मोठा प्रभाव आहे. तसेच अलिकडे अमेरिकेत ब्समवउमजतपब पध्दतीचा अवलंब करून प्रतिमा, चिन्हे,बिजगणित , भूमिती व संगणक प्रक्रियेचा उपयोग ऐतिहासिक विश्लेषणासाठी केला जात आहे.

इतिहासलेखनशास्त्रात एकोणिसाव्या शतकात , स्वच्छंदतावादी, उपयुक्ततावादी , बोधवादी, प्रत्यक्षार्थवादी यासारखे इतिहासलेखनाचे प्रवाह उदयास आले. त्याचबरोबर पुढे जहाल, बुध्दिवादी, मार्क्सवादी, आर्थिक, तटस्थतावादी इत्यादी इतिहासलेखन प्रवाहाद्वारे इतिहासाचे वेगवेगळे पैलू मांडण्यात येउ लागले परंतु अजुनही नवनव्या दृष्टीकोनातून इतिहासाकडे पाहिले जात.असल्यामुळे नवनवीन प्रवाह उदयास येत आहेत. इतिहास लेखनातील अत्यंत आधुनिकतम प्रवाह कोणते आहेत याचा विश्लेषात्मक परिचय संशोधकांना असणे गरजेचे आहे.

**१) संरचनावादी इतिहासलेखन :– ;`जतनबजनतंसपेउद्ध**

फ्रेंच तत्वज्ञ सासूरे ॅ;नेनतमद्ध हे संरचनावादी हे संरचनावादी इतिहासलेखनाचे जनक आहेत. मानववंशशास्त्र , भाषा, व इतिहास या शास्त्रात संरचनावादी पध्दतीचा वापर किंवा उपयोग करण्यात योतो . या पध्दतीत एखादया विशेष गोष्टीचे ज्मगज नुसार पध्दतशिर विश्लेषण करतात. विश्लेषण करताना छोटया गोष्टीवर विशेष भर देउन एक संरचना निर्माण केली जात असते.

**२) उत्तर संरचनावादी इतिहासलेखन :– ; क्मबवदेजतनबजपवदसपेउद्ध**

उत्तर संरचनावादी ही संकल्पना लेखनक्रियेशी संबंधीत असून फ्रेंच तत्वज्ञ श्रंबफ्रमे क्मततपकमद्ध हयांना या पध्दतीचा जनक मानले जाते. इतिहासलेखनातील ही अत्याधुनिक संकल्पना आहे. याचा उददेश भाषा आणि शब्दातील अंतविरोध

स्पष्ट करणे हा आहे. ऐतिहासिक लेखनाद्वारे किंवा त्याच ज्मगज ने एखादी गोष्ट आहे हे सिध्द केले जाते. त्याच ज्मगज चा वापर करून ते तसेच कसे नव्हते याचा अभ्यास या पध्दतीत केला जातो. कारण एका शब्दाचे अनेक अर्थ होतात. त्यातुन लिहिणारा , वाचणारा, सागणारा, ऐकनारा, यांच्यात गल्लत होण्याची शक्यता असते. त्यामुळे वस्तुत: जे आहे त्या पेक्षा वेगळेच बाहेर येण्याची जास्त शक्यता असते.

**३) नवीन इतिहासलेखन ;छमू भ्पेजवतल द्ध**

साधनांचे नवीन पध्दतीने संघटन व विश्लेषणात्मक निवेदन करणे, नवीन समस्या किंवा प्रश्नांची उपस्थिती करणे, जे घडले ते तसेच का घडले त्याच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न छमू भ्पेजवतल डमजीवक मध्ये होत असलेला दिसतो.

**४) विश्लेषनात्मक इतिहासलेखन :– ; जीम ।ददंसमे बीववसद्ध**

पॅरिसमध्ये ; जीम ।ददंसमे बीववस चा उदय झाला डंतब ठसवबी, जीम ।ददंसमे बीववस ठतंनकमस चा उदय झाला डंत ठसवबी, स्नबपंद थ्मइनतमए थ्मतददंक ठतंनकमस हे या प्रवाहाचे जनक आहेत. त्यांनी समाजशास्त्र अर्थशास्त्र कायदाशास्त्र, भुगोल, लोकसंख्या इत्यादी विषयांवर अधिक भर देउन इतिहासाची मांडणी केली अन्नपुरवठा अन्नधाण्याच्या किमंती यांच्या आंतर संबंधावर भर दिला. घटनांच्या वर्णनाबरोबरच घटनांमागील कारणमिमांसेवर विवेचन करण्याची पध्त या लेखनप्रवाहात दिसून येते.

५) इतिहासविरोधी प्रवाह ; ।दजप.भ्पेजवतलद्ध

मायेकेल फुको ; डपबीमस थ्वनबंनसजद्ध फ्रेंच विचारवंताने ; ।दजप.भ्पेजवतलद्धया भुमिकेतून लेखन केले. परंपरागत लेखनशास्त्र, लोकजाणिना व सामाजिक अस्तित्वाला नाकारणे हा त्याच्या लेखनाचा मुख्य हेतू आहे. त्याच्या मते, इतिहास म्हणजे घटनांचा ढिग असून ऐतिहासिक घटनांमध्ये परस्परसंबंध नसतो . त्यामुळे इतिहास लेखनाची दिशा चुकलेली आहे असे तो म्हणतो.

६) वंचितांचा इतिहास ;ैनइंसजमतद भ्पेजवतलद्ध :–

सबाल्टर्न स्टडीजचा जनक इटालियन मार्क्सवादी विचारवंत अॅटोनिओ ग्रमचि हा होता. मार्क्सवादाला सांस्कृतिक बाबींची जोड देउन त्याने सबाल्टर्न स्टडीजची मांडणी केली. सबाल्टर्न स्टडीज म्हणजे इतिहासाची तळाकडून मांडणी होय. ; भ्पेजवतल तिवउ इमसवूद्ध भारतीय इतिहासलेखनात या प्रवाहाकडे आजकाल मोठया सकारात्मकतेने पाहिले जात आहे. या नव्या प्रवाहाने या देशातील मुलनिवासी ,शुद्र, बहुजन व स्त्रिया या वंचित राहिलेल्या घटकांवर प्रकाश टाकण्याचे कार्य केले आहे फुले आंबेडकरवादी इतिहासलेखनाद्वारे हे कार्य मोठया प्रमाणात झाले आहे परंपरागत इतिहासलेखनात समाजातील उच्च वर्गाचे जीवन रेखाटलेले दिसते परंतु उपेक्षीतांनी केलेले श्रम , त्यांची संस्कृती, जीवनपध्दती, परंपरा, भाषा , विज्ञान यांचाही इतिहासावर मोठा प्रभाव पडलेला असतो तो मात्र लिहिलाच गेला नव्हता . इतिहासात सामान्य लोकांचे प्रतिनिधित्व ठळकपणे मांडण्याचे कार्य वंचितांच्या इतिहासलेखनाद्वारे

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

होत आहे. सबाल्टर्न स्टडीज मधुनच अलिकडे स्त्रीवादी इतिहासेलखन ; ळमदकमत .भ्पेजवतपवहतंचीलद्धए आदिवासी इतिहासलेखन ; ज्तपइसम भ्पेजवतपवहतंचीलद्ध यासारखे नवे इतिहासप्रवाह पुढे येत आहेत.

७) राष्ट्रवादी इतिहासलेखनः—

अलिकडे भारतात राष्ट्रीय दृष्टीकोनातून इतिहासलेखनाचे कार्य अखिल भारतीय इतिहास संकलन समितीद्वारे केले जात आहे. युरोपातही अशाप्रकारे आपल्या राष्ट्राचे सर्व श्रेष्ठत्व सिध्द करण्याच्या दृष्टीने लेखन करणारा एक इतिहासकारांचा वर्ग सक्रिय आहे. परंतु हा प्रवाह एकांगी स्वरूपाचा असून अतिरेकी राष्ट्रभिमान निर्माण करण्या करीता ऐतिहासीक सत्याची मोडतोड करीत असलेला दिसून येतो.

८) संप्रदायवादी इतिहासलेखन :— ; बवउउनदंस भ्पेजवतपवहतंचीलद्ध विशेषताः भारतीय संदर्भातच विचार केल्यास या प्रकारच्या लेखनाला अलिगड विद्यापीठात अधिक प्रोत्साहन मिळालेले दिसून येते या संप्रदायवादी लेखनात धर्म,रूढी, परंपरा सामाजिक नितीनियम यांचा आधार घेउन सांप्रदायिकता वाढविणारे लेखन होते. काही हिंदुत्ववादी संघटनांनी सुध्दा अशा प्रकारच्या लेखनाला उत्तेजन दिलेले दिसून येते

निष्कर्ष :—

इतिहासलेखन हे सत्यावर आधारित असावे असे मानले जाते. शास्त्रीय पध्दतीने घटनांची मांडणी इतिहासलेखनात करणे आवश्यक असते. स्पष्टता , वस्तुनिष्ठता ,तर्कशुध्दता, प्रमाणता ही शास्त्रीय इतिहासलेखनाची वैशिष्टये इतिहासलेखन प्रवाहाने जपने आवश्यक असते.

हे सर्व प्रवाह इतिहासात नव्याने आले असल्यामुळे इतिहासाचा अभ्यास अधिक सुक्ष्म होत जाणार हे निश्चित आहे. या प्रवाहामुळे विविधांगाने इतिहासाची मांडणी केली जाणार आहे. त्यामुळे इतिहासाच्या दालनात अधिक भर पडेल यात शंका नाही. हे सर्व खरे असले तरी इतिहासाच्या अभ्यासकांना या सर्व इतिहासलेखन प्रवाहाबाबत अधिक चौकस राहुन तटस्थतेने सत्यान्वेषी इतिहासाची मांडणी करण्यावर भर द्यावा लागेल. तरच ऐतिहासीक वास्तवाला न्याय मिळू शकेल.

संदर्भग्रंथः—

1) डवरनउकंत त्ंब्ररू. भ्पेजवतपवहतंचील पद उवमतद प्दकपं
2) ैमद ेण्चण रू. भ्पेजवतपंदे + भ्पेजवतपवहतंचील पद उवकमतद प्दकपं
3) ळनींं त्ंदरपज रू. ैनइंसजमतद ैजनकपमे अवसण ए ; मकद्ध
4) ज्तंअवत त्वचमत भ्त्ंरू. श्रवनतदंस व िउवकमतद भ्पेजवतल

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

5) स्न्रंततंहं ।सइमतजव रू. जीम ।तबीमवसवहल व  िदवूसमकेमण

6) थ्वनबंनसज डपबीमंसरू. जीम ।तबीमवसवहल व  िदवूसमकेमण

7) भागवत विद्युत , परदेशी प्रतिमा :– स्त्रिवादी इतिहासलेखनाच्या दिशेने

8) दिक्षित राजा:– स्त्रिवादी इतिहासलेखन तळाकडून इतिहास (लेख )

9) समाजप्रबोधन पत्रिका :– इतिहासलेखन मिमांसा

## इतिहासलेखनातील नवे प्रवाह

प्रा. डॉ. ओ.म.गजभिये
इतिहास विभाग प्रमुख
एम.ई.एस.कला.वाणिज्य महाविद्यालय
मेहकर

**सारांश**

इतिहासलेखनाच्या क्षेत्रात कालपरत्वे नवनवी भर पडत असते. ऐतिहासिक तथ्यांची नव्या पध्दतीने मांडणी करण्याचा प्रयत्न संशोधक करीत असतो. त्यामुळे इतिहास वैविध्यपुर्ण पध्दतीने, नव्या व्याख्यांसह लोकांपुढे येतो. इतिहास हा तसा वादाचा विषय राहिलेला असल्यामुळे मतांची विभिन्नता हे इतिहासाचे वैशिष्टयच राहिलेले आहे. गतशतकामध्ये इतिहास लेखनाचे अनेक

प्रवाह होते. परंपरावादी , उपयुक्ततावादी, साम्राज्यवादी, मार्क्सवादी, तटस्थतावादी, बुध्दिवादी या दृष्टीकोणातुन इतिहासलेखन मोठया प्रमाणात झाले परंतु अलिकडे इतिहासलेखनाचे दालन समृध्द होत आहे. संरचनावादी, उत्तर संरचनावादी , छमू भ्पेजवतलए ।ददंसमे ए ।दजप भ्पेजवतलए`नइंसजमतद या सारख्या नव्या प्रवाहांची इतिहासात पडणारी भर इतिहासाला विविधांगी बनवित आहे. राष्ट्रवादी व संप्रदायवादी इतिहासलेखनावरही मोठा भर देण्यात येउ लागला आहे. महाराष्ट्रात फुले—शाहू —आंबेडकरांच्या विचारांनी प्रभावीत झालेल्या वर्गाने इतिहासलेखनाला आणखी वेगळे परिमाण प्राप्त करून दिले आहे. या सर्व नव्या प्रवाहामुळे इतिहासाची कक्षा रूंदावत असली तरी संशोधकांनी सत्यान्वेषी राहून शास्त्रीय पध्दतीनेच इतिहास मांडणी करणे आवश्यक आहे.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

५

# ‘‘वारकरी संप्रदाय व संत तुकारामांचे तत्वज्ञान’’

**लक्ष्मण गजानन गणगे**
संशोधक विद्यार्थी
इतिहास विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,औरंगाबाद.

- **प्रस्तावना :**

वारकरी संप्रदायाची सुरूवात ही तेराव्या  ातकापासून पहायला मिळते. संप्रदायाचा उगम पुंडलीकापासून जरी झाला असला तरी या संप्रदायाला तात्विक अधि  ठाण प्राप्त करून देण्याचे कार्य संत ज्ञानेश्वरांनी केले. ज्ञानेश्वरांनी संप्रदायाचा पाया रचला, संत एकनाथांनी खांब बांधण्याची कार्य केले तर संत तुकरामांनी त्यावर कळस बांधला असे म्हटले जाते, असे असले तरी इतर संतांचे कार्यही महत्वपूर्ण आहे. संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाला महारा  ट्राबाहेर नेण्याचे कार्य केले. मुख्यत: त्यांनी पंजाब प्रांतामध्ये संप्रदायाला भक्कम केले. जवळ—जवळ अठरा व  ि त्यांनी त्या कालखंमामध्ये सर्वसामान्य जनतेला वारकरी संप्रदायाची ओळख करून दिली व जनतेला संप्रदायाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे महान कार्य केले. त्यांच्या कार्याची पावती म्हणून ‘गुरूग्रंथसाहिबामध्ये’ त्यांचे अभंग दिसून येतात.

वारकरी संप्रदायाची मुख्यता पाच कालखंडामध्ये विभागणी केली जाते. ही विभागणी इतिहास अभ्यासासाठी होय. आरंभचा अथवा श्री ज्ञानेश्वरांच्या पूर्वीचा काळ, श्री ज्ञानदेव व नामदेव यांचा काळ, श्री भानुदास व एकनाथ यांचा काळ, श्री तुकोबा व निळोबा यांचा काळ तदनंतरचा तीनशे व  ाॅंचा काळ.

या कालखंडात अनेक महान संत होऊन गेले. त्यांनी अभंग, ओव्या, किर्तन, भजन इत्यादी माध्यमातुन संप्रदायाला भक्कम बनवण्याचे कार्य केले व तळागळातील लोकांपर्यंत संप्रदायाला पोहचवले. मुख्यता ग्रामीण भागामध्ये संप्रदायाची लोकप्रियता अधिक असल्याचे दिसते. संतांनी महारा  ट्रात भागवत धर्माचे मंदिर उभारले. त्याचा इतिहासच संत जनाबाई साररूपात सांगतात.

संतकृपा झाली । इमारत फळां आली।

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ।।

नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।।

जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।

तुकाझालासे कळस । भजन करा सावकाश ।।

बहिणाबाईने सांगितलेल्या या इतिहासातील 'ज्ञानदेवे रचिला पाया' या विधानाचा आशय परमार्थनेच घ्यावा लागतो. ज्ञानदेवांनी  ुध्द भक्ति तत्वावर अधि ठत असलेल्या या उपासनामार्गास ज्ञानेश्वरीच्या रूपाने तात्विक अधि ठान प्राप्त करून दिले, एवढाच तिच्या या विधानाचा आशय. ज्ञानदेवांच्या कर्तृत्वामुळे हा संप्रदाय जनमानसावर प्रभाव गाजवून महारा ट्राव्यापी झाला. (गोसावी रा. र. १७४, १७५) संत बहिणाबाई या एक उच्च दर्जाच्या स्त्री संत होऊन गेल्या त्यांनी आपल्या आयु यात कमालीची हालअपे ठा सहन केल्या, पण विठठलभक्ती सोडली नाही. त्यांना स्वप्नात तुकारामांनी दृ टांत देउन शि यत्व दिले होते. त्या तुकोबांच्या समकालीन तुकोबांचे दर्शन लाभलेल्या, तुकोबांबरोबर वावरलेल्या त्यांचे अभंग त्यांच्याच तोंडून ऐकण्याचे भाग्य मिळालेल्या. त्यांनी ११६ अभंगाचे आत्मचरित्र लिहून ठेवले म्हणून आज आपणास तत्कालीन समाजाचा सनातनी विचारांमुळे विद्रुप झालेला चेहरा दिसू ाकला.(दै. लोकसत्ता, ११ जुलै, २०१६)

- **वारकरी संप्रदायाचा आदय प्रवर्तक –**

अगोदरच चर्चा केल्याप्रमाने या संप्रदायाचा उगम भक्त पुंडलीकापासून झाल्याचे मानले जाते. त्यासंबंधीची कथा ही 'स्कंद' व 'पद्म' पुराणात सांगीतली जाते. पुंडलीकाच्या काळासंबंधी इतिहास अभ्यासकांमध्ये एकवाक्यता नाही व तसा ठोस पुरावा मिळालेला नाही. पुंडलीकाच्या काळाबाबत ां.वि.पाटिल म्हणतात, संत पुंडलीकाचा काळ ाालिवाहन ाकांचे पहिले ातक धरल्यास पंढरपूरास एकोणिसशे व ाांचा इतिहास आहे. रा.चि.ढेरे पुंडलिका वि ायी आपले मत मांडतांना लिहीतात,'गेली सात–आठ ातके महारा ट्राच्या इतिहास–भुगोलावर अधिराज्य गाजवणारा विठ्ठल हा वि णू वा कृ ण असून कोणा पुंडलीक नामक पुरू ााच्या

मातृपितृभक्तीने प्रसन्न होऊन तो पंढरपूर या क्षेत्रात विसावला आहे. अशी त्याच्या अवताराची कथा मराठी सतपरंपरेच्या आदिकाळापासून श्रध्दापूर्वक स्वीकारली गेली आहे. परंतु प्रयत्न करूनही अभ्यासकांना अजून पुंडलिकांची उपलब्धी इतिहासात झालेली नाही'. (रा.चि.ढेरे, विठ्ठल एक महासमन्वय, १८५)

ग.ना.जोशी भारतीय तत्वज्ञानाचा बृहद् इतिहासामध्ये आठव्या खंडात पुंडलिकावि यी विवेचन करतात, 'पदमपुराणातील कथेनुसार पुंडलिक हा प्रथम स्त्रीलंपट आणि माता–पित्यांची अवहेलना करणारा असा होता. परंतु पुढे कुक्कुटस्वामींची भेट झाल्यावर त्याच्यात परिवतर्न झाले. वतो माता–पित्याचा परमभक्त बनला. लोहदंडक्षेत्री (पंढरपूर) सेवा करीत असता भगवान श्रीकृ ण रूक्मिणी विठ्ठल व रूखमाबाईच्या रूपाने त्याच्यासमोर येऊन माता–पित्याच्या सेवेत खंड पडू नये म्हणून पुंडलिकाने जवळ असलेली वीट फेकून 'विठ्ठल रखुमाईला' आपली सेवा पूर्ण होईपर्यंत त्या विटेवर उभे राहण्यास विनंती केली. ती ऐकूण विठ्ठल त्या विटेवर उभा राहिला तो कायमचाच 'युगे अठठाविस विटेवरी उभा' अशी रचना आपल्याला दिसते.( ग.ना.जोशी, खंड ८, पृ.५८)

- **संप्रदायाचे उपास्य दैवत व तिर्थक्षेत्रे –**

वारकरी संप्रदायाचे प्रमुख आराध्य दैवत पंढरपूरचा श्री विठ्ठल होय. विठ्ठलाचा उल्लेख इ.स. सहाव्या तकापासून मिळतो. रा ट्रकुट राजा अविध्येयच्या ताम्रपटात विठ्ठलाचा उल्लेख आहे. ज्ये ठ पुरातत्ववेत्ते डॉ.गो.ब.देगलूरकर यांच्या मते श्री विठ्ठलाची मुर्ती सहाव्या तकातील असावी कारण उत्तम मुर्ती गुप्त काळातच तयार केल्या गेल्या. (दै. दिव्य मराठी, १२ जुलै, २००९) शिलालेखांच्या आधारेही विठ्ठलाचा कालखंड ठरवण्यात मदत होते. होयसाठ राजाचा शिलालेख इ.स.१२३७ (शके ११५७) ला मिळालेला शिलालेख आहे. तो सोहळा खांबी मंडपाच्या तुळईवर तिन्ही बाजूने लिहिलेला आहे. तो संस्कृत आणि कानडी अशा समिश्र भा ेत देवनागरी लिपीत आहे. त्याच्यात पुंडलीक मुनीचा व विठ्ठल देवतेचा उल्लेख आहे. तसेच तुळईच्या पूर्वभागातील ७१ व्या ओळीत वारीचा उल्लेख आहे. पंढरीच्या वारीचा उल्लेख हा सर्वात प्राचीन उल्लेख आहे. (लोकराज्य, ऑगस्ट २०१८,पृ. १४)

'विठ्ठल' हा ब्द वि णू या ब्दाचा अपभ्रंश कानडीमधून आला आहे. की प्राकृतमधून यावि यी विद्ववानांमध्ये मतभेद आहेत. भांडारकरांच्या मते हा अपभ्रंश कानडीतून

आलेला आहे. कानडी शिलालेखात विटट्, विटट्रस, बिटट्रस अशा प्रकारची नावे आहेत. त्यावरून श्री ग.ह.खरे यांना वाटते की, हा अपभ्रंश 'वि णू' या ाब्दाचा असून तो कानडीत झाला आहे. तुळपुळे यांच्या मते, विठठ्ल हे दैवत आणि पंढरपूर हे क्षेत्र मुळातच कर्नाटकी असावेत व विठठ्ल हे नावही 'वि णू' या ाब्दाच्या 'कानडी' अपभ्रशांपासून आले असावे. पंढरपूरचा विठठ्ल संप्रदाय मुळचा कानडी दिसतो. कारण चौडरस, पुरंदरदास, कनकदास इत्यादी प्राचीन कानडी संतकवींचे 'विठठ्ल' हेच एकमेव दैवत होते. तसेच 'पंडरिगे' या कानडी ाब्दापासून 'पंढरपूर' हे नाव नि पन्न झाले असावे.(ग.ना.जोशी, खंड ८,पृ.५७)

पंढरपूरच्या विठठ्लाच्या मुर्तीवि यीही अभ्यासकांमध्ये मतांत्तरे दिसून येतात. विठठ्लाच्या आद्यमुर्तीची निश्चिती करण्यासाठी डॉ.ढेरे यांनी स्कांन्द आणि पाहम या हेमाद्रिपंडित पूर्वकालीन पांडुरंगमहात्म्यात वर्णिलेल्या, विठठ्लमूर्तीच्या वक्ष:स्थलावरील मंत्राचा तथा 'वर्णराजी' चा आधार घेतला आहे. हा मंत्र कूटमंत्र आहे. त्यांचा उलगडा त्यांनी तज्ज्ञांकरवी करून घेतला आहे. हाच मंत्र त्यांना पंढरपूरपासून वीस मैलांवर असलेल्या माढे येथील विठठ्लमंदिरात विराजमान असलेल्या विठठ्लमूर्तीच्या वक्षस्थलावर कोरलेला आढळून आला. आज पंढरपूर येथील विठठ्लमंदिरात विद्यमान असलेल्या विठठलमूर्तीच्या वक्षस्थलावर मात्र हामंत्र नाही. त्यावरून त्यांनी असा नि क र्ा काढला आहे, की पांडूरंग महात्म्यात वर्णिलेली विठठ्लमूर्ती ही मुळची विठठलमूर्ती होती. आज ती नाही.(रा.र.गोसावी,१९१) रा.चि.ढेरेंनी सध्याची असलेली विठठ्लमूर्ती ही आद्य नसून माढयाची विठठ्लमूर्ती ही आद्य असल्याचे सांगितले या विधानावर आक्षेप घेउन माढयाची मूर्ती आद्य आहे असे डॉ. सदानंद मोरे यांनी सप्रमान सिध्द केल्यावर व मोरे यांच्या मताचे डॉ. ढेरे यांना खंडन करता न आल्याने, त्यांनी पवित्र बदलून कोण्या एका सन्याशाने आद्य विठठ्लमूर्तीला इजा केल्यामुळे बडव्यांनी मूर्ती बदलली व तिच्या जागी सांप्रतच्या नव्या मुर्तीची प्रति ठापणा केली अशी भुमिका घेतली त्यावर भारत इतिहास संशोधन मंडळात चर्चासत्र होउन त्यात, सदानंद मोरे यांनी सप्रमान सिध्द केलेली सांप्रत विटेवर असलेली मूर्ती हिच आद्य मूर्ती आहे. इजा झालेल्या भागाला टेकू देउन तीच पुन्हा प्रस्थापीत केली असे मान्य झाले.(लोकराज्य, ऑगस्ट,२००८,१५)

विठठ्लाच्या मूर्तीवि यी अनेक प्रवाद पहायला मिळतात याला ऐतिहासीक दृ टया वस्तुस्थितीचा विपर्यास करने असे म्हणता येईल. विठठ्लाची लोकप्रियता पाहता असे प्रवाउ उभे राहने काही आश्चर्याचे नव्हे.

वारकऱ्यांच्या तिर्थक्षेत्रांचा विचार करता पंढरपूर हे सर्वात प्रसिध्द असे तिर्थक्षेत्र आहे यात काही दुमत नाही. याच ठिकाणी लाखो भाविक आ ाढी आणि कार्तीकिच्या वारीच्या निमीत्ताने एकत्र येऊन भजन, किर्तनात तल्लीन होऊन जातात.येथे येणारे वारकरी हे कोण्या एका जाती धर्माचे नसून ते येथे एक वारकरी म्हणून येतात. जातीची कोणतीही सिमा येथे नाही सर्व वारकरी हे विठ्ठलाचे भक्त म्हणून एकत्र येतात. इतरही महत्वाचे तिर्थक्षेत्रे आहेत ते संतांच्या जन्मामुळे म्हणा किंवा त्यांच्या वास्तव्यामुळे प्रसिध्द झालेले आहेत. ज्यात आळंदी, देहू, पैठण, त्र्यंबकेश्वर, पिंपळनेर, सासवड, मंगळवेढे, नेवासे ही स्थाने वारकऱ्यांसाठी पवित्र आहेत.

- **संत तुकारामांचे व्यक्तिमत्व –**

संत तकाराम महाराज हे महारा ट्राचे असाधारण वैभव आहे. त्यांच्या असामान्य व्यक्तिमत्वाची छाप आजही कायम आहे. जनसामान्यानां जवळचा वाटणारा, आपल्यातला वाटणारा, अतिशय रसाळ, प्रासाविक व उत्कृ ट अभंग लिहणारे अत्यंत साधी–सोपी वाणी असणारे संत होत. श्रीनाथांनी आपला देह ज्या साली ठेविला त्यानंतर सुमारे नऊ व ानी इंद्रायणीच्या काठी पुण्यापासून पंधरा मैलाच्या अंतरावर असलेल्या देहू गावी श्रीतुकाराम महाराज यांचा जन्म झाला याच संतवीराने वारकरी मंदिरावर कळस चढविला असे आपल्या अभंगात बहिणाबाईने म्हटले आहे. स्वत: अत्यंत हालअपे ठा सोसून स्वत:च्या संसारावर स्वहस्ते अग्नि ठेऊन याच वारकरी ूराने हा पुण्यधर्म वाढता केला.

संसाराच्या नावे घालूनिया ुन्य ।
वाढता हा पुण्यधर्म केला ।
हरिभजनें हे धवळिले जग ।
चुकविला लाग कलिकाळाचा ।। (शं.वा.दांडेकर, पृ.४८)

साधारणत: ३५० ते ४०० व ापूर्वी आपल्या जिवन संघ ातून ाब्दधन व्यक्त करणारा कवी संत तुकाराम आजही सामान्य माणसाचे श्रध्दास्थान आहेत. अत्यंत प्रतिकूल सामाजिक, आर्थिक परिस्थितीत भोळया जनतेला जगण्याचे बळ तुकारामांनी दिले. मानव जातीने नव्हे तर कर्तृत्वाने श्रे ठ होतो. ौर्य आणि निर्भयता या बाण्याने लिहिणारे व जगणारे तुकाराम हे वर्णाने वाणी, वृत्तीने ेतकरी, कृतीने समाजसुधारक, विचारांनी तत्वचिंतक आणि प्रतिभेणे अभंग रचना करणारे महाकवी होते असे प्रतिपादन प्रा.डॉ.एस.एम.कानडजे यांनी केले आहे. (इ.लोकसत्ता

एप्रिल, १८,२०१३) तुकारामांच्या प्रतिभेमुळे व त्यांच्या कार्यामुळे त्यांच्यानंतर होउन गेलेल्या समाज सुधारकांना प्रेरणा मिळाली ऐकोणिसाव्या ातकातील प्रभोधनाचे नायक संत तुकाराम असल्याचे सदानंद मोरे सांगतात. महात्मा फुलेंनी तुकारामांचे वर्णन अत्यंत मार्मीक केलेले आहे. ते म्हणतात शिवाजी महाराज हे ोतकऱ्यांचे राजे, तर संत तुकाराम हे ोतकऱ्यांचे संत होत फुलेंवरही तुकारामांच्या विचारांचा प्रभाव असल्याचे दिसून येते. तुकारामांनी रचलेल्या अभंगाची छाप फुलेंनी रचलेल्या अभंगांवर दिसून येते. आजही समाजप्रबोधनासाठी संत तुकारामांचे अभंग उपयोगी ठरतात. किर्तनामध्ये मुख्यता तुकारामांची अभंग गायली जातात, व त्यामाध्यमातून समाजजागृती करण्याचे काम केले जाते.

- **अद्वैती तत्वज्ञान –**

संत तुकारामांनी आपल्या कृतीतून रचनेतून जी शिकवण दिली त्यातून आपण त्यांचे तत्वज्ञान समजून घेऊ ाकतो. वारकरी पंथ हा भक्तिप्रधान असला तरी त्याची बैठक नुसत्या भावनेवर उभारलेली नाही. तुकोबा हे प्राधान्याने भगवद्भक्त असले आणि युक्तीपेक्षा भक्तीकडे त्यांचा अधिक ओढा असला तरी महारा ट्रातील भागवतधर्माचे अद्वैत तत्वज्ञान त्यांनी आत्मसात केले होते. जो भगवंत त्यांचा 'सखा'झाला होता आणि ज्याची वाणी त्यांच्या मुखावाटे अभंगरूपाने प्रकट होत होती त्या भगवंताच्या मूळ स्वरूपावि ायी आणि जिवजगतावि ायी त्यांचे विचार काय होते हे माहित करून घेणे महत्वाचे आहे.

वारकरी संतांनी जे तत्वज्ञान मांडले ते महारा ट्राच्या गरजेतून निर्माण झालेले होते. अनेक तऱ्हेचे भेद आणि उच्च–निच, भाव यांच्यावर आधारलेली समाजरचना अनेक देवतांच्या उपासनेमुळे रूढ असलेले असंख्य धर्मप्रकार यामुळे सामाजिक अव्यवस्था आणि धार्मिक गोंधळ माजून राहिला होता. या गोंधळातून समाजाच्या आणि धर्माच्या एकीकरणाची गरज उत्पन्न झाली म्हणून संतांनी अद्वैत तत्त्वज्ञानावर आधारलेल्या वै णव धर्माचा पुरस्कार केला एकेश्वरी संप्रदायाचा उदय त्या काळी इतरत्रही होत होता. लिंगायत, महानुभाव आणि नाथ पंथ हे तिन्ही संप्रदाय एकेश्वरी धर्माचे पुरस्कर्ते होते. संत चळवळीला वै णव धर्मापासून जशी स्फूर्ती मिळाली तशीच ती नाथ पंथापासूनही मिळाली होती.(सुंढणकर,बा.रं,पृ.३८)

तुकोबा अद्वैती ब्रम्हज्ञानाचे स्वरूप सांगतांना लिहीतात

न करी रे संग राहोरे निश्चल । लागो नेदी मल ममतेचा ।

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

या नावे अद्वैत खरें ब्रह्मज्ञान । अनुभवांवाचून बडबड ते।
इंद्रियाचा जय वासनेचा क्षय । संकल्पाही न ये वरी मन ।
तुका म्हणे न ये जाणिव अंतरा । अंतरी या धारा आनंदाचा ।। (तु.गा., अं.क्र.११२)

तुकारामांनी आपल्या अद्वैत ब्रह्मज्ञानाची अनुभूती सांगितली आहे. मनावर विजय मिळवून वासनेचा क्षय करून निश्चल राहण्याचे ते सांगतात. अद्वैत हेच खरे ब्रह्मज्ञान अनुभवावाचून केलेले अद्वैतविवेचन हि केवळ बडबड होय. मनावर पूर्ण ताबा मिळाल्याशिवाय इंद्रियावर विजय प्राप्त करता येणे अशक्य आहे. या संदर्भात तुकोबा अभंग रूपाने वर्णन करतात.

नाही देवापाशी मोक्षाचे गाठोडे । आणूनि निराळे द्यावे हाती।
इंद्रियाचा जय साधुनिया मन । निर्वि ाय कारण असे तेथे ।।
उपास पारणी अक्षरांची आटी । सत्मर्मा ोवटी असे फळ ।
रडे उडतियासवें मिथ्या ।। तुका हसणे फळ आहे मूळापाशी ।
ारण देवासी जाय वेगी ।। (तुकाराम अभंग गाथा,२३२५)

आपल्या हाती स्वाधीन करावे असे आयते मोक्षाचे गाठोडे भगवंताच्याजवळ नाही मोक्षासाठी इंद्रियावर जय मिळवून मन ताब्यात आणावे म्हणजे वि ाय पूर्णपणे काढून टाकणे हे आवश्यक आहे. उपवास नाममंत्राच्या जपाद्वारे पुण्याचे फळ मिळते आसक्ती बाळगून संकल्प करण्याचा सोस टाकून दे. मग दु:ख असे काही नाही, ते तुला कळून येईल स्वप्नातील जखमांनी फुकट विव्हळत बसला आहेस. रडणाऱ्याबरोबर रडणे हे मिथ्या आहे. तुकाराम महाराज म्हणतात, मुळच्या देवाला ारण जा म्हणजे सर्व फलप्राप्ती होईल.

तुकारामांच्या अद्वैती तत्वज्ञानावि ायी ग.ना.जोशी लिहीतात, 'इतर वारकरी संतांप्रमाणेच तुकाराम हे अद्वैवादी किंवा अद्वैती होते. वारकरी संप्रदाय अद्वैत भक्तीचा पुरस्कर्ता आहे. तेच तुकारामांचे तत्त्वज्ञान आहे. मात्र ते त्यांनी आपल्या निखळ अनुभवाच्या जोरावरच सांगितले आहे. उच्च धार्मिक, तात्विक व आद्यात्मिक ग्रंथ वाचून व त्यांच्यापासून उसने घेऊन सांगितलेले नाही, अद्वैत दर्शनातीलच उदाहरणे, दृ ांत, उपमा वगैरे त्यांनी वापरलेल्या आहेत. पण ते सर्व उसनवारी करून नव्हे तर स्वनुभवाच्या निक ावर घासून पाहून'.(ग.ना.जोशी,खंड७,पृ.१५५)

- **समतेचा पुरस्कार–**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

वारकरी संप्रदायाची शिकवनच मुळात समतेच्या तत्त्वावर आधारलेली आहे. वारकरी संप्रदायाने व संतांनी आपल्या वचनातून एकत्वाचा, समतेचा पुरस्कार केलेला आहे. 'हे विश्वाची माझे घर । अशी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर आपणची झाला । असे संत ज्ञानेश्वर सांगतात. तर अवघा रंग एक झाला । रंगी रंगला श्रीरंग । असे संत चोखामेळा सांगतात. वेद धर्म यांच्या आधाराने जी आडवणूक चालू होती, ती झिडकारत संत तुकाराम म्हणतात,

'वि णूमय जग वै णवांचा धर्म ।
भेदाभेद भ्रम अमंगळ ।।
आइका जी तुम्ही भक्त भागवत ।
करावे ते हित सत्य करा ।।
कोणाही जिवाचा न घडो मत्सर ।
वर्म सर्वेश्वर पुजनाचे ।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव ।
सुख दुःख जिव भोग पावे ।

कोणताही भेदभाव न मानता भागवत भक्त म्हणून कोणत्याही जीवाचा द्वे ा न करने ही शिकवण संतांनी सांगीतली. समाज हा वेगवेगळया व्याधींनी ग्रसलेला आहे. सामाजिक कुप्रथेची उतरंड तयार करून भेदभाव करून मानसाचा तिरस्कार केला जातो. द्वे ा, राग, निंदा यांचा समाजात प्रादुर्भाव झालेला आहे. अशा वेळी संतांनी आपल्या प्रभोधनातून समाज बदल्याचा प्रयत्न केला व समतेची शिकवन दिली 'इश्वराने सर्व प्राणिमात्रांना निर्माण केले मग तो उच्चनिच असा भेदाभेद करणार नाही. हा विचार संप्रदायाने मांडला श्रे ठत्व—कनि ठत्व किंवा जातिभेद यांना थारा दिला नाही. परमेश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, हा विचार वारकरी संप्रदायाने मांडला वारकरी संप्रदायाच्या संतांची नावे पाहिली तरी त्यात सर्व समावेशकता दिसते. ज्ञानदेव, नामदेव, चौखोबा, बंका महाराज, नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार, सेन्हा न्हावी, तुकोबा, एकनाथ आदि संत झाले. (लोकराज्य ऑगस्ट,२०१८) या सर्वांनी समानतेची शिकवन दिली तुकारामानी तर ' जे कां रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले । तोची साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा । एवढे व्यापक विचार समाजासमोर ठेवले. एका आदर्श पुरू ाचे लक्षण कसे सावे ते आपल्या अभंगातून स्प ट करतात.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती । देह क टवीती उपकारे।

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

भूतांची दया हे भांडवल संता । आपुली समता नाही देही ।
तुका म्हणे सुख पराविया सुखें । अमृत हे मुखें स्त्रवतसे ।। (श्री.तु.गा.१५१०)

भक्तीमार्गातून इश्वरप्राप्ती साध्य झाली तरीही आदर्श भक्त कसे असताता, स्वत:च्या देहावि यी ममत्व नाहिसे झाल्याने ते इतरांच्या सेवेसाठी आपला देह झिजवतात, भूतदयेमुळे संतांना सुखाची जाणीव होते. इतरांनीही कसे वागावे त्यासाठी अमृतोपम उपदेश ते कसा करीत असतात याचे उत्तम वर्णन तुकारामांनी वरिल अभंगात केले आहे. भक्तिच्या मार्गात अशा निस्सिम भक्तांना फार महत्व आहे. विश्वव्यापक इश्वराशी समरस होउन विश्वप्रेमाने भरलेल्या भाविक भक्तांचा सहवास अतिशय उपकारक असतो.

तुकारामांनी धर्माकडे फक्त आपल्या स्वमुक्तीचे साध्य म्हणून पाहिले नाही तर समस्त विश्वाच्या मुक्तीचे साधन म्हणून पाहिले त्यांच्या व्यक्तिमत्वाची छाप गेल्या ाकडो व ापासून प्रभावीत करत आली आहे. त्यांनी आपल्या भजन, किर्तनातून मानवाजातीच्या कल्याणासाठी आवश्यक असलेला मार्ग दाखवून दिला त्या मार्गाने जाणारा प्रत्येक व्यक्ती हा आपल्या जिवनाचे सार्थक करून घेऊ ाकतो त्यांचे तत्वज्ञान हे अतिशय सोपे व सरळ होते सामान्य माणसांशी त्यांची नाळ जोडलेली असल्याने त्यांनी जनतेला आवश्यक असलेला विचार आपल्या कृतीतून मांडला हे करत असतांना त्यांना मोठा संघ ा करावा लागलेला होता.

- **समारोप—**

वारकरी संप्रदाय समजून घेतल्यानंतर आपल्याला संप्रदायाची शिकवन लक्षात येते. संप्रदायात सर्व जाती—धर्मातील लोकांना स्थान होते. कोणत्याही प्रकारे संप्रदाय भेदभाव करत नाही. महिलांना ही संप्रदायात स्थान आहे अनेक महिला संत होऊन गेल्या आणि आजही संप्रदायामध्ये महिलांची संख्या ही लक्षणिय आहे. मुख्यता ग्रामीण भागातील महिलांचा विशे ा सहभाग दिसून येतो. हा संप्रदाय भक्तीप्रधान असा संप्रदाय आहे. संतांनी सांगितलेले तत्वज्ञान हा संप्रदायाचा मुख्य आधार आहे.

वारकरी संप्रदायात संत तुकारामांना अनन्य साधारण महत्व आहे. त्यांनी आपल्या तत्वज्ञानातुन समानतेची शिकवन दिली. भक्तीचा सोपा मार्ग सांगीतला आरंभीच्या संतांनी स्वीकारलेला अद्वैतवादाचा त्यांनी अंगीकार केला. त्यांनी माडलेले तत्वज्ञान हे समाजाच्या गरजेतून निर्माण झालेले दिसते. त्यांनी 'भेदाभेद भ्रम अमंगळ' अशी शिकवण दिली सर्व प्राणिमात्रांवर दयेची भावना त्यांनी दाखवली कोणत्याही जिवाचा द्वे ा न करण्याचा मार्ग त्यांनी अवलंबिला

आणि सामाजिक समतेचा पुरस्कार केला. जगाचे कल्याण हे संतांचे कार्य असल्याचे ते सांगतात. आदर्श भक्त कसा असावा हे ही ते आपल्या अभंगातून सांगतात. मोक्ष मिळवण्यासाठी इंद्रियावर विजय मिळविण्याची आवश्यकता ही ते प्रकट करतात. ईश्वराच्या निस्सीम भक्तिवर ते भर देतात व ते स्वत: पांडूरंगाचे भक्त होते. त्यांनी ऐहिक जिवनातूनही परमार्थ साध्य करता येतो, हे त्यांनी दाखवून दिले.

- **संदर्भ ग्रंथ –**


१. ढेरे रा.चि., श्रीवठठ्ल एक महासमन्वय, पद्मगंधा प्रकाशन, पुणे,२०१८.
२. श्री तुकारामबुवांच्या अभंगाची गाथा,महारा ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मंबई,२०११.
३. गेसावी र.रा., पाच भक्तिसंप्रदाय, प्रतिमा प्रकाशन,पुणे,२००८.
४. दै. लोकसत्ता, ११जुलै२०१६.
५. जोशी ग.ना., भारतीय तत्वज्ञानाचा बृहद् इतिहास, खंड–७–८, ाुभदा–सारस्वत प्रकाशन, पूणे,२००५.
६. लोकराज्य मासिक, ऑगस्ट, २०१८.
७. दै. दिव्य मराठी, जुलै १२, २०१९.
८. सुंगठणकर बा.र., महारा ट्रीय संतमंडळाचे ऐतिहासीक कार्य, लोकवाङमय गृह प्रकाशन, मुंबई, २००७.
९. दांडेकर ां.वा., वारकरी पंथाचा इतिहास, प्राचार्य दांडेकर धार्मिक वाङमय प्रकाशन, पुणे, १९९५.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

६

# मध्ययुगीन साहित्यातील संत कवयित्रींचे योगदान

**प्रा. मीरा दत्तू गायकवाड**
संशोधक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**सारांश :–**

मध्युगीन साहित्यात संत कवयित्री मुक्ताबाई, जनाबाई, सोयराबाई, कान्होपात्रा, निर्मळा, बहिणाबाई यांनी मराठी साहित्यात आपला अमिट ठसा उमटवला आहे. स्त्रियांच्या लेखनाची लिखित पार्श्वभूमी ही संत साहित्यापासून सुरु होते. तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करता असे लक्षात येते की, संत साहित्यामध्ये योगदान देणाऱ्या या स्त्रीया काळाच्या दृष्टिने विचारी व प्रगल्भ होत्या. स्त्रियांचा सामाजिक दर्जा खालावलेला असताना व स्त्रीजीवन संकुचित आणि अनिष्ट प्रथांमध्ये बंधीस्त असतांना देखील या स्त्रीसंतांनी सामान्य जीवनातून स्वत:चे अस्तित्व सिद्ध करत अलौकिक संतपद प्राप्त केले. पुरुष संतांच्या बरोबरीने समाजाला नीतिबोधाची शिकवण दिली. साहित्य निर्माण करुन मराठीचे भाषावैभव वृद्धिंगत केले. प्रस्तुत शोधनिबंधातून मध्ययुगीन साहित्यातील संत काव्यरचनेतून लाभलेले योगदान अभ्यासले आहे.

**प्रस्तावना :–**

स्त्रियांच्या लेखनाची लिखित पार्श्वभूमी ही संत साहित्यापासून सुरु होते. तेराव्या शतकापासून ते सतराव्या शतकापर्यंतच्या मध्ययुगीन कालखंडात मराठी संत कवयित्रीमध्ये महदंबा, मुक्ताई, जनाबाई, बहिणाबाई यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. या कवयित्री बरोबर कान्होपात्रा, निर्मळा सोयराबाई, राजाई, गोणाई इ. यासारख्या कवयित्रींनी काव्याची संपन्न अशी परंपरा जोपासलेली दिसते.

मध्ययुगीन काळ म्हणजे यादवांचा काळ या काळात महाराष्ट्रातील धार्मिक व सामाजिक जीवन अध:पतित होत चालले होते. वैदिक धर्माच्या उज्ज्वल परंपरेस कर्मठता व पठिक पांडित्य यांनी काळिमा फासला होता. वेदाध्ययन करणारे वैदिक यज्ञयात्राचे अवडंबर माजवीत होते. अशावेळी वैदिक धर्माचे रक्षण करणे आवश्यक होते. परंतू रक्षण करण्याची जबाबदारी ज्या शास्त्री पंडीतांवर होती तेच माणुसकीला पारखे झाले होते व आपल्या उदरनिर्वाहात मग्न होते.

महाराष्ट्रातील समाजजीवनाला योग्य मार्ग दाखविण्याचे कार्य या काळात महानुभाव पंथ व वारकरी पंथ यांनी आपापल्या परीने केले. अशा परिस्थितीत जातीयतेचे प्रस्थ कमी करुन अध्यात्मिक लोकशाहीचा पाया महानुभाव पंथाने रचला. सर्वच जातींना आपल्या पंथात सामावून घेऊन प्रथम जातीय बंधने तोडली स्त्रियांनाही आपल्या पंथात सामावून घेऊन त्यांनाही भक्तीचा मार्ग मोकळा करुन दिला.

महानुभाव पंथातील महदंबेकडे (महदायीसा) मराठीतील आद्यकवयित्रीचा बहुमान जातो. तिच्या धवळ्यातून (लग्नप्रसंगी म्हटली जाणारी गाणी) तिने रुक्मिणी हरणाची कथा गायिली, तसेच त्यातून स्त्री सुलभ भावाविष्कार केला. महानुभावीय इतर कवयित्रींची फारशी रचना उपलब्ध नाही. तरीही नाईकबाई, हिरारसा, नागांविका इ. संतकवयित्रींच्या काव्यातून कृष्णभक्ती प्रकट झाल्याचे लक्षात येते.

वारकरी पंथातील संत कवयित्रींची परंपरा मात्र अधिक प्रभावी व सशक्त दिसते. मुक्ताबाई ते बहिणाबाई, प्रेमाबाई अशी ४०० ते ४५० वर्षांची ही परंपरा आहे. परंतू वारकरी संप्रदायातील कवयित्रींपैकी मोजक्याच कवयित्री सर्वांच्या परिचयाच्या आहेत. इतरही संत कवयित्री उल्लेखनीय आहेत, मात्र त्या अज्ञात आहेत. परिचित असणाऱ्या जनाबाई, सोयराबाई, बहिणाबाई यांच्या ही काव्याचे गुणविशेषही सर्वांनाच ज्ञात असेलच असेही नाही. अशा कवयित्रींच्या काव्याचा परामर्श शोधनिंबधाच्या निमित्ताने घेण्याचा प्रयत्न केला आहे.

पंथीय दृष्टिकोनातून विचार केल्यास नाथपंथातील गंगाबाई या संतकवयित्रीचा उल्लेख करता येईल. रंगबोध परंपरेतील राधाबाई, माधवस्वामी परंपरेतील मीनाक्षीअम्मा, समर्थांच्या शिल्पपरंपरेतील वेगाबाई, बयाबाई इ? संत कवयित्रींनी पद वाङ्मय समृद्ध केलेले दिसते. मराठी कवयित्रीमध्ये महदंबा ही आद्य कवयित्री, तर राम जानकी विवाहकथा आख्यानात्मक पध्दतीने सादर करणारी वेणाबाई ही देखील पहिलीच संतकवयित्री होय.

मध्ययुगीन मराठी संत कवयित्रींच्या काव्याचा विचार करताना मात्र वारकरी साप्रंदायिक कवियित्रीच सर्वात आधी डोळ्यासमोर येतात. त्यांचा प्रभाव जनमानसावर अधिक आहे. संत कवयित्रींनी आपल्या जीवनात आलेले अनुभव प्रामाणिकपणे मांडलेले आहेत. स्तरभेदानुसार, जातीनुसार, व्यवसायानुसार व परिस्थितीनुसार या अनुभवाला निराळेच रुपरंग प्राप्त झाले आहेत. त्यात विठ्ठलभक्ती बरोबरच सामाजिक जाणीवही प्रकट झाली आहे. तसेच त्यांच्या अंतरिचा स्वरही त्यातून प्रकटलेला आहे. काही कवयित्रींची बंडखोरी ही त्यांच्या काव्यातून दिसते. तसेच समाज परिघात राहणाऱ्या बहिणाबाई समन्वयवादी दिसतात, तर काही समाज व्यवस्थेने

हीन ठरवलेल्या आहेत त्यांचा स्त्रीवादी उद्रेक काव्यातून प्रकटलेला दिसतो. अशा पध्दतीने संत कवयित्रींचे संत साहित्यातील योगदान आपण हया शोधनिंबधातून अभ्यासणार आहोत.

**संत नामदेवांच्या परिवारातील संत कवयित्री :**

**१. संत मुक्ताई :—**

विठ्ठलपंत व रुक्मिणी यांच्या पोटी जन्मलेली संत श्री ज्ञानेश्वर, संत निवृत्तीनाथ, संत सोपानदेव यांची धाकटी बहीण, जन्मस्थान—आळंदी १८—१९ वर्षाचे आयुष्य लाभलेली व अल्पवयातच अध्यात्मिक व वाङ्मयीन दृष्टीने घेतलेली अलौकिक झेप अचंबित करणारी आहे.

मराठीतील वारकरी परंपरेतील ही आद्यकवयित्री मानावी लागेल. मुक्ताई तिच्या भावंडासोबतच राहत असे. तिची गुरुपरंपरा नाथपंथीय असून तिचे गुरु निवृत्तीनाथ होते.

मुक्ताई ही वयाने लहान असली तरी तिचा अध्यात्मिक अधिकार फार मोठा होता. संत निवृत्तीनाथाकडून ज्ञानोपदेश घेतला. योग विद्येचा अभ्यास केला, तिच्यातील योगसामर्थ्य चांगदेव महाराजांनी ओळखले त्यांनी तिचे गुरुत्व स्वीकारले यातच तिचे यौगिक सामर्थ्य सिध्द होते. योगी चांगदेव १४०० वर्षांचे शिष्य आणि १८ वर्षांची मुक्ताई गुरु, अशी ही अलौकिक गुरु शिष्याची जोडी.

मुक्ताईची अभंगसृष्टी मर्यादित आहे, पण तिच्यातील गुणघनता मात्र वाचकांच्या मनाला थक्क करुन सोडणारी आहे. संत कवयित्री मुक्ताईचे 'नामपर', 'संत माहात्म्यपर', 'उपदेशपर', 'पंढरी माहात्म्यपर', 'कूटात्म', 'मुक्ताई—चांगदेव संवाद', 'अंगाई गीत' आणि ताटीचे अभंग विविध विषयांच्या वैविध्याने नटलेले अभंग सकलसंत गाथेत समाविष्ट आहेत. नामसंकीर्तनासाठी तिने 'हरिपाठ' रचला 'हरिपाठा'तून उपदेशाची भाषा, पौराणिक कथांचे दाखले देत, ती हरिपाठात म्हणते—

"मुक्ता मुक्त दोन्ही नाईकतो कर्णी
हरिनाम पर्वणी सर्वकाळ"

हरिपाठाच्या साहयाने विश्वचरणी समरस होताना मुक्ताई मुक्त होते.

शून्यपरते पाटी तव शून्य तेही नाही।
पाहतो पाहोपण ठायी ठेवियले।।
प्रकृती निर्गुण सगुण।

दीपेदीप पूर्ण एकतत्वे।।

या उपदेशपर अभंगातील सुक्ष्मता लक्षणीय आहे. मुक्ताईचे कवयित्री म्हणून असलेले मन अत्यंत आत्मरत आहे. मुक्त शब्दांची मुक्तपणे उधळण करुन त्यातील अन्वर्थकता आपल्या नावाशी जोडली आहे.

'मुक्त', 'मुक्तपण', 'मुक्ति', 'जीवनमुक्त', 'मुक्तामुक्त' असे आत्मदर्शक पुनरुक्त उल्लेख पाहण्यासारखे आहेत.

मुक्ताईची कूट रचना अनोखी आहे त्यातील एक उदाहरण मुद्दाम नोंदवले पाहिजे.

''मुंगी उडाली आकाशी। तिने गिळेले सूर्याशी।

थोर नवलाव जाता। वांझो पुत्र प्रसवला।।

विंचू पाताळाशी जाय। शेष नाथावंदी पाय।

माशी खाली घाट झाला। देखोनि मुक्ताई हासली।।''

अशाप्रकारे मुक्ताईने कूटरचना, अभंगरचना, हरिपाठ, ओव्या इत्यादीची भर संत साहित्यात टाकलेली दिसते. म्हणून संत कवयित्री म्हणून तिचे योगदान लक्षणीय ठरते.

**२. संत गोणाई (इ.स. १४ वे शतक) :—**

संत नामदेवाच्या आई गोणाई होय. संत नामदेवांच्या गाथ्यात गोणाईची अभंग रचना समाविष्ट आहे. नामदेव गाथेत अभंग रुपाने काही संवाद प्रसंग चितारले आहेत. त्यात गोणाई—नामदेव संवाद, विठ्ठल—गोणाई संवाद, गोणाई व संत संवाद या संवादात्मक अभंगातून गोणाईच्या भावविश्वाचे, अंतरंगाचे, अंत:संघर्ष, ओढाताण—विवशता पुत्रप्रेम, लौकिक पाश—व्यवहार व परमार्थ यातील नाट्याचे आंदोलनाचे अतिशय प्रत्ययकारी दर्शन घडते म्हणून संत कवयित्री म्हणून तिचे स्थान निश्चितच लक्षणीय ठरते.

नामदेव व गोणाई संवाद ती म्हणते— तुला विठोबाने झपाटले, आमचे जीवनही तू लाजीरवाणे केलेस. 'तू घर बुडविलेस'. 'तू संसाराची होळी केलीस—कूळ बुडविलेस त्या विठ्ठलाचा नाद बरा नव्हे.'

''गोणाई म्हणे नाम्या नव्हे रे हे भले।

विठ्ठल नामे केले आपणा ऐसे।।''

गोणाई विठ्ठलाशीही संवाद करते. ती त्यांच्याशी भांडते—रागावते. गोणाई विठ्ठलाला विचारते.

'अगा ये विठोबा पाहे मजकडे। कां गा केले वेडे बाळ माझो।

तुझे काय थ्वादले त्वां दिधले। भले दाखविले देवपणा।।'

विठ्ठलाला असा रोखठोक प्रश्न ती विचारते पुत्रप्रेमापोटी विचारलेला हा प्रश्न अंत:करणाला भिडतो.

## ३. संत राजाई :

संत नामदेवाची ही पत्नी. नामदेव गाथ्यात हिच्या नावावर अभंग आढळतात. गोणाई प्रमाणेच ही देखील नामदेवाशी, विठ्ठल रुक्मिणीशी संवाद करुन नामदेवाच्या विठ्ठल प्रेमाची तहार मांडते.

'अहो रखुमाबाई विठोबासी सांगा। भ्रतारासी कां गा वेडे केले?

चवदा मनुष्ये आहेत माझ्या घरी। हिंडता दारोदारी अन्नासाठी।।'

एवढे 'सांगून नामयाची राजा भली नव्हे' अशी तंबी ही देते राजाई अत्यंत समजुतदार सुजाण स्त्री म्हणून तिला घरादाराची काळजी आहे राजाईच्या अभंगात तिच्या स्त्री सुलभ भावना, प्रपंच व परमार्थ प्राप्रंचिक सुख–दु:ख यातील संघर्ष ताणतणाव सहज प्रकटले आहेत.

## ४. संत आऊबाई व संत लाडाई :

आऊबाई ही संत नामदेवांची बहीण हिने १ कोटी १० लक्ष अभंग केल्याचे संत तुकाराम सांगतात, पण आज नामदेव गाथ्यात फक्त दोनच अभंग समाविष्ट आहेत. संत नामदेवांच्या गाथ्यात 'आऊबाईचे' दोन अभंग उद्धृत करण्यात आले असून पहिल्या अभंगात शून्याकाराची अनुभूती साकारली आहे. तर दुसऱ्या अभंगात तिने विठ्ठलाकडे करुणा भाकून आपणाला तारण्याची प्रार्थना केली आहे.

तारी मज आता रखुमाईच्या कांता। पंढरीच्या नाथा मायबापा ।।१।।

लाडाई ही संत नामदेवांची थोरली सून. संत तुकाराम यांनी हिच्या नावावर दिडकोटी अभंग नोंदवले आहेत परंतु तिचे फक्त दोनच अभंग आज उपलब्ध आहे. त्यातील

''पूर्व संबंधे मज दिथले बापाने।

शेखी काय जाणे कैसे झाले ।।१।।

प्रसूती लागी मज आणिले कल्याणा।

अंतरला राणा पंढरीचा ।।२।।''

ती म्हणते सर्व कुटुंबीय विठ्ठलचरणी शांत झाले, मग मलाच का दूर लोटले? दुसऱ्या अभंगात ती विठ्लाची करुणा भाकताना आढळते.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

**५. संत नागरी :–**

संत नामदेवांच्या परिवारातील ही संत कवयित्री. संत नामदेवांची पुतनी. संत नामदेवांची ही पुतणी आत्मकथनपर अभंगात सांगते.

''रामयाची कन्या गोरटी गोवळी।

बापे बोळविली सासुरियात।।''

अशा शब्दात तिने आपली कथा प्रारंभित केली आहे. त्यानंतर झालेला अपेक्षाभंग, वियोग, एकादशीच्या दिवशीची वैष्णव दर्शनाची कासाविशी, तळमळ व्यक्त करताना दिसते.

''वाटुली पाहता उत्कंठित मनी

गेली विसरुनि तान भूक''

असे ती वर्णन करते. तिला विठ्ठल भेटीची ओढ लागते. ती शोकाकूल होते.

'प्राण जातोवेगी करा वो धावणी' असा टाहो फोडते. निर्वाणीचा आकांत मांडते

'निवांत नागरी मिळून ठेवी वाचा

लोटला सुखाचा महापूर।।'

अशी तिची आत्मकथा मराठी साहित्यात ऐतिहासिक ठरली आहे.

मराठी संत कवयित्रींच्या परंपरेत संत सखूचा उल्लेख अपरिहार्य आहे. दुदैवाने तिची अभंगरचना उपलब्ध नाही परंतु तिची चरित्रकथा उपलब्ध आहे. स्त्री गीतातूनही तिची चरित्रकथा गायिली गेली आहे. मध्ययुगीन मराठी वाङमयात अनेक स्त्रीसंतांचे नामोल्लेख येतात. परंतु अनेक संत स्त्रीयांची रचना अनुपलब्ध आहे. तरीही त्यांचे योगदान हे नेहमी उल्लेखनीय आहे.

**६. संत जनाबाई :**

संत नामदेवांच्या प्रभावळीतील संत कवयित्री गंगाखेड येथील दमा व करुंड या दाम्पत्याची मुलगी. मराठी साहित्यात जनाबाई इतकी लोकप्रिय कवयित्री दुसरी आढळत नाही. जनाबाई हे महाराष्ट्रातील अंत्यत लोकप्रिय परंतु विद्वानाकडून उपेक्षित असे व्यक्तिमत्व संत जनाबाई यांच्या नावावर एकूण ३५० अभंग उपलब्ध आहेत. जनाबाईच्या रचनेत नाममहात्म्य, विठ्ठल महिमा, भक्ती, 'आत्मस्वरुपस्थिती', संतस्तुती,

आत्मोल्लेख, 'विठ्ठलाशी प्रेम—भांडण', 'स्फुटकाव्य', 'पाळणा', 'आरती', 'जात्यावरील गित', 'उपदेशपर व आख्यानपर' बालक्रीडा 'दशावतार' असे विविध प्रकार समाविष्ठ होतात.

जनाबाईच्या काव्यात विठ्ठलभक्ती विषयक जवळपास १५० अभंग आहेत.

'माझा रंग तुझिया गुणी। म्हणे नामयाची जनी'

ही तिची विठ्ठलाप्रती भूमिका दिसते. तिच्या दृष्टीने विठ्ठल माऊली आहे. तिच्या अभंगात विठ्ठल महिमा, पंढरी माहात्म्य, संत महिमा अशी रचना आढळते.

'असे वैष्णवाचे भार। दिले हरिनाम नगारा।।'

अवघी दुमदुमली पंढरी । कडकडाट गरुडपारी ।।

अशाप्रकारे तिने पंढरी क्षेत्राचा महिमा वर्णन केला आहे. जनाबाईच्या काही अभंगात संत स्तुती दिसते. ज्ञानेश्वर, नामदेव, संत सेना इ. व्यक्तीचित्रे ती रेखाटते.

'धरीला पंढरीचा चोर।

गळा बांधोनिया दोर।।'

या अभंगातून तिचे विठ्ठलप्रेम आणि निस्सीम विठ्ठलभक्तीचे दर्शन घडते.

जसे— 'ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर'

यादव काळाची संपन्नता त्यातील कवयित्रींच्या काव्यलेखनातून दिसून येते. प्राचीन मराठी वाङ्मय क्षेत्रात एकूण ज्या कवयित्री आढळतात, त्यातील निम्याहुनही अधिक केवळ यादव काळातल्या वारकरी संप्रदायातील जनाबाई, मुक्ताबाई, कान्होपात्रा, निर्मळा, सोयराबाई, राजाई, गोणाई या सारख्या कवयित्रींची एक संपन्न परंपराच यादव काळाने जोपासली आहे.

संत जनाबाईची कविता लक्षवेधी ठरते ती त्यातील अनन्यसाधारणत्वामुळे जनाबाईच्या काव्यात त्यांच्या आध्यात्मिक जाणिवांच्या विकासाची वळणे, कठीण वाटा यांचे दर्शन घडते.

संत जनाबाईच्या अभंगातून तिच्या भक्तिशील, नितळ व प्रांजळ मनाचे घडणारे दर्शन मोठे भावपूर्ण आहे. जन्माने स्त्री, शिवाय दासी कुळात जन्म झाल्याने तिच्या मनाची टोचणी अनेक ठिकाणी व्यक्त होते. प्रांजळ भक्तीशीलतेने तिचे व्यक्तित्व उन्नत केले. तिचा आत्मविश्वास जागृत केला. तिला त्यातून सत्व गवसले आणि मग तिच्या तोंडून

'नामयाचि जनी', दासी ते म्हणती

भावे तो श्रीपती, वश केला

मी देव घेते मन देव देते

देवा संगे व्यवहारिते —२

यासारखे आत्मविश्वासपूर्ण उद्गार तिच्या वाणीतून प्रकट झाले. तिच्या आत्मविश्वासाचे, धीटपणाचे आणि निर्मळ भक्तिभावाचे दर्शन अभंगवाणीतून घडते.

एकाकीपणातून, पोरकेपणातून जनाबाई आपल्या धर्माच्या पित्याला विठ्ठलाला 'धर्माची लेक' होऊन आर्ततेने हाक मारते. तर माता जिवलग, सत्ताधीश, बालगोपाळ अशा विविध रुपांतून विठ्ठलाशी असलेल्या जन्मोजन्मीच्या नात्याचा शोध घेते. जनाबाईच्या मनातील विठ्ठलाच्या साक्षात्काराची अनुभूती ही निर्गूण निराकार आणि निरावयव आहे. विठ्ठलाची भेट तिने मनाने आणि देहाने अनुभवलेली आहे. त्यामुळे विठ्ठलाला जनाबाईपासून सुटका नाही तर जनाबाईला विठ्ठलाशिवाय अस्तित्व नाही. म्हणूनच,

'आई मेली बाप मेला। मज सांभाळी विठ्ठला।।'

मजकोणी नाही। माझी खात आहे डोई।।३।।

अशी तिच्या मनाची अवस्था आहे. जनाबाईच्या अभंगातून स्त्रीमनाचे गहिरे रंग, प्रगाढ जीवणकळा, आत्मनिष्ठा यातून साकार झालेली अभंगरचना म्हणजे तिच्या स्त्रीमनाचे काव्यात्मक योगदान.

**संत सोयराबाई :**

संत चोखामेळा यांची धर्मपत्नी. तिने आपल्या अभंगात 'चोख्याची महारी' असा उल्लेख केला आहे. तिचे ६२ अभंग उपलब्ध आहेत. तिच्या अभंगात आणि सामाजिक तळमळ दिसून येते. स्त्रीत्व आणि दलितत्व असूनही स्वतंत्र विचार करण्याची ताकद असलेली शुद्र जातीत जन्मल्यामुळे, या कुटुंबाच्या वाट्याला तिरस्कार व उपेक्षा आली. त्यातूनच चोखोबा सहकुटुंब पंढरीला विठोबाच्या दर्शनाला गेले असता पायऱ्यातच काही ब्राम्हणांकडून त्यांचा छळ होतो. विठ्ठलभक्त असूनही बायको सोयराबाई व मुलगा कर्ममेळा यासह त्यांना हाकलून दिले जाते, ही उपेक्षा सोयराबाई अभंगातून व्यक्त करते.

'पंढरी ब्राम्हण चोख्याशी छळले।

तया लागी केले नवले देवे।

सकळ समुदाव चोखिया चे घरी।

ऋध्दिसिध्दी द्वारी तिष्ठताती।।'

संत सोयराबाईच्या नजरेतून सोंग—ढोंग करणारे ही सुटले नाहीत ती म्हणते.

''शीण वाटतसे मना। नारायणा न पाहता।

वाया आचार विचार। सद मलीन अंतर।।

सोंगाचे ते सोंग। दावीरंग कथेचा।।''

चिंतनीयता हा सोयराबाईचा अभंग विशेष आहे.

''कवण तो मेला। कवण राहिला

हासती रडती कवणाला ते न कळे।।''

संत सोयराबाईच्या वैचारिक व परमार्थिक अधिकाराची यातून कल्पना येते. दलित स्त्री असूनही तिचा अध्यात्मिक प्रवास—मनाचा विकास व उपदेशातील परिपक्वता आपणास चकित करते. स्वतंत्र्य पृथगात्म अस्तित्व सिद्ध करणारी ही कवयित्री मराठीत अतुलनीय म्हटली पाहिजे.

**संत निर्मळा :—**

संत चोखामेळा यांची धाकटी बहीण. तिने चोखोबालाच गुरु केल्यामुळे शिष्याही ठरते. तिचे २४ अभंग एवढीच रचना उपलब्ध आहे. निर्मळाच्या अभंगातून तिच्या नावाप्रमाणेच निर्मळत्व, सरलत्व, साधेपणा, उत्कटता हे गुणविशेष प्रत्ययाला येतात. तिचा एकेक अभंग म्हणजे छोटेसे करुणार्त भावगीतच आहे.

निर्मळासारख्या संतकवयित्रींचा विचार करता एका अस्पृश्य जातीतल्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या उपेक्षित व गावकुसा बाहेरचे जिणे जगणाऱ्या स्त्रीच्या कवितेत केवढे प्रतिमासामर्थ्य होते हे पाहून मन स्तिमित होते.

**भागूबाई (भागूमहारीण) :—**

मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासात भागू नामक दोन संत कवयित्री आढळतात. त्यापैकी भागू महारीण ही संत चोखामेळा परिवारातील भागू ही अस्पृश्य जातीत जन्माला आलेली. 'सकल संत गाथ्यात' हिचे पाच अभंग समाविष्ठ आहेत.

संत भागूबाईच्या अभंगातून वास्तव दर्शन घडते. तिच्या अभंगातून सामाजिक उपेक्षा, विठ्ठल दर्शनाची उत्कटता, कृतज्ञभाव, निर्भयी भावही भागूच्या लेखनाची वैशिष्टये.

भागूबाईचा एक अभंग

''काज नाही हो जनासी। रिसवावे त्या देवासी
जन हासतिल मज । आता जाले मी निर्लज्ज
मागे पुढे नाही कोणी। सख्या विठ्ठला वाचेनि।।''

अशा प्रकारे निर्लज्ज होऊन विठ्ठलाला ती आपला सखा मानते. आपले सर्वस्व मानते. तीला कोणाचे भय ही वाटत नाही. ती म्हणते ''भागू म्हणे झाले निर्भइ।'' ही भागूबाई स्त्रीमुक्तीचा स्वर आळवताना दिसते.

**भागूबाई (संत तुकाराम कन्या) :—**

संत भागूबाई ही संत तुकारामांची कन्या हया भागूबाईचे दोन अभंग तुकाराम गाथेत आले आहेत या अभंगात विठ्ठल भेटीची तिची तळमळ स्त्रीसुलभ भाषेत व्यक्त झाली आहे. वात्सल्यभावातून केलेली ही भक्ती तिच्या स्त्रीमनाचे दर्शन घडवते. ती विठ्ठलाला आळवताना म्हणते.

मी रे अपराधी मोठी। मज घालावें बा पोटीं।
मी तान्हुलें अज्ञान। म्हणू का देऊ नये स्तन।।
अवघ्या संता तूं भेटसी। मी रे एकली परदेशी।।
भागू म्हणे विठोबासी। मज धरावें पोटासी।।

यातील 'तान्हुले', 'स्तनपान', 'परदेशी' (सासरी) या शब्दप्रतिमा स्त्रीसुलभ मनाच्या निदर्शक ठरतात. अभंगात बोलल्याशिवाय आपल्याला प्रकट होता येत नाही, अशीच त्यावेळची धारणा दिसून येते.

**संत कान्होपात्रा :—**

मध्ययुगीन काळातील संत कान्होपात्रा उल्लेखनीय कवयित्री होय. कान्होपात्रा ही मंगळवेढा येथील राहणारी श्यामानामक गणिकेची मुलगी अतिशय देखणी. कान्हो तिचे नाव 'पात्रा' हे व्यवसायदर्शक विशेषनाम 'पात्रा' म्हणजे वेश्या म्हणजेच वेश्या व्यवसाय करणाऱ्या वेश्येची मुलगी म्हणून 'कान्होपात्रा.'

कान्होपात्रेचे 'सकल संत गाथेत' २३ अभंग आहेत. एका उपेक्षित समाजाच्या दृष्टीने हीन अप्रतिष्ठित व्यवसाय करणाऱ्या कुळातील स्त्री तिच्या अभंगातील आर्तता, करुणा, व्याकुळता मनस्वी वाटते. तिच्या अभंगात विठ्ठल महिमा, पंढरी महिमा, संत महिमा, नाम महिमा, आत्मोल्लेखाचे संदर्भ मिळतात.

**संत बहिणाबाई (शिऊरकर) :—**

मध्ययुगीन कालखंडातील संत बहिणाबाई या वारकरी संत परंपरेतील अखेरच्या संत कवयित्री त्यांनी वारकरी संप्रदायाचे सुंदर ऐतिहासिक व मार्मिक वर्णन केले आहे.

बहिणाबाई संत तुकारामांच्या समकालीन असून संत तुकारामांना गुरु मानत. बहिणाबाईंनी वैविध्यपूर्ण अभंग रचना केलेली आढळते त्यात विठ्ठलभक्ती, संतस्तुती, करुणा, टोणप्याचे अभंग, गुरु माहात्म्य, आत्मचरित्रपर अभंग, भारुडे, रुपकरचना, कूट, श्लोक पदे, काही हिंदी रचना इ. त्यांचे निर्वाणपर अभंगही लक्षणीय आहेत.

संत बहिणाबाईंने वारकरी संप्रदायाचा इतिहास अल्पाक्षरात एका अभंगात सादर केला आहे. तीचा हा अभंग मार्मिक आहे, तो अभंग सर्वश्रुतच आहे.

''संत कृपा झाली। इमारत फळा आली।
ज्ञानदेव रचिला पाया। उभारिले देवालया।।
नामा तयाचा किंकरा । तेने केला हा विस्तार
जनार्दन एकनाथ खांब । दिला भागवत।
तुका झाला ते कळस। भजन करा सावकाश।।''

**समारोप :—**

वारकरी संप्रदायातील संत मुक्ताबाई ते संत बहिणाबाई यांच्या साहित्याचा परामर्श येथे घेतला आहे. संत मुक्ताबाई च्या काव्याची उंची तत्वज्ञानाच्या दृष्टीने अलौकिक आहे. तिच्या काव्यातून 'स्त्री' म्हणून

असलेल्या, तिचे प्रेम, दासीपणाचे दु:ख, दारिद्र्याची खंत, अन्याय आणि बंडखोरी इ. भाव–भावना काव्यातून मांडते. जनाबाई, सोयराबाई, भागूबाई, निर्मळा, कान्होपात्रा, संतुबाई, विठाबाई सर्व कवयित्री निम्नवर्गीय आहेत.

या सर्वच संत कवयित्रींनी मनोनिग्रहाने संकटावर मात केली. स्त्री जन्म मिळाला म्हणून त्या नमल्या नाहीत हतबल झाल्या नाहीत. विलक्षण आत्मविश्वासाने पुरुषांच्या बरोबरीने त्या वावरल्या त्यांच्या सारखीच साधना त्यांनी केली. आपला आत्मिक अनुभव काव्यातून सांगितला.

**संदर्भ :–**

१. मध्ययुगीन साहित्य (अवलोकन आणि निरीक्षणे), प्रा. एल.जी. सोनवणे, प्रशांत पब्लिकेशन, ८ फेब्रुवारी, २०१५
२. मराठी संत कवयित्रींचा इतिहास, संपादक–विद्यासागर पाटणकर, साहित्य अकॅडमी, न्यू दिल्ली, पहिली आवृत्ती २०१५
३. संत कवी आणि कवयित्री : एक अनुबंध, डॉ. सुहासिनी इर्लेकर, स्नेहवर्धन प्रकाशन
४. संत कवयित्री, शेलटे इंदूमती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती १९८९
५. १० संत कवयित्री, डॉ.सौ.शैला गावंडे, पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणे
६. नियत कालिले–अनियत कालिके
७. गुगल विकिपिडिया

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

7

# प्रतिमा इंगोले यांच्या पार्टटाईम मधील शैक्षणिक जीवनजाणीव

**डॉ. पंढरी डोईफोडे**
सहयोगी प्राध्यापक, संत भगवानबाब कला महाविद्यालय, सिंदखेडराजा

प्रतिमा इंगोले यांनी 'बुढाई' व पार्टटाईम ' ह्या दोन ग्रामीण कादंबऱ्या लिहून कादंबरी क्षेत्रात आपले स्थान पक्के केले आहे.' बुढाई मध्ये एका खेड्यातून शहरी भागात येणाऱ्या ग्रामीण स्त्रीचे चित्रण त्यांनी केले आहे. तर' पार्टटाईम' या दुसऱ्या कादंबरीमध्ये सुशिक्षित असून, महाविद्यालयामध्ये अंशकालीन नोकरी करणाऱ्या ग्रामीण भागातून शिक्षण घेतलेल्या एका स्त्रीची हृदयद्रावक कहाणी वर्णन केली आहे. पुरुष आणि स्त्री यांच्यामधील अंतर कमी न होता ते कसे वाढत चालले आहे. सुशिक्षित असूनही स्त्रीकडे पाहणारा अधिकारी आपल्या माणुसकीला कसा पारखा होतो, याचे वर्णन लेखिका करतात. स्त्रियांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन आणि शिक्षणक्षेत्रातही नोकरी करताना स्त्रियांची केली जाणारी कोंडी, कुचंबना यांचा अनुभव अनुराधाने घेतलेला असतो.

प्रामाणिक माणसांचा छळ निमूटपणे पाहणारा समाज आणि शिक्षणक्षेत्रातील कामचुकारांची बजबजपुरी हा विषय ' पार्टटाईम' मध्ये प्रामुख्याने येतो. ग्रामीण स्त्री लेखिकेने लिहिलेली ही कादंबरी ग्रामीण भागाशी संबंधित आहे. ग्रामीण स्त्रीच शोषित नसून सुशिक्षित झालेली स्त्रीही शोषित असू शकते. हे चित्रण कादंबरीत येते. " हळूहळू शहरे बदलली, तसे गावही. तेथली तरुण मुले-मुली शिकून बाहेर आलीत. मुलीही शिकून शहरात नोकरी करू लागल्या. या बदलत्या पार्श्वभूमीवर ही' पार्टटाईम ' कादंबरी बेतलेली आहे. ती पूर्णतः ग्रामीण नाही, ना शहरीही! सरमिसळ झालेल्या विचारांची ती शिक्षणक्षेत्रातली ज्वलंत विचारांची कादंबरी आहे. मानवी मनाचा तळ गाठून जीवनाच्या भल्याबुऱ्या बाजूंचे चित्रण करण्याऐवजी प्रतिमा इंगोले यांनी शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, तेथील अधिकारी व्यक्ती, तेथे होणारे स्त्रियांचे शोषण यांवर नेमके बोट ठेवले आहे.

ग्रामीण साहित्यप्रवाह हा मराठी साहित्याचा मध्यवर्ती प्रवाह मानला जात आहे. त्या अनुषंगाने ग्रामीण साहित्यात नवनवीन विषय येत आहेत. खेड्यात राहून मोलमजुरी करणारी स्त्री, तिचे दुःख, शोषण हे विषय अनेक कादंबऱ्यांत आले. प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण भागातीलच शिक्षण घेऊन नोकरीत येणाऱ्या अपयशामुळे नवनिर्मिती करणारी अनुराधा वर्णन केली आहे.

ग्रामीण भागातून शिक्षण घेणारी अनुराधा आपल्या कामात प्रामाणिक राहते. त्यामुळे महाविद्यालयात तिच्याविषयी आपुलकी असते. अनुराधामुळेच महाविद्यालयाची उपस्थिती वाढते. अनुराधाच्या निरागस,निर्व्याज, नि: स्वार्थी प्रेमामुळेच ती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये सन्माननीय

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

ठरते. पण हेच वास्तव प्राचार्यांना मात्र न सोसणारे असते. त्यामुळे ते तिला नेहमीच त्रास देण्याचा प्रयत्न करतात.

अनुराधा ही संसारिक स्त्री असल्यामुळे तिला घरचीही कामे असतात. तरीपण ती कॉलेजचे काम प्रथम करते ती. एक अंशकालीन प्राध्यापक असल्यामुळे तिच्या तिच्या असहाय्यतेचा फायदा पुरूष मंडळी कसा घेतातृ याचे सूक्ष्म चित्रण लेखिकेने केलेले आहे. जवंजाळ संरांना सांगूनही ते प्राचार्याकडे तिची तक्रार करतात. त्यामुळ अनुराधाला त्रास सहन करावा लागतो. बदलत्या विचाराच्या सुशिक्षित स्त्रीला आजही पुरुषांकडून मानसिक त्रास सोसावा लागत असल्याचे दिसून येते.

अनुराधा कॉलेजला रजेचा अर्ज देऊन सुट्टीवर राहते. पण प्राचार्यांना न विचारल्यामुळे ते तिच्यावर राग काढतात आणि तिची बिनपगारी रजा लावतात. किरकोळ रजा शिल्लक असतानाही बिनपगारी रजा लावल्यामुळे ती अगतिक होते. पार्टटाईम प्राध्यापक आणि फुलटाईम प्राध्यापक असा फरक लेखिका दाखवतात. प्राचार्य टाले यांचा अनुराधाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो.अनुराधा मात्र त्याला प्रतिसाद देत नसल्यामुळे ते तिला जाणीवपूर्वक नोकरीतून काढण्याचा प्रयत्न करतात. पाच वर्षे सेवा करूनही शेवटी जागा राखीव झाल्यामुळे अनुराधाला काही करता येत नाही. अधिकाराचा वापर हा स्त्रीच्या स्त्रीत्वाशी संबंध जोडण्यासाठी करण्याचा प्रयत्न प्राचार्य करतात. प्रथमवर्ग अधिकारी असूनही अंत: करणातील किळसवाणे विचार करून कलंकित होतात. स्त्रीला कोणत्याही ठिकाणी नोकरी करणे पुरुषी नजरेमुळे कसे कठीण झाले आहे, हे अजब वास्तव प्रतिमा इंगोले वर्णन करताना दिसतात.

शिक्षण क्षेत्रातील घसरत चाललेली नैतिकता लेखिका दाखवितात.निगरगट्ट माणसेच या क्षेत्रात प्रवेश मिळवतात व टिकूनही राहतात. त्यामुळेच अनुराधासारख्या प्रामाणिक स्त्रीला त्याच्यासमोर हार पत्करावी लागते.शिक्षण क्षेत्रात प्रामाणिक माणसं टिकू शकत नाहीत ही शिक्षण क्षेत्रातील बोकाळलेली अधोगती अनुराधाच्या चित्रणाने लेखिका वर्णन करतात.

अनुराधाच्या वाढत्या वर्चस्वामुळेच प्राचार्य तिला नोकरीतून कमी करण्याचा प्रयत्न करतात. अनुराधाचा नवरा नोकरीवर असल्यामुळे तोही तिला नोकरी करण्यास विरोध करतो. पण तरीही अनुराधा शेवटचे आचके द्यावेत तशी ती आपल्या नोकरीबाबत प्रयत्न करते. पाण्याबाहेर काढलेल्या मासळीसारखी विश्वासघाताचे दु:ख जिव्हारी झोंबून ती तळमळत राहते. साहेबांशी आपण नेहमीच चांगले वागतो, पण तरीही त्यांनी आपल्याला धोका दिला, त्यामुळे ती पश्चाताप व्यक्त करते. आपल्याला पोटाचा प्रश्न सतावणारा नसल्यामुळे आपल्या ठिकाणी दुसरा एखादा गरजू प्राध्यापक नोकरीवर लागावा, असे ती प्रामाणिक विचार करणारी बदलती स्त्री आहे. त्यामुळे सुमती गोतमारे जॉईन झाल्यामुळे तिला आनंदच होतो. कारण ती बिनलग्नाची राहिली असती. बिन लग्नाची मुलगी आईवडिलांना भार वाटते आणि तिलाही

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

बिचारीला स्वाभिमानशून्य जिणे जगावे लागते. समाजात साधारण दिसणाऱ्या मुलीला लग्नाच्या बाजारात भाव नाही. त्यामुळे तिला व आईवडिलांना तो अवमान आजही सहन करावा लागतो. स्त्रीही पुरुषाशिवाय समाजात राहूच शकत नाही, हे सत्य मांडण्याचा प्रयत्न प्रतिमा इंगोले करतात. समाजामध्ये अनुराधासारख्या स्त्रियांची उणीव भासते. डॉ. किशोर सानप म्हणतात, " अनुराधा ही बहुजन समाजाच्या नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करणारी तरुणी आहे. ग्रामीण जीवनात रुळलेली आहे. ग्राम जीवनाच्या स्वाभाविकतेवर आणि नैसर्गिकतेवर तिचे प्रेम आहे. शिक्षणाने मनुष्य सुसंस्कारित होतो आणि सामाजिकदृष्ट्या एक नैतिक उंचीही मनुष्याला प्राप्त होते, यावर तिचा विश्वास प्राप्त होतो. सुगृहिणी, लेखिका, वक्ता,शिक्षिका, स्त्रीपुरुष समानता मानणारी पापभिरू कार्यकर्ता अशा निरनिराळ्या भूमिकांनी ती समाजात मोकळेपणाने वावरते. स्त्रियांच्या विकासात पुरुषांचा वाटा असतो, ही बाब तिला मान्य असते. तिचा अधिकारी नवराही तिचा सन्मान करणारा असतो. आपल्या ज्ञानाचा लाभ समाजाला व्हावा आणि नोकरी करून नवऱ्याच्या मिळकतीत भर घालावी ही तिची सुप्तकांक्षा असते. बदलत्या स्त्रीचे विचार प्रतिमा इंगोले यांनी प्रत्यक्ष अनुभवातून मांडलेले आहेत. स्त्री ही शब्दांवर विश्वास ठेवणारी व प्रामाणिकपणाने आपले काम करणारी असते. परंतु अहंकाराचे विषारी फुत्कार अनेक स्त्रियांना आयुष्यातून उठविण्यास कसे कारणीभूत होतात, याचे चित्रण लेखिकेने केले आहे. अनुराधाही उच्चविद्याविभूषित असल्यामुळे तिला महाविद्यालयात नोकरी मिळते; परंतु प्राचार्यांना ती नकोशी असल्यामुळे ते जाणीवपूर्वक तिला डावलण्यासाठी मुलाखती घेतात; परंतु जेव्हा तिला डावलण्यात येते तेव्हा मात्र अनुराधाचा शब्दावर विश्वास राहत नाही. प्राचार्यांवर जो भाबडा विश्वास ती टाकते; त्याचा चकनाचूर होतो. शिक्षणक्षेत्रातही कोणीच शब्द पाळत नाही व विश्वास ठेवत नाही, याची जाणीव अनुराधाला होते. शिक्षणक्षेत्रात निर्माण होत चाललेला विश्वासघात लेखिका मांडण्याचा प्रयत्न करतात. ज्या क्षेत्राला आदर्श व पवित्र समजले जाते ते क्षेत्रही आता किती खालच्या स्तराला जात आहे,याचे वास्तव चित्रण प्रतिमा इंगोले करतातण

एम. ए. ला क्लास मिळविला असतानाही नोकरी मात्र अंशकालीन असल्यामुळे अनुराधाचा जगण्याचा उत्साहच संपतो; परंतु, तरीही इतरांवर विश्वास ठेवून प्रामाणिकपणाने काम करून ती तो मिळविण्याचा प्रयत्न करते. प्राचार्यांनी धोका दिल्यामुळे आपण कुलगुरूंना विश्वासात घेऊन अन्यायाचे निवारण करू, अशी भाबडी आशा अनुराधा बाळगते. कुलगुरूही पळपुटेपणाचे भाषण देऊन तिचा उत्साहच

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

संपवितात. आता बदलत्या वास्तवात सर्वच एकमेकांचे दबलेले असल्यामुळे कुलगुरुंसारखी माणसेही हाताखालच्या प्राचार्यांना त्यांची चूक लक्षात आणून देण्याचेही धाडस करीत नाही. मिंधेपणामुळे कोणीच कोणाचा मान ठेवण्याचा प्रयत्नही करीत नाही. पवित्र समजल्या जाणाऱ्या शिक्षणक्षेत्रालाही आता गालबोट लागत आहे, याची वास्तव चित्रण प्रतिमा इंगोले करतात.

अनुराधा एक सुखसंपन्न घरातील स्त्री आहे. नवरा नोकरीवर आर्थिक प्रश्न सुटलेला असतो. आपल्या मेहनतीने मिळविलेले ज्ञान इतरांच्या उपयोगी पडावे म्हणून ती महाविद्यालयात प्राचार्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून नोकरी करण्याचा विचार करते. आपल्या कर्तव्यदक्षपणामुळे विद्यार्थी तिचा सन्मान ठेवतात. तिच्या तासिकेला बसतात आणि हेच इतर शिक्षकांना सहन होत नाही. ते तिची टिंगल करतात व प्राचार्यही तिला डावलण्याचाच विचार करतात. एखादी स्त्री नोकरी करीत असली की त्यांचे वर्चस्व, त्यांचा कामातील उत्साह, त्यांची हुशारी, त्यांची कार्यकुशलता, त्यांचा आपल्या कार्यालयातील प्रभाव या गोष्टी पुरुषांच्या वृत्तीला डिवचत असतात. त्यामुळेच ते एक सहकारी म्हणून न वागता त्यांचा द्वेषच करतात.शिक्षणक्षेत्रातही हेवेदावे, द्वेष, इतरांविषयी असलेली बेईमानी याचेच वास्तव आता तेथे दिसत आहे. हे अनुराधाच्या चित्रणाने लेखिकेने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

प्राचार्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून अनुराधा नोकरी करते; पण तेच प्राचार्य संस्थाअध्यक्षांना तिच्या विषयी खोटे सांगून त्यांच्या मनात कलुषित भावना निर्माण करतात. प्रामाणिकपणे काम करणाऱ्यांना क्षणक्षेत्रात आज मात्र स्थान नाही. चमचेगिरी करणारे शिक्षक कितीही अनुपस्थित असले तरी प्राचार्य त्यांची तक्रार अध्यक्षांकडे करीत नाहीत. हांजीहांजी करणाऱ्यांनाच आज सन्मान मिळतो. त्यांचे कोणतेच काम अडत नाही. प्रामाणिकपणाची मात्र येथे दखल घेतली जात नाही. प्राचार्य मात्र सूड उगविण्याचाच प्रयत्न करतात. तिला कमी करण्यासाठी प्रयत्नशील असतात. " पाच वर्षाच्या प्रामाणिक कामाचे फळ म्हणून नोकरीवर तिची निवड होण्याचा तिचा हक्क डावलण्यात येतो. आपल्यावरील धडधडीत अन्यायाला शब्दरूप देण्याचा नुराधाचा प्रयत्न म्हणजेच ही कादंबरी आहे. विचार करण्याची क्षमता असणाऱ्या स्त्रीचेच हे चित्रण आहे.'१७ प्रतिमा इंगोले यांच्या कादंबरीतील अशा वैशिष्ट्यपूर्ण स्त्रिया म्हणजेच त्यांचे कादंबरी विश्व. दर्यापूरला राहणाऱ्या लेखिकेच्या वाट्याला मर्यादित अनुभवक्षेत्र आले असले तरी त्यांच्या लेखनात, व्यक्तिचित्रणात आणि अर्थातच स्त्रीचित्रणात एक विकास आढळतो. आपल्या जगण्यातले कुरूपसुरूप अनुभव शब्दबद्ध करता करता स्वत: चे जगणे ही स्त्री तपासून बघते. कादंबरी सजविण्याचाच त्यांचा प्रयत्न नसून समाजातील, शिक्षणक्षेत्रातील कठीण होत चाललेले क्षेत्र साहित्यरूपाने

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

दाखविण्याचा व त्यात बदल घडविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

ऑफिसमध्ये साहेबांचेच दुर्लक्ष अनुराधाकडे होत असल्यामुळे इतर कर्मचारीही तिचा द्वेष करीत असतात. अनुराधाला जाहिरात देण्याचे सांगूनही कॉलेजचा कारकून मात्र तिला ती देत नाही. एक स्त्री असूनही तिच्या भावनेचा विचार पुरुषीमंडळी करीत नाही. तिला त्रास देण्यातच ते स्वत: ला धन्य समजतात. आजपर्यंत अशिक्षित स्त्रीचाच छळ होत होता; परंतु, आता उच्चविद्याविभूषित असणाऱ्या असंख्य अनुराधासारख्यांचा छळ होत आहे आणि तो निमूटपणे सहन करणारा स्त्रीवर्गही आहे." स्त्रियांचे अन्यायाचे,दु:खाचे, वेदनेचे दिवस अद्यापही संपले नाहीत हे सांगणारी यातील अनुराधा तिचे व्यक्तिमत्त्व लेखिकेने चांगले चित्रित केले आहे. स्त्रीवरील अत्याचाराचे एक विलक्षण भेदक चित्रण या कादंबरीत बघायला मिळते. "नीतिमूल्यांचा, कार्यकुशलतेचा पराभव होणाऱ्या या काळात अनुराधासारख्या कार्यकुशल स्त्रीला संघर्षाचा सामना करत-करत शेवटी निर्विकारपणे सर्वच सोसावे लागते. ज्याप्रमाणे ग्रामीण स्त्रीला जगण्यासाठी जन्मभर तडजोडी स्वीकाराव्या लागतात, त्याचप्रमाणे बदलत्या काळातही खेड्यातल्या स्त्रीने शिक्षण घेऊन अधिकारी वर्गासमोर, समाजातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या लोकांसमोर तडजोडीच स्वीकाराव्या लागतात. त्याशिवाय त्यांच्यासमोर कोणताच पर्यायही नसतो. स्त्रीत्वासाठी जगलेली जुनी पिढी आणि जोखडातून मुक्त होण्यासाठी धडपडणारी नवी पिढी असा हा स्वीचित्रणाचा प्रवास प्रतिमा इंगोले यांनी मांडलेला आहे. स्त्री जीवनाबद्दल आस्था व जिव्हाळा असल्यामुळेच स्त्री जीवनाचा वेध प्रतिमा इंगोले समर्थपणे घेतात, असे म्हणता येईल.

ग्रामीण साहित्यामध्ये ग्रामीण स्त्रियांचे दु:ख, त्यांची अगतिकता व निराधारपणा हाच कादंबरीचा विषय जास्तीत जास्त प्रमाणात मांडण्यात आला. प्रतिमा इंगोले यांनी शिक्षकीपेशांचा जवळून अनुभव घेतल्यामुळे, त्यांनी ग्रामीण भागातीलच शिक्षण घेऊन महाविद्यालयात शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या सुशिक्षित स्त्रीचे चित्रण करून ग्रामीण कादंबरीला नवीन विषय दिलेला आहे. खेड्यातील स्त्रियांवरच अन्याय होत नसून तो सुशिक्षित स्त्रियांनादेखील सहन करावा लागतो. त्याचा प्रतिकार करण्याची क्षमता असूनही न्यायदान करणारे मिंधेपणामुळे न्याय देत नसल्यामुळे तो अन्याय निमूटपणे सहन करण्याशिवाय कोणताच पर्याय नसतो. हे बदलत्या समाजातले नवीन वास्तव प्रतिमा इंगोले यांनी मांडलेले आहे.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

स्त्रियांकडे पुरुषमंडळी एका वेगळ्या नजरेने पाहतात. त्यामुळे आपले म्हणणे स्त्रीने नाकारले, तर त्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्रास देण्याचा प्रयत्न पुरुषीवृत्तीचा असतो. एक स्त्री म्हणून दुसऱ्या स्त्रीचे दुःख जाणणारी सरलाताई केवळ तोंडकौतुक म्हणून अनुराधाला सहकार्य करतात, पण वेळ आली की, नाकर्तेपणाची भूमिका घेतात. स्त्रीसुद्धा स्त्रीसाठी योग्य न्याय देऊ शकत नाही याची जाणीव कादंबरीमध्ये सहज निर्माण होते. सरलाताईच्या चित्रणाने लेखिका श्रीमंत घरातील स्त्रीचे दुःख मांडण्याचा प्रयत्न करतात. स्थानिक कार्यकारिणीच्या अध्यक्षांची सरलाताई पत्नी, मूलबाळ नसल्यामुळे जीवन जगण्यासाठी दुसऱ्याचे कौतुक करण्याचा त्यांचा छंद होता. त्या छंदामुळेच त्यांच्या स्वभावात औदार्य निर्माण होते. त्यामुळेच अनुराधाला त्या नोकरी करण्याचा सल्ला देतात. तेथूनच अनुराधा नोकरीचा विचार करते. शिक्षणक्षेत्रात शिरलेल्या विकृत, विकारी वृत्तीची तिला कल्पना नव्हती. गुणवत्ता म्हणजेच श्रेष्ठता हेच तिचं समीकरण होतं. त्यामुळे गावात प्राचार्यांची चर्चा होत असतानाही तिने नोकरी करण्याचा विचार केला होता. बदलत्या काळातही स्त्री स्वभाव हा भावनाशील असल्याची कल्पना अनुराधाच्या चित्रणाने लेखिका मांडतात. बिनबुडाचा लोटा म्हणूनच सरलाताई अनुराधाचे काम करतात. प्राचार्यांनी नाकारल्यामुळे त्या काहीच करू शकत नाही. वास्तविक, त्यांनी आग्रह धरला असता तर तिचे काम झाले असते. पण श्रीमंत व सुशिक्षित असूनही न्याय्य हक्क मागण्याची क्षमता स्त्रीमध्ये नाही. एक स्त्री सुद्धा स्त्रीचे सहकार्य करण्याचे धाडस करत नाही. त्यामुळे ग्रामीण स्त्रीचा संसार आणि सुशिक्षित स्त्रीचा संसार यांच्या दुःखात फरक आहे, पण दोघींनाही दुःख आहेच.

पूर्वी आणि आजही पुरुषांना किंवा समाजाला स्त्रीचा विकास खुंटला तरी चालतो, परंतु तिचा संसार मोडलेला चालत नाही. स्त्री म्हणजे घरातील बंदिस्त जीव. तिने मुलांना सांभाळावे, घरकाम करावे, हे जुनेच विचार आजही कायम आहेत. अनुराधाला जिल्ह्याच्या ठिकाणी फुलटाईम नोकरी मिळत होती. पण आपल्या संसाराचं खोबरं होईल म्हणून ती नोकरी करीत नाही. घरातील संस्कारही लहानपणी तिच्यावर तसेच होतात. पुरुषांची सेवा करण्यातच स्त्रिला धन्यता वाटते. शिक्षणाने कोणताच फरक त्यांच्या स्वभावात पडणारा नसतो. सरलाताईनाही हेच अपेक्षित होते. स्त्रियांचे संसाराचे विचार जोपर्यंत बदलत नाही तोपर्यंत त्यांना न्याय देण्याचे कोणीच धाडस करणार नाही हे समाजातले धगधगते वास्तवचित्रण वाचकांसमोर प्रतिमा इंगोले दृश्य स्वरूपात उभे करतात.

आज समाजामध्ये सुशिक्षित असो की, अशिक्षित, पुरुषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदललेला नाही. स्त्रीला इतरांसमोर बोलण्याची मुभाच समाज देत नाही. स्त्रीसाठी फक्त वडील, भाऊ, नवरा

व मुलगा याव्यतिरिक्त दुसरे नाते समाजाने ठेवलेले नाही. इतरांसोबत बोलले की समाज एका वेगळ्याच नजरेने स्त्रीकडे पाहतो. जवळजवळ कधीतरी तिला समाजातूनही बहिष्कृत व्हावे लागते, त्याची जाणीव सुशिक्षित असणाऱ्या अनुराधाला होती. त्यामुळे तिने आपले महाविद्यालयातील संबंध परिस्थितीसमोर न झुकता सोयीनुसारच ठेवले आणि त्याचमुळे तिला शेवटी नोकरीला मुकावे लागले. अनुराधाच्या रूपाने लेखिका वर्णन करतात की, स्त्रीला पैसा, प्रतिष्ठा आणि पद यांपेक्षाही स्वत: चे स्त्रीत्व सांभाळणे अधिक मोलाचे वाटते.अनुराधाही एका साध्या नोकरीपुढे स्त्रीत्वाला कलंक लागू देत नाही. ग्रामीण सुशिक्षित बदलत्या विचाराच्या स्त्रियांचे ती प्रतिनिधित्व करणारी ठरते.

प्राचार्यांना प्रशासकीय अधिकार असल्यामुळे संस्थाही त्याला आपल्या सद्सद्विवेकबुद्धीचा विचार करून जाब विचारू शकत नाही. त्यामुळे प्राचार्यांची भडवेगिरी न करणाऱ्यांना कॉलजमध्ये त्यांचा त्रास सहन करावा लागतो किंवा नोकरीलाही मुकावे लागे. हे आजचे शिक्षणक्षेत्रातले वास्तव प्रतिमा इंगोले यांनी मांडलेले आहे. लेखिका म्हणतात की, सरकार जसे कर्मचाऱ्याधीन झाले आहे, तशाच संस्थाही कर्मचाऱ्यांधीनच झाल्या आहेत. कारण संस्थाप्रमुखांना स्वत: चे प्रमुखपण महत्त्वाचे वाटते. त्यामुळेच ते कर्मचाऱ्यांवर अवलंबून राहतात. ' पार्टटाईम' ही कादंबरी महाविद्यालयातील कार्यपद्धतीचा लेखाजोखा मांडणारी ठरू शकते. ग्रामीण लेखिकेचा वास्तव मांडण्याचा पिंडच असल्यामुळे प्रतिमा इंगोलेही त्याच दिशेने लेखन करताना दिसतात. अनुराधाच्या मनात साहेबांविषयी निराकार, निरागस, निर्व्याज्य असे प्रेम असते; पण साहेब मात्र आसक्तीच्या नजरेतून तिच्याकडे पाहतात. त्यांना हवे असणारे संबंध ठेवले असते, तर आज ही पाळी आपल्यावर आली नसती. पण एक पातिव्रत्याचा सन्मान केल्यामुळे तिला आनंदही होतो. पुरुषांच्या पुरुषी अहंकाराला बळी न पडता आपल्या कामात कर्तव्यदक्ष राहणारी अनुराधा नव्या पिढीला प्रेरणा देणारी ठरते. नवऱ्यावरील प्रेमाची, जिव्हाळ्याची, आदराची जात वेगळी आणि साहेबांविषयीच्या जिव्हाळ्याची, आदराची जात वेगळी असल्याची जाणीव अनुराधाला झालेली असते. समाजात स्त्रीपुरुषांच एकच नातं प्रचलित आहे आणि ते म्हणजे पुरुष श्रेष्ठ आणि स्त्री कनिष्ठ त्यामुळेच प्रत्येक पुरुषाला स्त्रीचे आपण दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पालन करावे असेच वाटते. गुरुशिष्यिणीच्या नात्याकडेही समाज निकोपपणे पाहू शकत नाही. हे सामाजिक वास्तव लेखिका मांडताना दिसून येतात. पुरुष बॉसच्या अत्याचाराला अनेक स्त्रियांना बळी पडावे लागते. ती बिचारी ओरडूही शकत नाही. पूर्वीची मजूर स्त्री तिला पसंत नसलेल्या शेतात जात नव्हती. पण नोकरीचे तसे नाही, म्हणजेच स्त्री शिकली तरी पूर्वीच्या

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

मजूर स्त्रीच्या वाट्याला येणारी अगतिकता तिच्याही वाट्याला येत आहे. उलट तिची अधिक कोंडी होत आहे. " शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या अनुराधाच्या मनाचा मागोवा घेत समाजाच्या मानसिकतेला छेद देणारे भीषण समाजवास्तव लेखिकेने कादंबरीतून उभे केले आहे." प्राचार्यांचा आणि सहकाऱ्यांचा प्रारंभीचा दृष्टिकोन सकारात्मक असतो. परंतु, तिच्या शिकविण्याची, लोकप्रियतेची ख्याती जशी जशी वाढत जाते तसे तसे तिच्यावर अनेक दुर्धर प्रसंग ओढवतात. तिच्या प्रत्येक सकारात्मक कृतीकडे पाहण्याचा सहकारी लोकांचा दृष्टिकोन पूर्णपणे नकारात्मक होतो. नोकरीची कारकीर्द पारदर्शक ठेवण्यासाठी तारेवरची कसरत करते व आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या उभारीलाही मुकते. अनुराधाचा बाणेदारपणा आणि तिच्या व्यक्तिमत्त्वांची उभारी निर्देशित करताना असूया आणि मत्सराने पेटलेला पुरुषी अहंकार तिचे भावविश्व कुस्करून टाकतो, हीच एक केंद्रीभूत बाजू या कादंबरीतून अधिक स्पष्टपणे पुढे येत असल्याचे दिसते. प्रतिमा इंगोले यांची ' पार्टटाईम' ही पंचवीस प्रकरणाची कादंबरी आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांना अर्पण केली आहे. सावित्रीबाईंना समाज परिवर्तन घडविण्यासाठी संकटांना सामोरे जावे लागले. त्याचप्रमाणे अनुराधालाही नोकरी करताना सुशिक्षित पुरुषांच्या अहंकाराचा सामना करावा लागला. दोघींनाही संघर्षाचा सामना करावा लागला. फरक फक्त एवढाच की, सावित्रीबाईंना अशिक्षित समाजाला दिशा देण्यासाठी आणि अनुराधाला सुशिक्षित लोकांच्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनात बदल घडविण्यासाठी. परंतु अशाही संकटमय परिस्थितीत अनुराधा डगमगलेली नाही. सावित्रीबाईंनी ज्याप्रमाणे संयमाने परिवर्तन घडविले त्याचप्रमाणे तिने संयमानेच स्त्रीत्व सांभाळले. समाजामध्ये बाह्य परिवर्तन घडले असले तरी अंतर्यामी मात्र बदल झालेला नाही. हेच प्रतिमा इंगोले यांना दाखवायचे आहे. सुशिक्षित समजणाऱ्या पुरुषांना आपण करतो त्या कृत्याची जाणीव करून द्यायची आहे. पुरुषांच्या सहवासात फुलणारी, संसाराच्या दावणीला जखडली गेल्याने बिचारी ओरडूही शकत नाही. पूर्वीची मजूर स्त्री तिला पसंत नसलेल्या शेतात जात नव्हती. पण नोकरीचे तसे नाही, म्हणजेच स्त्री शिकली तरी पूर्वीच्या मजूर स्त्रीच्या वाट्याला येणारी अगतिकता तिच्याही वाट्याला येत आहे. उलट तिची अधिक कोंडी होत आहे. " शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्या अनुराधाच्या मनाचा मागोवा घेत समाजाच्या मानसिकतेला छेद देणारे भीषण समाजवास्तव लेखिकेने कादंबरीतून उभे केले आहे." प्राचार्यांचा आणि सहकाऱ्यांचा प्रारंभीचा दृष्टिकोन सकारात्मक असतो. परंतु, तिच्या शिकविण्याची, लोकप्रियतेची ख्याती जशी जशी वाढत जाते तसे तसे तिच्यावर अनेक दुर्धर प्रसंग ओढवतात. तिच्या प्रत्येक सकारात्मक कृतीकडे पाहण्याचा सहकारी लोकांचा दृष्टिकोन पूर्णपणे नकारात्मक होतो. नोकरीची कारकीर्द पारदर्शक ठेवण्यासाठी तारेवरची कसरत करते व

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या उभारीलाही मुकते. अनुराधाचा बाणेदारपणा आणि तिच्या व्यक्तिमत्त्वांची उभारी निर्देशित करताना असूया आणि मत्सराने पेटलेला पुरुषी अहंकार तिचे भावविश्व कुस्करून टाकतो, हीच एक केंद्रीभूत बाजू या कादंबरीतून अधिक स्पष्टपणे पुढे येत असल्याचे दिसते.

प्रतिमा इंगोले यांची ' पार्टटाईम' ही पंचवीस प्रकरणाची कादंबरी आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांना अर्पण केली आहे. सावित्रीबाईंना समाज परिवर्तन घडविण्यासाठी संकटांना सामोरे जावे लागले. त्याचप्रमाणे अनुराधालाही नोकरी करताना सुशिक्षित पुरुषांच्या अहंकाराचा सामना करावा लागला. दोघींनाही संघर्षाचा सामना करावा लागला. फरक फक्त एवढाच की, सावित्रीबाईंना अशिक्षित समाजाला दिशा देण्यासाठी आणि अनुराधाला सुशिक्षित लोकांच्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनात बदल घडविण्यासाठी. परंतु अशाही संकटमय परिस्थितीत अनुराधा डगमगलेली नाही. सावित्रीबाईंनी ज्याप्रमाणे संयमाने परिवर्तन घडविले त्याचप्रमाणे तिने संयमानेच स्त्रीत्व सांभाळले. समाजामध्ये बाह्य परिवर्तन घडले असले तरी अंतर्यामी मात्र बदल झालेला नाही. हेच प्रतिमा इंगोले यांना दाखवायचे आहे. सुशिक्षित समजणाऱ्या पुरुषांना आपण करतो त्या कृत्याची जाणीव करून द्यायची आहे.

पुरुषांच्या सहवासात फुलणारी, संसाराच्या दावणीला जखडली गेल्याने अस्वच्छ होणारी, कधी शब्दांनी होणारे घाव सहन करतांना कोमेजणारी आणि नंतर हळूहळू जिद्दीने स्वतंत्रपणे जगण्याची उमेद बाळगणारी स्त्री प्रतिमा इंगोले यांनी ' पार्टटाईम' मध्ये चित्रित केली आहे. आपले माणूसपण नाकारल्याची वेदना या लेखिकेने बोलकी केली आहे. आयुष्यभर तडजोडी करत जगलेली आणि पुरूषी अहंकाराच्या जोखडातून मुक्त होण्यासाठी धडपडणारी नायिका त्यांनी कादंबरीत रेखाटली आहे.

स्त्री ही फक्त स्त्रीच असते असे मानणाऱ्या या विकृत पुरूषी वृत्तीची कल्पना मात्र अनुराधाला नसते. स्थितप्रज्ञ नजरेनेच तो इतरांकडे पाहत असते स्त्रीही सोशिकवृत्तीची असते. इतरांना सन्मान कण्याची तिची वृत्ती असते. पण तिच्या भावनेला तडा जातो तिच्याकडे वेगळ्या नजरेतुन बघितले जाते, तेव्हा मात्र ती त्या सर्वशक्तीनिशी संघर्ष करते. स्त्री ही कितीही संयमी असली तरी सुशिक्षित वर्ग मात्र तिच्या स्त्रीत्वाकडे नजर ठेवून तिला डिचवण्याचा प्रयत्न करतो, हे वास्तव लेखिका मांडतात.

आपल्या प्रामाणिकपणाने अनुराधा कर्तव्य पार पाडते. पण साहेबांना वेगळीच अपेक्षा असल्यामुळे ते मात्र तिच्यामुळे मिळणाऱ्या विकृत आनंदासाठी तडफडतात. त्यांच्या कावेबाजपणाची तिला कल्पना होती. पण दव्यांची टोपली कुठेतरी ठेवावीच लागणार असल्यामुळे शिक्षण घेणारांना

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161
SHABDSANCHAY

अक्कल वापरून चालत नाही. शिक्षण क्षेत्रामध्ये वाढत चाचलेली ठरविक लोकांची अरेरावी व त्यापासून उच्चशिक्षीत लोकांला विशेष स्त्रियांना सोसावा लागणारा अन्याय प्रतिमा इंगोले यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

माणसाला जगण्यासाठी व समाजात राहण्यासाठी प्रत्येक गोष्टीशी संघर्ष करावाच लागतो. त्यातून होणारी पिळवणूक निमूटपणे सहन करावी लागते. त्याचा प्रतिकार करण्याची क्षमता असतानाही समाजशीलतेचा प्रश्न असल्यामुळे तो करता येत नाही. लेखिका उच्चविद्याविभूषित असणारी अनुराधा व एक मजुरी करणारी स्त्री यांचे दु:ख सारखेच असल्याचे सांगतात. अनुराधासारख्या अनेक स्त्रिया खेड्यात व नोकरीत हा अत्याचार सोसत आहेत. उपजीविकेसाठी मानवी प्राण्याला तो सहनच करावा लागतो, हे अनुराधाच्या रूपाने आपल्या लक्षात येते. स्त्रीला कुठेही स्वयंपुर्णता नाही. घरात राहायचे तर वनऱ्याचा मार सहन करावा लागतो. नवरा सोडला तर समाजाचे टोमणे सोसावे लागतात आणि मग अशा परिस्थितीत स्त्रिया नवऱ्याचाच मार सहन करतात. त्यातूनच पुरुषी विकृती वाढीस लागते.कितीही कायदे झाले तरी समाजातील स्त्रीशोषणाचे वास्तव बदलणार नाही,याचा प्रत्यय कादंबरीतून येतो.

स्त्रीने पुरुषावर निराकार, निरामय, निर्व्याज असे प्रेम केले तरीही पुरुष मात्र तिच्याकडे वाईट दृष्टिकोनातूनच पाहतो. अनुराधाही संयमी व समतोल स्वभावाची असल्यामुळेच ती साहेबांना प्रत्यक्षात बोलून दाखवत नाही त्यामुळेच त्यांचा मानभावीपणा वाढतच जातो. आपल्या छोट्याशा अधिकारापुढे साहेब स्त्री एक माणूस म्हणूनही तिची दखल घेत नाही. आज वास्तवात जो वाईट वागेल, चमचेगिरी करील त्यांनाचा स्थान आहे. अनुराधासारख्या संयमी व प्रामाणिक माणसाला समाज जाणीवपूर्वक दूर लोटण्याचा प्रयत्न करतो. जो स्वत: चे कर्तव्य संयमाने पार पाडतो,त्याच्यापेक्षा कामचुकारपणा करून हांजीहांजी करणाऱ्यांनाच मोठी पदे मिळतात, हे अजब सत्य लेखिका दृश्य रूपात मांडतात.

पुरुषांच्या अहंकारी वृत्तीमुळे स्त्रीला आपला मार्ग बदलावा लागतो.शिक्षणक्षेत्रात शिक्षकांचा दबदबा असण्याचे दिवस संपलेले आहेत. त्यामुळे अनुराधा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे टाळते. एका स्त्रीची परिवर्तन घडविण्याची महत्त्वाकांक्षा केवळ पुरुषी वृत्तीसमोर लोप पावते. अशाच व्यवहारी जगामुळे आज दिवसेंदिवस माणूस हा आत्मकेंद्री बनत चाललेला आहे. विचाराने परिपक्व असणाऱ्या स्त्रीला मात्र स्वत: च्या वागण्यावर विश्वास असतो. त्यामुळे ती डगमगत नाही. अनुराधा ही सुशिक्षित असूनही

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

तिच्यावर अनेक संकटे येतात; पण ती त्याला संयमाने सामोरे जाते. प्रतिमा इंगोले यांनी वर्णन केलेली सुशिक्षित स्त्री, ही समंजस, सहनशील, स्त्रीत्वाचे भान ठेवून जगणारी, कुटुंबावर, पतीवर प्रेम करणारी, मूकपणे संघर्षाला सामोरे जाणारी, प्रसंगी कठोर होणारी अशी विविधांगी स्वभाव असलेली स्त्री आहे. येणाऱ्या पिढीतील स्त्रीचे ती प्रतिनिधित्व करणारी आहे. त्यांना प्रेरणा देणारी आहे. महाविद्यालयामध्ये एकच पात्रता, काम सारखेच, परंतु पगार मात्र भिन्न आहे. पार्टटाईम असणारा अर्धा पगार घेऊन काम मात्र पूर्ण करतो. शिवाय,त्याला ऑगस्ट ते मार्च अशीच ऑर्डर दिली जाते. पाच महिन्यांचा त्याला पगार मिळत नाही व नेहमीच टेमपररी राहावे लागते. बालमजूर शेतावर कामासाठी गेल्यावर त्याला अर्धाच रोज मिळतो व तो कामही अर्धेच करतो. पण शिक्षणक्षेत्रात उच्चविद्याविभूषित असणाऱ्यांकडून काम पूर्ण आणि पगार अर्धा अशाप्रकारे काम करून घेतात. शिक्षणक्षेत्रातील दुरावस्था बालमजुरासारखी असल्याचे सत्य लेखिका मांडतात. एका मजुराएवढाही पार्टटाईम नोकरी करणाऱ्यांना मान नसतो, हे वास्तव लेखिका प्रत्यक्षात दाखविण्याचा प्रयत्न करतात. खाजगी शिक्षण संस्थांमधून शिक्षणापेक्षा इतर गोष्टींचे स्तोम वाढलेले दिसते. अशावेळी ज्या विद्यार्थ्यांसाठी संस्था काढलेल्या असतात, त्यांच्याच हिताचा बळी दिला जातो. त्यामुळे या क्षेत्रात स्त्रियांना घेणे व टिकू देणे संबंधितांना अडचणीचे ठरते. कारण स्त्री स्वभावतः प्रामाणिक असते. पुरुषांना प्रामाणिक काम करणाऱ्या कर्तव्यदक्ष असणाऱ्या स्त्रियां सोबत असलेल्या चालत नाही. त्यामुळे त्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे कमी करण्याचाच त्यांचा उद्देश असतो. कर्तव्यदक्ष व स्वावलंबी असणाऱ्या पुरुषाला इतरांच्या सहवासाची गरज नसते. परंतु त्यांच्या उणिवा व अपुरे ज्ञान झाकण्यासाठी किंवा नवीन निर्णय घेण्याची क्षमता नसल्यामुळे दोन-चार लोकांना सोबत करणे महत्त्वाचे असते. अशावेळेस स्त्री ही सोबत राहत नाही व ती तिच्या कामात सृजनशीलता घेऊन प्रामाणिकपणा ठेवते. त्यामुळे तिला दुसऱ्याच्या संगतीची गरज नसते. म्हणून शिक्षणक्षेत्रात चमचेगिरी करणाऱ्यांची, अकार्यक्षम असणाऱ्यांची काम करण्याची पद्धती ही टोळी ' रुपाची असते. त्यात त्यांना स्त्री नको म्हणून स्त्रीला अन्यायाचा सामना करावा लागतो. हे वास्तव लेखिका मांडतात.

प्रतिमा इंगोले यांनी पार्टटाईम नोकरी करणाऱ्या स्त्रीकडे गावातील माणसेही तुच्छ नजरेने पाहतात, त्यांना कवडीचाही मान देत नाही, हे वास्तव गहरवार या तरुणाच्या चित्रणाने स्पष्ट केले आहे. अंशकालीन प्राध्यापकांची शोकांतिकाच प्रतिमा इंगोले यांनी' पार्टटाईम'च्या रूपाने मांडलेली आहे.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

शिक्षणक्षेत्रातले हेवेदावे उणिवा त्यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.प्रतिमा इंगोले यांचे स्थान वेगळ्या उंचीवर आहे व त्याचे कारण हे की त्यांच्या लेखनात उतरणारे ग्रामीण जीवन हे केवळ कल्पनाविष्कार नसून डोळसपणे अनुभवलेले उघड वास्तव आहे. ग्रामीण भागातील चालीरीती, समाज जीवनातील चढाव, उतार त्यांनी जवळून पाहिले आहेत व त्यामुळे त्याचा अस्सलपणा त्यांच्या लिखाणात दिसून येतो. शहरीकरणाचे आक्रमण,आकर्षण कधीही दृष्टीस न पडलेला भरपूर पैसा या सर्वांच्या प्रभावामुळे संपूर्ण ग्रामजीवनास हादरे बसू लागले. माणसाचे अंतर्बाह्य विश्व बदलून गेले. गावपातळीवरील या बदलत्या विश्वाचे चित्रण कादंबरीत येते. वहाडी लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवरील प्रस्तुत कादंबरीत गोकर्णा,बुढा व सत्तू या कुटुंबाचे जीवन चित्रण म्हणजे गावपातळीवरील दरिद्री, शोषित कुटुंबाचे प्रातिनिधिक रूप आहे. भोळेभाबडे कुटुंब परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी शहरात जाते आणि त्यांचे संपूर्ण जीवन व भावविश्वच उद्ध्वस्त होऊन जाते.

खेड्यातून शहरात आल्यावर त्यांना कोणीच जवळ करीत नाही.ग्रामीण भागातील आपुलकी गोकर्णाला नवजीवन नगरातील माणसात दिसत नाही. गोकर्णाला एकटेपणाची व परकेपणाची जाणीव होऊ लागते. प्रत्यक्ष जीवनात संघर्ष मात्र गोकर्णालाच करावा लागतो. ' खेड्यातील स्त्रीला शहरातील स्त्रिया लाचार व हलकट समजतात. प्रतिमा इंगोले या खेड्यातल्या स्त्रीचा स्वभाव आणि शहरी स्त्रीचा स्वभाव वास्तव रूपाने मांडतात. डॉ. किशोर सानप म्हणाला," गोकर्णाचे दु: ख हे खेड्यातून शहरात येणाऱ्या कष्टकरी कुटुंबाचे प्रातिनिधिक दु:ख ठरावे अशी लेखिकेची अपेक्षा आहे. " ग्रामीण स्त्रीचे दु:ख हे प्रातिनिधिक ठरवण्यासाठी दु:खाचे जे व्यापक आणि विशाल असे सामाजिक रूप असते ते गोकर्णाच्या चित्रणाने लेखिकेने रेखाटले आहे. जननीला जसा आपल्या मुलांचा लळा असतो तसाच तो जमिनीलाही असतो. अनेक नैसर्गिक आघात सहन करून जमीन पिकते, फुलते. तसेच स्त्री ही सुद्धा जमिनीचाच अविभाज्य भाग आहे, अशी सांस्कृतिक मूल्याची बैठक असलेल्या मूल्यविचार प्रतिमा इंगोले यांनी मांडला आहे. कादंबरीची पार्श्वभूमी व परिसर यात अनेक बारकावे प्रतिमा इंगोले यांनी अचूकपणे टिपले आहेत.' झुलवा ' कादंबरीप्रमाणे घरासमोरील लिंबही येथे व्यक्तिमत्त्व तिचा धारण कादंबरीत बाल करतो सत्तू. स्वभाव बकरीच्या व गोकर्णा व्यक्त, यांची कुत्र्याच्या करते दु:खे. स्त्रीप्रमाणेच पिलाची काळ्या सत्तूच्या मातीची माती मनात दु:खे सृजनशील म्हणून असलेली असते मांडण्यात. लेखिका यशस्वी झालेल्या आहेत " लेखिकेने वापरलेल्या ग्राम जीवनातील प्रतिमा अतिशय समर्पक व अर्थपूर्ण आहेत. त्यांचे कादंबरीचे लिखाण' स्त्रीकेंद्री ' असले तरी स्त्रीवादी नाही याचा प्रत्यय या कादंबरीतून येतो.'१८ सत्तू व गोकर्णा यांची

विचारसरणी पारंपरिकच आहे. स्त्रीच्या जातीला नवऱ्यांशिवाय पर्याय नाही,असा विचार लेखिकेने गोकर्णा व सत्तूवर लादला आहे. महागाईमुळे त्रस्त होणारे लोकजीवन, शहरी अतिक्रमण, माणसामाणसामधील तणाव असे अनेक पदर या कलाकृतीत शोधता येतात. कादंबरीच्या विविध घटकांचे मिश्रण एकजीवपणे साधण्याचा प्रयत्न लेखिकेने केला आहे. स्त्रीजीवनाच्या परवशतेच्या सर्वांगाने होणाऱ्या कोंडीचे दर्शन या कादंबरीतून घडते. स्त्रियांचे अन्यायाचे, दु:खाचे, वेदनेचे दिवस अद्यापही संपले नाहीत,या भूमिकेवर आणि मनात दाटलेल्या विषादावर' पार्टटाईम ' कादंबरी लिहिली आहे. तृतीय पुरुषी निवेदनात्मक अशी ही कादंबरी शिक्षणक्षेत्रातल्या भ्रष्टाचारावर नेमके बोट ठेवते. त्याहूनही ती स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचीच अधिक असल्याचे दिसते. स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करताना त्या स्वाभाविकपणे, सहजपणे लेखिका व्यक्त करतात. स्त्रियांची मन: पूर्वकता, काहीसा हळवेपणा, बरीचशी भावुकता, वास्तवाचे भान या सर्व गोष्टी' पार्टटाईम ' मध्ये नैसर्गिकपणे, समतोलपणे व्यक्त होतात. शिक्षणक्षेत्रातील सुशिक्षित स्त्रीचे प्रत्ययकारी दर्शन लेखिका चित्रित करतात. कादंबरीचा आकार लहान आहे. पण स्त्रियांवरील शिक्षणक्षेत्रात किती अत्याचार होतो, हे स्पष्टपणे जाणविणारी ही ग्रामीण कादंबरी आहे. वास्तावतले संदर्भ घेऊन, जीवनाचे व्यापक व सखोल दर्शन ही कादंबरी घडविते. लेखिकेने वास्तवातलेच सारे संदर्भ घेऊन स्त्रीची, तिच्या मुक्तपणाची, तिला हव्या असलेल्या स्वातंत्र्याची एक सूचकता दर्शविली आहे. 'पार्टटाईम ' नोकरी करतानाही स्त्री म्हणून अनुराधावर अनेक प्रसंग निर्माण होतात. समीक्षक, वक्ता, लेखिका हे गुण जवळ असतानाही विद्यार्थ्यांच्या हितासाठी अंशकालीन काम करणारी अनुराधा पुरुषी अहंकारामुळे मनातून न खचता आपला निर्णय बदलते. मानवी विचाराचे पावित्र्य नष्ट होत असून स्त्री म्हणून एका वेगळ्या नजरेने पाहणारा सुशिक्षित वर्ग दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे. त्यापासून अनुराधासारख्या असंख्य नोकरी करणाऱ्या स्त्रिया तो अन्याय मन मारून सहन करीत आहेत. त्याला वाचा फोडण्याची गरज निर्माण होत आहे. कायदे करूनही कोणताच फरक पडलेला नाही. स्त्री आपल्या संसाराची जपणूक करण्यासाठी कायदा माहीत असूनही त्याचा आधार घेत नाही. परंतु एक लेखिका असतानाही प्रतिमा इंगोले यांनी न खचता ‘ पार्टटाईम ' लिहून शिक्षणक्षेत्रातल्या नीचप्रवृत्तीच्या लोकांना आवाहनच केले आहे. प्रत्यक्ष भोगलेलेच वास्तव साहित्य रूपाने लेखक मांडत असतो. असे प्रतिमा इंगोले यांच्या संदर्भात म्हणता येईल.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

स्त्रीच्या स्त्रीत्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलल्याशिवाय स्त्रीची प्रगती शक्य नाही, हेच सत्य कादंबरीतून निदर्शनास येते.“ प्रतिमा इंगोले यांनी ‘ पार्टटाईम ' या कादंबरीतून नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या वाट्याला येणारा मानसिक आणि शारीरिक छळ, तसेच स्त्रियांकडे पाहण्याची विकृत दृष्टी आपल्या साक्षात अनुभवाने मांडली आहे. एका स्त्री लेखिकेने आजच्या नोकरी करणाऱ्या स्त्रीच्या समस्यांचे समर्थपणे चित्रण केले ओह." १ ९ आज पूर्वीइतकी नोकऱ्यांची उपलब्धता सुलभ नाही. सर्वच क्षेत्रात जीव घेणारी स्पर्धा आहे. सर्वच बाबतीत आज झपाट्याने बदल होताहेत. बऱ्याच गोष्टी कालबाह्य ठरताहेत. तरीही कधीकाळी स्त्रियांकडे बघण्याचा पुरुषांचा दृष्टिकोन, त्यांची करण्यात येणारी कोंडी, नोकरी करताना त्यांची होणारी कुचंबणा वगैरे गोष्टींचे दर्शन या कादंबरीतून वाचकांना नक्कीच होईल, याचा, प्रत्यय देणारी ही कादंबरी आहे.

संदर्भ :-

1) डॉ.सुलभा हर्लेकर व डॉ प्रज्ञा आपटे, ‘आगळेअनुभव विश्व’
(डॉ प्रतिमा इंगोले) दिलीपराव प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती २००६
2) डॉ. सुलभा ‘हर्लेकर शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे भेदक चित्रण’
तरूण भारत 19 जाने २००३ (नागपुर) पृ.क्र.5

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

8

**महात्मा बसवेश्वर यांचे विचार वैश्विक परीप्रेक्ष्य :**

सायली उमाकांत शेटे
संशोधक
डॉविद्यापीठ,बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा ., औरंगाबाद.

स्थलकालाची सीमा ओलांडून सर्वत्र आस्वाद ठरलेल्या साहित्यकृती यांना विश्वसाहित्य म्हणावे अशा काही विव्दनांच्या अभिप्रायानुसार भगवतगीता,रामायण,शाकुंतल,बायबल इत्यादी साहित्यकृती जनसामान्यात असल्याचे आपणास दिसते शेवटी काय तर विश्वातील श्रेष्ठ वाङ्मय ते विश्ववाङ्मय ठरते हा अर्थ एकापरीने योग्यच म्हणावा लागेल. साहित्यविचारात गट गटे यांनी मांडलेल्या,world literature या संकल्पनेचा विचार केला तर स्वराष्ट्रीय साहित्याबरोबरच अन्य भाषीय साहित्यातील साहित्यकृतींचा देखील आपण विचार करावा, त्यात मुक्त पणे देव-घेव होऊ द्यावी असेच गटे ला म्हणायचे असावे.

कन्नड भाषेतील महात्मा बसवेश्वरांचे वचन जेव्हा लंडन येतील प्राचीन चर्चमध्ये धर्मगुरु पठन करून बायबल वाचायला सुरुवात करतात तेव्हा शरण संस्कृतीने रचलेले साहित्याची वैश्विक साहित्यात पडलेली एक मैल्यवान भर आपणास बगायला मिळते.डॉ ई.बी रैस, डॉ.विनेट एस्मित, सर जेम्स कवेल हे विदेशी तत्ववेत्ते जेव्हा बसवेश्वरांचे साहित्य वाचतात, अध्ययन करून प्रभावित होतात आणि बसवेश्वर हे भारतातील थोर समाजसुधारक होते असे म्हणतात तेंव्हा भारतात निर्माण झालेले वचनसाहित्य आणि त्यात मांडलेले विचार याने पाश्चिमात्य देश देखील प्रेरित होतो ही भारतीयांसाठी गर्वाची गोष्ट ठरते.

**<u>उदिष्ठे</u>**

१. शरण साहित्याचेविचार अभ्यासणे.
२. महात्मा बसवेश्वरांवरील भारतीय आणि पाश्चिमात्य अभ्यासकांचा अभ्यास करणे .
३. थोर समाजसुधारक महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याची ख्याती अभ्यासणे.
४. विश्वसाहित्यातील वचन साहित्याचे महत्व अभ्यासणे .

"What Ever the legend may say about Lord Basava bit the fact fully clear that he is the first free thinker of india"-Arthur Miles

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

असे डॉ. आर्थर मैल्स यांनी आपल्या 'लॅंड ऑफ लिंगम' या पुस्तकात म्हंटले आहे. एवढेच नव्हे तर आपल्या पुस्तकात महात्मा बसवेश्वरांवर विचार मांडताना बसवेश्वर यांना भारताचा ल्युथर म्हणावे लागेल असे ते म्हणतात. बसवेश्वरांच्या पूर्वीपासून भारतात पुरोहितवर्गाचे वर्चस्व होते हे पुरोहित लोक समाजामध्ये जातीवादाला खत-पाणी देत होते.या विरोधात महात्मा बसवेश्वर यांनी बंडखोरी करून समानता आणली. आपला आत्मा हाच आपला परमेश्वर मानून इष्टलिंग धारण केले आणि आपल्या आत्म्यास देव माना असे त्यांनी सांगितले व समाजातील एक स्वतंत्र विचार प्रस्थापित केला.

वीरशैव धर्माचे पाश्चिमात्य अभ्यासक शौटन हे नेदरलॅंड चे रहिवासी होते. त्यांनी वचन शास्त्राचा अभ्यास करण्यासाठी कर्नाटकात येऊन कन्नड भाषा अवगत केली. आणि नंतर 'अनुभावीगळ क्रांती' हा ग्रंथ लिहिला. बसवेश्वरांचे विचार पाश्चात्य अभ्यासक हे आपली पुस्तक रूपाने प्रकाशित केल्यामुळे त्या विचाराचा विदेशात देखील प्रसार झाला. त्यामुळे विश्वसाहीत्याची महती कळते.फक्त शौठन आणि मैल्स न्हवे तर अब्राहम रोगेरी डच ख्रिस्ती  धर्मोपदेशक आपल्या ' द ओपेन डोअर टू हिडन पास्यनिझम' या ग्रंथात विरशैवा लिहलेले आहे. अबे डुबायेणे, पिठ्ठो येलावले सर जेम्स काबेल यांनी देखील बसवेश्वरांची तत्वे आचरणात आणण्यचा पर्यंत करा असे समाजबांधवाना सांगितले.

## भारतातील वीरशैव धर्माचे स्थान

भारतात अनेक धर्मप्रवाह आहेत. प्रत्येक धर्माचे काही ना काही वैशिष्ट्य आहे. भारतात उदयाला आलेला वीर विरशैव धर्म, त्याचे विचार संस्कृती, साहित्याची फक्त भारतातच नव्हे तर विदेशात देखील महती पटली आहे. कोणत्याही एका विशिष्ट धर्माला किंवा पुरोहिताच्या विचारस खत पाणी न घालता महात्मा बसवेश्वरांनी सामान्य मानवाचा विचार करून विरशैव धर्म/ लिंगायत धर्माची स्थपना केली. फक्त पुरुषच नव्हे तर स्त्रीयांना समान मानून त्यांनाही लिहण्याचे स्वातंत्र्य मिळवून दिले.

ए.के रामानुजन यांनी "स्पिकिंग ऑफ शिव" या ग्रंथात बसवन्ना, देवर दासिमिय्या, अक्कमहादेवी, अल्लमप्रभू यांच्या वचनाचा अनुवाद केला आहे. १९६९ साली प्रदान केलेले कन्नड साहित्याचे प्रथम ज्ञानपीठ पुरस्कार विजेते डॉ.कुवेंपू यांनी रचलेले 'भारत जननिया तनुजाते जय हे कर्नाटक मते' या कवितेला कर्नाटक सरकारने सर्व शाळेत प्रार्थना गीत म्हणून गायले जाते. तर म्हैसूर विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ.जवेरेगौडा यांनी त्यांच्या एका अहवालात एक वाक्य उदधृत केले आहे.

"बसवांना  इज हिरो ऑफ कन्नड लिटरेचर
विदाऊट  बसवांना कन्नड लिटरेचर इज झिरो"

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

(बसव पद कन्नड साहित्यातून काढून टाकल्यास कन्नड साहित्य शून्य होईल.)

प्रामुख्याने बघितले तर गेल्या शंभर ते दीडशे वर्षाच्या कालखंडात भारतीय अभ्यासकांनी वीरशैव धर्म, विचार, तत्व, मुलुं यांबद्दलचे लिखाण केलेले दिसून येते. भारतातील वीरशैव धर्म हा एक थोर प्रतिष्ठीत आणि नाविन्यपूर्ण धर्म आहे. गेल्या काही दशकांचा विचार केला तरी आपणास हे लक्षात येईल की पाश्चिमात्य देशात वचन साहित्य. बसवेश्वर विचार, वीरशैव धर्म यावर पाश्चिमात्य अभ्यासक देखील अभ्यास करत आहेत.

## सारांश

जगातील कोणताही समाजसुधारक असो किंवा शास्त्रज्ञ, संशोधक, प्रतिभावंत असो तो कोणत्याही एका ठराविक धर्मात राष्ट्रात जरी जन्माला आला असला तरी तो एका भाषेचा,जाती-धर्माचा नसतो. असे झाले तर मानवतावादी कार्याला संकुचीत व बंधिस्त करण्यासारखं होईल. त्यांचे कार्य हे आखिल विश्वातील लोकांच्या सेवेसाठी असते.

लिओनार्डो-दा विंची यांची चित्रकृती असो कि गलिलिओ, न्यूटन, एडिसन यांचे शोध असो ते विशिष्ठ धर्म जात भाषा किंवा देशासाठी नाहीतर मानव जातीच्या सेवेसाठी असतो त्याच प्रकारे महामानव बसवेश्वरचे विश्वातील मानवजातीचा कैवार घेणाऱ्या लोकोत्तर महामानवाच्या उच्च श्रेणीतील एक युगपुरुष होते.

## संदर्भ

१. Arthur Miles ‘THE LAND OF THE LINGAM’, paterposter House,London,1993
२. मु वीरशैव साहित्य .म.भा.अ ,१-विश्वकोश खंड-वीरशैव ,सुधाकर मोगलेवार.संप. २००१,नागपूर,मंडळ
३. डॉ समतासूर्य महात्मा ,अशोक मेनकुदळे.बसवेश्वर.कर्नाटक २००८ ,महाराष्ट्र बसव परिषद ,
४. संपा.कर्नाटक २०१० ,महाराष्ट्र बसव परिषद ,तंगावर बसवतत्व चिंतन ,बाबुराव माशाळकर.
५. डॉ सुविद्या ,महात्मा बसवेश्वर : बाराव्या शतकातील आद्य समाजसुधारक ,अशोक मेनकुदळे. .२००३ ,प्रकाशन सोलापूर

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

९

# वैश्विक साहित्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्थान

`

संशोधक विद्यार्थीनी
श्री. शिवाजी विज्ञान, कला महाविद्यालय चिखली
जि. बुलडाणा अमरावती विद्यापीठ

**प्रास्ताविक :**

मराठी आणि हिंदी साहित्यामध्ये संत काव्याला महत्त्वाचे स्थान आहे. मराठी साहित्याची सुरुवात संत काव्याने झाल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे हिंदी साहित्याची सुरुवात देखील संत साहित्याने झाल्याचे आढळते. भारताचा मध्ययुगीन कालखंड हा बहुतांशपणे संत साहित्याने झाल्याचा आढळते. तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत भारतीय कालखंड हा संत साहित्याच्या सुरुवातीपासून चक्रधरस्वामी, संत एकनाथ व संत तुकाराम महाराजांसारखी अनेक संत मंडळी होऊन गेली आहे. तुकोबांनी जाणीवपूर्वक लोकोद्धारासाठी ओवी, अभंगाचा वापर केला. त्यांच्या विविध छंद वृत्तातील कवितांना अभंग असेच म्हटल्या जाते. संत परंपरेत, पारमार्थिक तत्त्वज्ञान – ऐच्छिक लोकजीवनाचे तत्त्वज्ञान आणि वास्तव समोर ठेवून, अभंगरचना करणारे तुकोबा हे एकमेव संत होते. तुकारामांच्या काळातच नव्हे तर आजही समाजाच्या तोंडून 'तुका म्हणे' हा अभंग बाहेर पडतो. कारण तुकाराम महाराज महाराष्ट्राचे म्हणजे महाराष्ट्रातील बहुजनांचे खरेखुरे प्रतिनिधी होते. त्यामुळे बहुजनांचे जीवनच तुकाराम महाराजांच्या काव्यात प्रतिबिंबित झालेले दिसते. म्हणूनच इतर कोणत्याही संत कवी पेक्षा तुकारामांची अभंगगाथा लोकप्रिय आहे आणि मराठी भाषा व मराठी मन कायम आहे तोपर्यंत ती अशीच लोकप्रिय राहील यात शंका नाही.

**उद्दिष्ट्ये :**

१) वैश्विक साहित्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्थान विशद करणे.
२) संत तुकाराम महाराज यांचे सामाजिक अभंग विश्लेषण करणे.
३) संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आढावा घेणे.
४) अभंग व सामाजिकता यांचे नाते स्पष्ट करणे.
५) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून आलेल्या सामाजिक पैलूंचा शोध घेणे.

**गृहीतके :**

१) संत तुकाराम महाराजांना समाज सुधारक म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे.
२) संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून त्यांचे समाज वास्तव प्रकट होते.

३) संत तुकाराम महाराजांच्या अभंग वाणीतून त्यांच्या कार्याचा ठसा दिसून येतो.
४) संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीचा उपयोग समाज प्रबोधनासाठी केलेला आहे.
५) संत तुकाराम महाराजांनी समाजविषयक मुल्यांचा अभंगवाणीत समावेश केला आहे.

**संत तुकाराम महाराजांचे सामाजिक अभंग :**

तुकोबांचा अभ्यास ही एक स्वतंत्र ज्ञानशाखाच मानावी लागते. तुकोबांची अभंग गाथा हे एकमेव या शाखेचे अभ्यास साधन आहे. एकूण ४२ वर्षांचा तुकोबांचा कालखंड परंतु या अल्पशः कालखंडातच तुकोबांनी संत, कवी, समाजसुधारक आणि धर्मसुधारक म्हणून ऐतिहासिक कार्य केले. श्री तुकाराम महाराजांचे सुमारे साडेचार हजार अभंग उपलब्ध आहे. तुकारामांचे व्यक्तिमत्त्व एकीकडे दुष्ट प्रवृत्तीवर हल्ला करण्याइतके कणखर आणि दुसरीकडे भक्तीने भरलेले अतीशय मृदू असे होते. त्यांच्या अभंगाची शैली तशी परखडही आहे आणि हळूवारही आहे.

'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास ।
कठीण वज्रासी भेदु ऐसे ।। (१)

असे तुकाराम महाराजांनी स्वत:चे वर्णन केले आहे.

तुकाराम महाराजांच्या अभंगातून त्याचे मन प्रकट होते. समाजातील सर्व अनिष्ट प्रथाचा, घातक रूढींचा ते निषेध करतात. जातीभेद त्याना मान्य नाही तसेच तुकोबाना सामाजिक प्रगतीचे पूर्णपणे भान होते, असे त्याच्या अनेक अभंगावरून सहजपणे लक्षात येते. तुकोबांनी समाजातील अनेक नात्यागोत्यांचे, वस्तूंचे, सामाजिक व्यवहारातले दृष्टांत सहजपणे सांगितले आहे. त्यातुनही तुकोबांची समाजनिरीक्षण किती सूक्ष्म होते हे पटण्यासारखे आहे.

'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा । देव तेथेची जाणावा । (२)

अशी तुकोबांनी समाज माणसाची ओळख करून देणारी परिभाषा मांडली होती.

तुकोबा समाजाचे समीक्षक, निरीक्षक, सर्जन होते, असे सदानंद मोरे यांनी म्हटले आहे.३ तुकोबांच्या व्यक्तीमत्त्वात प्रखर सुधारणावाद होता, असे भालचंद्र नेमाडे यांनी म्हटले आहे. ४ ल.रा. नसीराबादकर म्हणतात, ''रूढ संकेतांच्या दांभीकपणाच्या आणि अंधश्रद्धेच्या विध्वंसाने प्रथमच समाजाची मनोभूमी नांगरून तिच्यात प्रांजळ भक्तीभाव, नीती आणि समाजोद्धाराचे विधायक बी पेरणारा संत म्हणजे तुकाराम होय.'' ५

समाजातील दुर्जनांचा अनेक अभंगातून त्यांनी नि:पात घडवून आणला. कठोर शासन करण्याचा आग्रह धरला. भक्त आणि माणूस भिन्न नसून विठ्ठलाच्या भक्तानेच समाजशुद्धीचे कार्य केले पाहिजे असे त्यांना खालील अभंगावरून सांगितले.

भीत नाही आता आपुल्या मरणा ।

दु:खी होता जना न देखवे ।। (६)

अशा अनेक अभंगातून त्यांनी दूर्जनांविरुद्ध बंड पुकारल्याचे दिसून येते.

**तुकोबांच्या अभंगातून दिलेली सामाजिक शिकवण :**

तुकाराम महाराजांनी तत्कालीन समाजातील ज्या गैरसमजुती आणि दुराचार होते त्यांच्यावर टीका टिप्पणी करून समाजाला निखळ आणि शुद्धचरणाची शिकवण दिली. द्रव्य घेउन कथा करू नये, अशीही शिकवण तुकोबांनी दिली आहे. कीर्तनकाराने समाजात किती शुद्ध आचरण करावे द्रव्य घेऊ नये, माथी टिळा, बुक्का लावू नये, कीर्तनाच्या जागी अन्नही घेऊ नये, कीर्तन हा पोटापाण्यासाठी करू नये असे अनेक सामान्य नीती विचार तुकोबांनी मांडले आहे. तुकोबांनी राष्ट्रीय जागरूतीच्या दृष्टीने पाईकाचे अभंग लिहून शिपायांची आचार संहीता सांगितली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राला व्यापणारा उपदेश तुकोबांच्या अभंगवाणीत आढळतो. समाजाला सदाचारी शिकवण देणारे तुकोबा संतांच्या मालिकेतील लोकप्रिय संत आहे.

**सामाजिक समतेच्या अभंगाचा उद्घोष :**

तुकाराम महाराजांनी आपल्या सामाजिक श्ब्दाचा उपयोग अभंगातून वारंवार केलेला आहे. हा उद्घोष करीत असतांना समाजातील जातीपातीची बंधने पूर्णत: गळूनपडून एकसंघ, समाजसुखाने नांदावा ही त्यांची उदात्त, व्यापक भुमिका आहे. जशी त्यांनी अध्यात्मीक क्षेत्रात सामाजीक समता उभारलेली आहे तशीच ती व्यवहारीक लोकजीवनानंतरही प्रतिबिंबीत व्हावी. त्यांनी अध्यात्मीक समतेसह व्यवहारिक लोकजीवनातील समतेचा स्वीकार केलेला आहे. तुकाराम महाराजांनी केलेल्या सामाजीक समतेच्या उद्घोषणा पुढील प्रमाणे आहे.

१) न पाहे शिदोरी । जाती कुळ न विचारी ।

२) शुध्द हीन काही न पाहसी कुळ । करिसी निर्मळ वास देही।।

३) न म्हणे याती कुळ ।।

४) बहुता जातीचा केला अंगीकार ।।

५) भेदाभेद नाही । तुकाम्हणे तीच्या ठायी ।। (५)

**समारोप :**

एकंदर वरील विवेचनावरुन हे स्पष्ट होते की, तुकारामांनी माणसाचे अंतर्बाह्य जीवनच अभंगामधून प्रकट केलेले आहे. तुकोबांचे सामाजिक अभंग, कार्य, समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन तसेच समाजात निर्मान झालेल्या परिवर्तनाचे तत्कालीन वातावरण आणि त्याचा भविष्यकाळात उमटलेला पडसाद हे सर्व पाहता तुकोबांच्या सामाजिक अभंगाचा प्रभाव जानवतो.

**संदर्भ सूची :**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

१) आवलगावक रमेश, महानुभाव व संत वाड्.मय, यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पुणे MAR251
प्रथम प्रकाशन जून २००२, पृ.क्र.७४.

२) सानप, किशोर समग्रतुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, नागपूर २००८ पृ.क्र. ४३६.

३) तत्रैव, पृ.क्र.४३६.

४) सानप किशोर/ तायडे प्रा. मनोज, तुकाराम व्यक्तिमत्व आणि कवित्व, लोकवाड्.मय गृह प्रकाशन, सातवी
आवृत्ती मुंबई, मे २०१० पृ.क्र.४७.

५) मोहरीर का. ला, संत तुकारामांची जीवननिष्ठा, सविता प्रकाशन १९९४, पहिली आवृत्ती २५ मे १९९४, औरंगाबाद, पृ.क्र. १६८.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

# १०

# मराठी मुस्लीम कादंबरीतील भाषा

**विलास माणिकराव शिंदे**

**पीच.डी.संशोधक विद्यार्थी**

**मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,**

कोणताही लेखक हा आपल्या मनातील विचार,भावना भा ेच्या माध्यमातून व्यक्त करीत असतो. म्हणून भा ेला साहित्यात महत्वाचे स्थान असते. कोणत्याही साहित्यकृतीच्या बाबतीत भा ेवि यी निश्चित असे काही नियमही सांगता येत नाहीत किंवा तसा आग्रहही धरला जात नाही.असे असले तरी लेखक ज्या भावानुभवाचे प्रकटीकरण करतो त्याच्याशी इमान राखणारी भा ा असावी लागते. तरच त्याला वास्तवाचा आभास निर्माण करता येतो.थोडक्यात साहित्यकृतीची भा ा ही लेखकाच्या अनुभवाभिव्यक्तीची भा ा असते. ती साहित्यकृतीतील अनुभवानुसार निश्चित होत असते.

साहित्यकृतीत वेगवेगळया प्रकारचे अनुभव व्यक्त होत असतात.त्या अनुभवांनुसार लेखक भा ेचा उपयोग करत असतो.कधी कधी लेखकाला त्याचा अनुभव व्यक्त करण्यासाठी लागणारे  ब्द रुढ भा ेत सापडले नाहीतर लेखक नवीन  ब्दांची निर्मिती करतो. यासाठी लेखक आपल्या प्रतिभाशक्तीचा उपयोग करतो. थोडक्यात,लेखक भा ा हेच माध्यम वापरुन साहित्यकृतीतून आपले अनुभव चित्रित करतो.यामुळे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची छाप कळतनकळतपणे त्याच्या भा ेवर पडलेली पहावयास मिळते. लेखकाची भा ा उत्कृ ट,प्रभावी असेल तर त्याचा अनुभव वाचकांपर्यंत चांगल्या पध्दतीने पोहोचतो. म्हणून साहित्यकृतीत भा ेला महत्व असते.

अशा प्रकारची भा ा मराठी मुस्लीम कादंब—यांमध्ये आलेली आहे.ती तिचे वेगळेपण जपताना आपले मराठीशी नाते सांगते.

मराठी मुस्लीम कादंब—यातून आलेली भा ा ही मुस्लीम समाजात बोलली जाणारी दखनी बोली आहे.त्यामुळे या कादंब—यातून आलेले मुस्लीम समाजाचे चित्रण हे उठावदार झालेले आहे.म्हणजेच मराठी मुस्लीम कादंबरीने भा ेच्याबाबतीत आपले वेगळेपण जपले आहे.मराठी,हिंदी, उर्दू, अरबी,दखनी अशा सर्वच भा ांचा उपयोग या कादंब—यातून केलेला पहावयास मिळतो. मुस्लीम समाज समाजात व्यवहाराची भा ा म्हणून मराठी भा ा वापरतो आणि आपल्या घरात मराठी—हिंदी मिश्रित दखनी बोलतो. धार्मिक कार्यासाठी तो अरबी भा ा वापरतो काही मुस्लीम समाज उर्दू भा ेतून शिक्षण घेतो.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

अशा या मुस्लीम समाजाच्या भा ेवि यी प्रा.फ.म. ाहाजिंदे म्हणतात “सातव्या ातकापासून अस्तित्वात असलेल्या मुस्लिम समाजाची मातृभा ा दखनी आहे.कारण सातव्या ातकात आलेल्या सूफी संतांना स्थानिक लोकांशी संवाद साधत धर्मप्रसार करायचा होता.धर्मप्रसारासाठी कराव्या लागणा—या संवादाच्या गरजेतून दखनी भा ेचा जन्म झालेला आहे.या काळात नाथ संप्रदायी योगी,बैरागी होते. त्यांनाही पंथीयप्रसारासाठी, लोकसंवादासाठी भा ेची गरज होती. सूफी, नाथपंथीय बैरागी अन् यांच्यासारख्या इतर सिध्द पुरु ांनी दखनी भा ेला निर्माण केलेले आहे.एवढेच नव्हे तर हिंदी, उर्दू भा ा जन्मायच्या आधी या सिध्द पुरु ांनी दखनी भा ेतून साहित्यनिर्मिती केलेली आहे.या सिध्दांशी सूफींच्या अध्यात्मिक चर्चादेखील या दखनी भा ेतून व्हायच्या.म्हणून सूफींनी दखनीबरोबरच विविध प्रादेशिक भा ेतूनही साहित्य निर्माण केले आहे.म्हणून भारतातील भक्ती चळवळीला सूफींची प्रेरणा नसेलच असे म्हणता येत नाही. आजही मुसलमान दखनीतून बोलतात.घरीदारी, गल्लीत एवढेच नव्हे तर ायनगृहातही दखनीच बोलली जाते”१

असे असूनसुध्दा मराठी मुस्लीम समाजाला अरबी, उर्दू, हिंदी,मराठी आणि दखनी या सर्वच भा ांवि यी प्रेम आणि जिव्हाळा वाटतो. यावि यी प्रा.फ.म. ाहाजिंदे आपले मत व्यक्त करताना म्हणतात.“भारतीय मुस्लिम मनाला अरबी, उर्दू भा ेचे आक णि आहे. या दोन्ही भा ा बहुसंख्य मुस्लिमांना येत नाहीत.आज या दोन्ही भा ा इथे सार्वत्रिकही राहिल्या नाहीत.तरीही त्यांचे या मनाला आक णि आहे. कारण अरबी ही धर्मभा ा आहे.आणि उर्दू ही त्याची साहित्य आणि संस्कृतीची भा ा होती. तसे त्याला सांगून सांगून त्यांच्या मनावर ठसविण्यात आले आहे.आज मुसलमानांची धर्मभा ा अरबी असल्यामुळे त्यांना प्रार्थनेपुरती अरबी भा ा पाठांतर रुपाने येते. ती तशी यायला हवी. नाहीतर त्याला नमाज पढणे ाक्य होणार नाही.पाठांतर केलेली अर्थाशिवायची अरबी भा ा सर्वसामान्य मुसलमानांना येते. त्यांची मातृभा ा उर्दू नसून दखनी भा ा आजही आहे.महारा ट्रात व्यवहारासाठी मराठी भा ा सर्वसामान्य मुस्लिम समाज बोलतो. आता तर शिक्षित मुसलमान ाुध्द मराठी लिहितो आहे. बोलतो आहे.तात्पर्य, आज सर्वसामान्य मुसलमान घरात, गल्लीत दखनी बोलतो, प्रार्थनेत अरबी बोलतो, घराबाहेर मराठी बोलतो.कधी उर्दू कुणी बोलत असेल तर त्याला ती अर्धी—मुर्धी कळते तर अर्धी—मुर्धी कळतही नाही.तरी त्याचे फारसे काही अडत नाही. ही वस्तुस्थिती आहे.”२

थोडक्यात मराठी मुस्लीम कादंबरीत हिंदी मराठी मिश्रित दखनी भा ेचा उपयोग केलेला पहावयास मिळतो. या कादंब—यांचे निवेदन प्रमाण मराठी भा ेत पहावयास मिळते तर संवाद मात्र मराठी—हिंदी निश्रित दखनी भा ेत आढळतात.

हमीद दलवाई यांच्या ‘इंधन’ या कादंबरीत आलेली भा ा ही दखनी बोलीतील असूनही ती कोकणी प्रादेशिक भा ेतील छटाही दाखवते. यामुळे तेथील समाजजीवनाचे संदर्भही लक्षात येतात.या भा ेचे नमुने आपल्यास ‘इंधन’ मधील संवादातून पाहता येतात.उदा.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

SHABDSANCHAY

१.“ गावच्या कबरस्तानात पिराची नवी तुरबत उठलेली दिसली.”(पृ ठ २)

२.“ दिलाची बेमारी झयलेय.” (पृ ठ ५)

३.“ खुदावर भरोसा करत नाही नाय,ही बरा नाय.”(पृ ठ ८)

४.“ ादीघरा येत नाय” (पृ ठ २१)

५. “तिला हिदायत करणारा तू कोण ?” (पृ ठ ३७)

६. “जरा लोकाच्या दृ टीचो ख्याल करत जा.” (पृ ठ ४०)

७. “हे निदान मुसलमानी तरी मानतात. ”(पृ ठ ६१)

८.“ जुम्माच्या नमाजेला नाय आयलोस ?”(पृ ठ ६७)

९.“ ग्यारवी झाली,मिठ्ठा रवाना केलो है,घरीही बरतन घेऊन जा” (पृ ठ ८६)

१०.“ जमाना बदल्याच्यो बातू सांगू नको।” (पृ ठ ९५)

प्रा.रफीक सूरज यांच्या ‘रहबर’ या कादंबरीतही दखनी बोलीतील संवाद आलेले आहेत.उदा.

१.“ छोरी दसवी नापास अची तोबी क्या हुवा?”(पृ ठ २६) .

२.“ ये देख अम्मी,मेरा दिमाग लई चाटते बैठू नको” (पृ ठ २६).

३.“तुमना बोलनेकी बात कतो, आठ बजे की य टी मिलींगी करको पावणेआठ बजे स्टॅंडपर आये ”(पृ ठ ७१) .

४.“कत्ता भी करे तो भी लडकी कतो दुसरेंका धन ” (पृ ठ ७५).

५.“ मामू,यो भी कायको तकलीफ ”(पृ ठ ११६)

६.“ यो चहा लेव भला पटकन. नै.ठंडा हुईंगा”(पृ ठ १३०)

प्रा.डॉ. ाकील ोख यांच्या ‘जुबा’या कादंबरीत आलेले संवादही दखनी बोलीतील आहेत. उदा.

१.“खुतबू देख,तू अब चूप बैठया तो जिसने भी ये काम क–या होईंगा,उसकी हिम्मत और बडेगी ”. (पृ ठ १६)

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

२."ओ माटी मिले के पास काय कूष ..... गाव में के दुसरे लोक क्या मरी"घ(पृ ठ ४०)

३." मरेंगे भुक्के,पर वो मुने के पास नय भेजनेका छोरेकू"(पृ ठ४०)

४." खेतमें काम हाय करके बोलता था । खेतमेंच रुक्या क्या,क्या मालूम"(पृ ठ ५६)

५."मै. भी तुकाराम सावकार कू बोलके उदरच जाता ...... मट्टी कब हैष"(पृ ठ ६९)

प्रा.डॉ. ाकील ोख यांच्या 'जंग' यां कादंबरीतही दखनी बोलीतील संवाद आलेले आहेत. उदा.

१."अपनी आयपत नय ....... पडाने की ........ तुझे रिश्ते आने लगी ......"(पृ ठ १०)

२." नडया–अडया तो भाईजान आपा मदत करतैय ........ उनका सहारा छोडके क्या करुँ "(पृ ठ ४२)ष

३."क्या करनेका ये छोरे कूष अच्छा कुच्छ तो कामधंदा कर बोलेतो नको लगतायं......"

(पृ ठ ७३)

४." तुझे क्याष घरमें क्या चल्ला, क्या नय,क्या मालूम रहते क्या ष " (पृ ठ ७६)

५." मैं गया तो सायब नय था....................... ओ पोलीस बोल्या,अभीच साब बाहर

गये,आधे घंटे बाद आयेगे । फिर वहाँच बैठया ......."(पृ ठ ८१)

मुस्लीम समाजाची मूळ भा ा अरबी आहे.असे असले तरी मुस्लीम समाजाची दखनी ही बोलीभा ा उर्दूतून जन्मली आहे.तीच महारा ट्रातील मुस्लीम समाजाची प्रमुख बोलीभा ा आहे.मराठी मुस्लीम कादंबरीमध्ये हिंदी,उर्दू, दखनी भा ोतील ाब्द येतात.हे सर्वच ाब्द सर्वसामान्य मराठी भा िकाला परिचित नाहीत.असे अपरिचित असणारे ाब्द पुढीलप्रमाणे.

मोहरम ('इंधन',पृ ठ ७)– मुस्लीम समाजातील एक सण

मरतिकाची नमाज ('इंधन'पृ ठ २३)– व्यक्तीच्या मृत्यूनंतर पढावयाची नमाज.

गोश ('इंधन',,पृ ठ २८)– मांस

ताज्जुब ('इंधन',पृ ठ ३७)–आश्चर्य

जुम्माची नमाज ('इंधन',पृ ठ ६७)– ाुक्रवारची नमाज

सलाम ('इंधन',पृ ठ ६७)– नमस्कार

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

जमात ('इंधन',पृ ठ ९०)– समुदाय,जात

मुजावर ('मीतू',पृ ठ ३०)– एक जात,दर्ग्याचा पुजारी

मन्नत ('मीतू'पृ ठ ३०)– नवस करणे

जोहरची नमाज ('मीतू' पृ ठ ३२)– दुपारची नमाज

फजरची नमाज ('रहबर' पृ ठ ५)– सुर्योदयापूर्वीची नमाज

अम्मी ('रहबर' पृ ठ ६)– आई

खाला ('रहबर' पृ ठ १२)– वडील

खलेरे भाई ('रहबर' पृ ठ १५)– मावसभाऊ

खालू ('रहबर' पृ ठ १९)– काका

ईशाची नमाज ('रहबर' पृ ठ ३०)– रात्रीची नमाज

मगरीबची नमाज ('रहबर' पृ ठ ३५)– सूर्यास्तानंतरची नमाज

नमाजी ('रहबर' पृ ठ ४४)– पाचवेळा नियमित नमाज पढणारा

मेहेर ('रहबर' पृ ठ ४५)– विवाह करारप्रमाणे वधूस दयावयाची रोख रक्कम

कलमा ('रहबर' पृ ठ ५१)– इस्लामची पहिली पायरी

फर्ज ('रहबर' पृ ठ ५१)– कर्तव्य

वुजू करणे ('रहबर' पृ ठ ५१)– नमाजापूर्वी हात,पाय,तोंड धुवून पवित्र होणे.

बयाण ('रहबर' पृ ठ ५२)– प्रवचन

आपा ('रहबर' पृ ठ ६६)– मोठया बहिणीसाठी वापरला जाणार आदरार्थी ाब्द

मजार ('रहबर' पृ ठ ८४)– मुस्लीम समाजाचे तीर्थस्थान

इस्तेमा ('रहबर' पृ ठ ११४)– धर्मप्रचारासाठी एकत्र येणे

मुसाफा करणे ('रहबर' पृ ठ ११८) – हस्तांदोलन करणे

रोजा ('रहबर' पृ ठ १२७) – रमजान महिन्यातील निरंकार उपवास

ईदगाह ('रहबर' पृ ठ १२८) – नमाज अदा करावयाची जागा

ईदी देणे ('रहबर' पृ ठ १२९) – ईदची भेट देणे.

जनाजेची नमाज ('रहबर' पृ ठ १४४) – अंत्यविधीवेळी पढावयाची नमाज

मर्कज ('रहबर' पृ ठ १४९) – एकत्र येण्याचे ठिकाण

रहबर ('रहबर' पृ ठ १५१) – मार्गदर्शक

जुबा ('जुबा' पृ ठ ५) – संहार,कत्तल

बेवा ('जुबा' पृ ठ ५३) – विधवा

हदीस ('जंग' पृ ठ २०) – कुराणला समांतर लेखन

रमजान ईद ('रहबर' पृ ठ २०) – मुस्लीम धर्मातील सर्वात मोठा सण

बकरी ईद ('जंग' पृ ठ २०) –मुस्लीम धर्मातील उत्सव,एक मोठा सण

कुर्बानी ('जंग' पृ ठ २०) बलिदान,भेट देणे

इशाची नमाज ('जंग' पृ ठ ४६) – रात्रीची नमाज

निकाह ('जंग' पृ ठ ५५)– लग्न

ोहर ('जंग' पृ ठ ८९)– नवरा,पती

तलाक ('जंग' पृ ठ १६२) – घटस्फोट

मराठी मुस्लीम कादंबरीमुळे एक अनमोल ाब्दभांडार मराठी साहित्याला मिळालेले आहे. हे सर्व ाब्द मराठी भा ेतील नसून ते उर्दू,हिंदी,दखनी,अरबी भा ेतील आहेत.या सर्व ाब्दांमुळेच मराठी कादंबरी क्षेत्रात एक मोठे दालन खुले झालेले आहे,त्यामुळे मराठी मुस्लीम कादंबरीचे वेगळेपण आपल्याला पहावयास मिळते.

**संदर्भ टीपा :–**

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

१. ाहाजिंदे फ.म – 'मुस्लिम साहित्यिकांचे मराठी साहित्याला योगदान' संपा.डॉ.ताहेर एच.पठाण,संकल्प प्रकाशन' लातूर, प्रथमावृत्ती २०१३ पृ ठ –४२

२. ाहाजिंदे फ.म. – 'विचारशलाका' संपा.–नागोराव कुंभार मुस्लिम साहित्य व समाज विशे ाांक जाने मार्च १९९७ पृ ठ –१६

३.दलवाई हमीद – 'इंधन' मौज प्रकाशन गृह,मुंबई प्रथमावृत्ती १९६५, आठवी आवृत्ती २०१६

४. ाहाजिंदे फ.म. – 'मी तू' भूमी प्रकाशन,लातूर द्वितीयावृत्ती २००३.

५.सूरज रफीक– 'रहबर' ाब्दालय प्रकाशन,श्रीरामपूर प्रथमावृत्ती २००६

६. ोख ाकील– 'जुबा' अक्षरलेणं प्रकाशन' सोलापूरप्रथमावृत्ती २००० द्वितीयावृत्ती २०१४

७. ोख ाकील 'जंग' अक्षरलेणं प्रकाशन, सोलापूर प्रथमावृत्ती २०१४

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

11.

# गुलमोहर.....लाली मेरे लाल की!

प्रा.डॉ.दत्तात्रय प्र.डुंबरे
प्रमुख,
मराठी विभाग व भाषा संशोधन केंद्र.
विवेकानंद महाविद्यालय,छ.संभाजीनगर

शिशिराची पानगळती सरते आणि भूतलावर नवचैतन्य घेऊन येतो तो ऋतूराज वसंत.श्रीकृष्णाने गीतेत आपल्या विभूती सांगितल्या आहेत,त्यात तो म्हणतो," किरणांमध्ये मी सूर्य आहे.नक्षत्रांमध्ये चंद्र मी आहे.ऋतूंमध्ये मी वसंत ऋतू आहे."वसंतऋतूंत झाडांना फुलांचा बहर येतो.वास्तविक वसंतात सूर्य इतका तापतो की,अंगाची लाही लाही होते.पण या तप्ततेची थोडीही फिकीर न करता,झाडं याच ऋतूत बहरतात.विशेषतः चाफा,पळस,गुलमोहर किंवा जंगलातील विशिष्ट अशा काही वनस्पती असतात की,ज्या जितका सूर्य आग ओकेल तितक्या जास्त बहरतात.निसर्ग आणि मानवी मन यात यात अंतर नाही.म्हणून तर तुकोबा त्या वृक्षवल्लींना आपले 'सोयरे' मानतात.जितका अधिक तीव्र संघर्ष तितकं काही माणसांचं अधिक  बहरणं असतं.हे बहरणं इतकं बेमालूम असतं की,स्वतः उन्हाच्या झळा सोसून दुसऱ्यांना आनंदाचा गारवा देतात.म्हणून तर खान्देशातील कवयित्री  'भीमा' नदीचं वर्णन करताना म्हणते,

"माझी भीमाई माऊली।जशी आंब्याची साऊली।

आम्हाईले केले गार।सोता उन्हात तावली॥"

कुटुंबाच्या सुखासाठी काही माणसं या आम्रवृक्षासारखी त्यागी बनतात.झाड बहरतं,पावसाळ्यात हिरवंगार होतं.पण त्यासाठी मुळांनी स्वतः मातीत गाडून घेतलंलं असतं.त्यांना एवढंच माहित असतं की,आपण अहोरात्र खपलं तरंच हा वृक्ष टिकेल.तसं कुटुंबाच्या हितासाठी स्वतःला मातीत गाडून घेणारी अनेक पालकरुपी मुळं असतात,आपल्याला भरभराट ,ऐश्वर्य दिसते,पण त्यासाठी स्वतः संसाराच्या मातीत गाडून घेतलेली माणसं दिसत नाही.त्यांना माहित असतं की,"आधी हाताला चटके,तेव्हा मिळते भाकर!" अशी संसारात तप्ततेत तापून दुसऱ्यांना आनंदी ठेवणारी माणसं आपल्याला दिसत नाहीत.एक हिंदी कवी म्हणतो,

"गुलमोहर तुम सिखाओगे क्या?

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

तपिश सहकर भी कैसे,

कोई इतना रंगीन हो सकता है?

चंद परेशानियोंसे बेरंग

हो जाती है दुनिया,

शायद तपिश क्या होती है

पता नही....

गुलमोहर तुम सिखाओगे क्या??"

रक्षारचित यांची ही कविता गुलमोहराला प्रश्न विचारणारी आहे.इतके चटके सहन करुन हे गुलमोहरा तू कसा एवढा बहरतो?

गुलमोहर हे प्रतिक आहे.अचेतनावर सचेतनाचा आरोप केला जातो,तेव्हा चेतनागुणोक्ती अलंकार होतो.मुक्ताई ज्ञानदेवांना हेच सांगते,"योगी पावन मनाचा साही अपराध जनाचा।" अनेक अवहेलना,अपमान गिळून आपण उभं राहिलं पाहिजे.म्हणून सोन्याला जितकी उष्णता दिली जाते,तितकी त्याची चमक वाढते.संतांचं असंच असतं,जेवढी अवहेलना ,विरोध,त्रास वाट्याला आला तेवढं त्यांचं व्यक्तित्व खुललं.अगदी गुलमोहरासारखं.

खान्देशातील संगीता वाणी नावाची कवयित्री आहे,त्यांची गुलमोहर कविता याच वाटेने जाणारी आहे.चिमणपाखरांचा मोठ्या कष्टातून उभा राहिलेला संसार,त्यात एकदिवस त्या कवितेतील नायिका त्या नायकाला प्रश्न करते,

"सहजच विचारले त्याला,

किती आवडते रे मी तुला?"

याप्रश्नावर कवयित्रीने रुपकाच्या माध्यमातून जे शब्दचित्र उभे केले आहे,ते खूप बोलके आहे.

"आणि त्याने गुलमोहराची काही फुलं

माझ्यावर उधळीत म्हटलं...

खूप आवडतेस....

आणि मग त्याच्या ओंजळीतला गुलमोहर...

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

माझ्या स्वप्नात बहरु लागला..."

वाणींच्या कवितेचे वैशिष्ट्यच हेच आहे की,या बाई जी मांडणी करतात,ती वाचकाला सहज उमजतच नाही.नवीन वाचक शब्दार्थाने ही प्रेम कविता समजून रसग्रहण करण्याचा बापडा प्रयत्न करील.पण ही केवळ प्रेमकविता नाही.जसं औषध कंपन्या गोळ्यांवर रंगीबेरंगी आवरण वापरतात व आत औषधाची मात्रा असते,तसं ही कवयित्री वरवर प्रेमकवितेचं आवरण लावते मात्र आत उच्च तत्वज्ञान भरते.म्हणजे मोठ्या चित्रकाराची चित्रं सामान्यांना रंगरेषा वाटतात पण त्यात काय भरलंय ते जाणकार चित्रकारालाच कळतं.तसं या कवयित्रीचं आहे.वरवर प्रेम कवितेव्दारे नायक फुलं उधळतो ही प्रेमभावना ठीक आहे,पण खरी मेख 'गुलमोहर' या रुपकात आहे.गुलमोहराची फुलाचं प्रतिक वापरते तेव्हा त्या नायकाच्या अपार कष्टानंतरही तो 'विसाव्याचे,प्रेमाचे क्षण' येतात तेव्हा रागाने व्यक्त होत नाही.ते प्रेम असतं गुलमोहरासारखं!रंगीत.लाल रंग हे जसं सौभाग्याचं,प्रेमाचं प्रतिक आहे तसं त्यागाचंही प्रतिक आहे.पिवळ्या रंगाचा सोनचाफा,किंवा गुलाब,कमळ ही प्रतिकं वापरली नाहीत.इथं संसाराच्या उन्हाचे कितीही चटके बसले तरी ,पानगळ झाली तरी तुला मात्र फुलांचा संभार अर्पण करीन.जो असेन प्रेमाचा,त्यागाचा आणि सौभाग्याचा !

त्यानंतर कवयित्रीने नायिकेच्या मुखात खूप उच्च दर्जाचं तत्वज्ञान प्रसवणारे शब्द घातलेत.त्यातून जीवनात किती तरी घटना आल्या,किती तरी सुखदुःखाचे क्षण आले पण त्याने त्यावेळी जो रंग लावला तो रंग ती विसरु शकत नाही.कबीरांची एक रचना आहे,ते म्हणतात की," या शरीरातला मी जो कोणी आहे?त्याची निर्मीती करणारा म्हणजे ही देहरुपी चादर निर्माण करणारा जो आहे त्याने अशी ही बनवली की,

"पाच तत्वांपासून बनवलीय.अष्ट भाव त्यात भरलेत.इतकी सुंदर बनवली की जेव्हा रंगाऱ्याकडे ती रंगवायला दिली,तेव्हा त्याने लाल रंग असा काही भरला की,अप्रतिमच!...झिनी रे झिनी!" पुढे कबीर जे म्हणतात ते महत्वाचं आहे,

"ऐसा रंग रंगा रंगरे ने

के लालो लाल कर दिनी

चदरीया झिनी रे झिनी!"

त्या नंदलालाने असा रंग भरला की मी त्याच्या रंगात रंगून गेले,ती इतकी रंगून गेले की,"मै भी हो गई लाल!" या अवस्थेला सायुज्यता मुक्ती म्हणतात.देव पहायला गेलेले तुकोबा स्वतःच देव होऊन जातात.आनंदाच्या डोहात,डोहही आनंदाचा,तरंगही आनंदाचे,अंगही आनंदाचेच !तसं या कवितेतील नायिकेचं झालंय.ती म्हणते जीवनात अगणित रंग आले अन् गेले.मात्र त्याने जो 'गुलमोहरी रंग'

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

माझ्यावर उधळला त्या रंगात एवढी रंगून गेले की अन्य रंग माझ्यावर जादू करुच शकले नाहीत.ते जे चार क्षण प्रेमाचे दिले,त्याने जीवन इतकं आतबाहेर रंगून गेलं की,सोयराबाई म्हणतात तसं,

"अवघा रंग एक झाला।रंगी रंगला श्रीरंग।।"

कवयित्री किती उच्च दर्जाचं तत्वज्ञान मांडते ते आत्ता लक्षात येईल.जेव्हा जीव ब्रम्ह ऐक्य होतं,तेव्हा त्या कृष्णाच्या रंगात रंगून गेलं की अगणित सुखदुःखाचे क्षण जरी आयुष्यात आले तरी काही फरक पडत नाही.तो भक्त आपल्या रंगात एवढा रंगून गेलेला असतो की,त्यावर इतर व्यवधानं प्रभाव पाडू शकत नाही.

कवयित्री संगीता वाणींच्या 'गुलमोहर' कवितेतील पुढील काव्यपंक्ती हाच भाव व्यक्त करतात,

"तुझ्या माझ्यातला तो गुलमोहरी रंग,

आजही तसाच आहे,

माझ्या जीवनात विखुरलेला,

हृदयात फुललेला....

स्वप्नात रंगलेला...

हो आजही अगदी तसाच आहे,

तुझ्या आठवणींसारखा !"

या कवितेला मूळ गंध आहे तो कृष्णप्रेमाचा! वृंदावनात गोपींनी जी रासक्रिडा केली,त्यात एक गोपी एक कृष्ण बनून रासक्रिडेचा मनमुराद आनंद त्यांनी लुटला.मात्र त्यातील एका गोपीला अहंकार निर्माण झाला,जगाचा मालक माझे पाय आपल्या तळहातावर घेतोय! तेवढ्या वेळेत तो क्षणात अंतरला.तुकोबांची एक गौळण म्हणते'तुका म्हणे पाहिले मागे।एवढ्या वेगे अंतरला।" गौळणीचं रुपक असलं तरी साधकाचं असंच होतं.ब्रम्हानुभूती झाल्यानंतर जो समाधीसुखाचा सोहळा तो भोगतो,त्यात अहंकार आला की सर्व साधना वाया जाते.अशी गौळण मग विरहाने व्याकुळ होते व सर्वत्र त्याचा शोध घेत फिरते.तिला अन्य कितीही सुखदायक गोष्टी दिल्या तरी निरसं सुख,निर्भेळ आनंद तिने भोगलेला आहे.त्यामुळे तिला अन्य कोणतेच सुख आनंददायक वाटंत नाही.कारण साक्षात आनंदाचा कंद तिने अनुभवलेला असतो.कवयित्री वाणींची नायिका या पंचलतिका नावाच्या गौळणीशी नाते सांगणारी विरहीणी आहे.तिला हवाय तो आनंदाचा कंद,ती गुलमोहरी फुलं,म्हणजे लाल रंगाची...."लाली मेरे लाल की जित देखूँ उत लाल! लाली देखन मै गई मै भी हो गई लाल।।" अशा रंगात रंगून गेलेली नायिका ,जीवनाच्या अनेक रंगात रंगूनही "रंग माझा वेगळा!" असं जेव्हा म्हणते,तेव्हा ती असते कृष्णप्रेमाने

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

वेडी झालेली मीरा,ती असते राधा,शेणींतही त्याचाच आवाज ऐकणारी जनी,तर ती असते वासनांच्या फिक्या रंगांना धुडकवणारी कान्होपात्रा!

वरवर पाहता,प्रेम कविता,किंवा विरह कविता वाटणारी संगीता वाणींची कविता इतकी मूलद्रव्ये शब्दांत ओतते की,अनेक प्रमेयं,परिकल्पना शून्य होऊन जातात.उरतो तो निर्भेळ आत्मानंद ,साऱ्या रंगात रंगून वेगळा असणारा 'श्रीरंग'!

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

12.

# वारी

बंडोपंत दि. कुलकर्णी, सोलापूर
जिल्हा न्यायाधीश, पुणे

वारी म्हटले की नजरेसमोर येते ते म्हणजे आषाढ व कार्तिक वारी. मुख्यतः वारी देहू आणि आळंदी या दोन ठिकाणांहून सुरू होते आणि पंढरपूर येथे संपते. आज अनेक गावोगावी वारी सुरू झाली आहे. आपापल्या गावातून पालखीसह (कांहीं गावे) वारी सुरू करतात. जर त्यांच्या गाव व पंढरपूर या वारी रस्त्यावर असल्यास मुख्य वारीत येऊन सहभागी होतात आणि जर मुख्य दिंडी रस्ता त्यांना भेटत नसल्यास स्वतंत्रपणे थेट पंढरपूर गाठतात. तथापि, वारी सुरू झाल्यावर वारीत चालणारे भक्तांची गर्दी, विविध ठिकाणावरून येणाऱ्या पालख्या, विठ्ठल भजन सातत्य व कानी पडणारे सुश्राव्य मनाला व देहातील चैतन्य अस्तित्व जाणवून देणारा 'बोला पुंडलिका वरदा हरि विठ्ठल.....श्री ज्ञानदेव.....तुकाराम पंढरीनाथ महाराज की...जय ' हा नाम जय घोष हे वारी पर्व उत्सव आल्याचे जाणीव देताना नकळत विठ्ठल ध्यान चिंतन व मनन यात चित्त स्थिरावून जाते हे लक्षात येत नाही. यातच वारीचे गमक आहे. म्हणून संतानी विचारपूर्वक वारी संकल्पना पूर्णत्वास आणली. म्हणून बहिणी म्हणते

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।6

ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।।

नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ।।

जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।

तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।

सुकृत दर्शनी वरील अभंगात जगद्गुरु तुकोबाराय शिष्या बहिणाबाई ह्या विठ्ठल मंदिराचे वर्णन करीत असल्याचा भास होतो. संत नामदेव महाराज यांनी म्हटल्या प्रमाणे आधी रचिली पंढरी lमग वैकुंठ नगरी ll जेव्हा नव्हते चराचर l तेव्हा होते पंढरपूर ll तर मग हे मंदिर देखील तेंव्हा पासून आहे. नुसत्या दगड, मातीने बांधकाम करून त्यावर कळस उभारून व त्या बांधकामाच्या गर्भगृहात देवाची

मूर्ती स्थापित करणे म्हणजे मंदिर नव्हे. संत बहिणाबाई यांचे अभंग समजावून घेता ती या देहाला देवालय म्हणते.

देवाच्या कृपेने जीवन सुलभ होते तर संताच्या कृपेने जीवन कळते व सार्थ होते. संतांची कृपा म्हणजे त्यांच्यातील गुरुत्व, जे भक्तांना आकर्षित करते व स्वतःकडे ओढून घेते. उदाहरण म्हणून घ्यावयाचे झाल्यास जसे गावातील धनाढ्य वस्तीकडे एखाद्या गरीब व्यक्तीने अडचणीच्या वेळी याचना केल्यास धनाढ्य व्यक्ती त्या गरीब व्यक्तीची मदत दोन प्रकारे करू शकतो. पहिला प्रकार म्हणजे आपल्या कडील धन देऊन आणि दुसरा प्रकार म्हणजे अडचण निर्माण करणारी वस्तू देऊन. तथापि, धनाढ्य व्यक्ती कायमच त्यास त्या प्रकारे मदत देत राहणार नाही. जर गरीब व्यक्ती संताकडे याचना केल्यास संत त्यास जीवन उपदेश करतात, अडचण निर्माण का झाली हे समजून सांगतात, जीवन म्हणजे चंगळवाद नसून सार्थ मंगळ कारक असून त्याचा पाया असण्यात नव्हेतर नसण्यात आहे हे अमृतगुटी पाहून त्याचे जीवन सुखी करतात. तिथे त्याची अडचण संपताना जीवन सुखावह होते. त्याने देह इमारत फळाला येते व त्याचे निर्माण व्हा उत्थान देवालयात होते. हा उपदेश अमृत पाजण्याचे कार्य ज्ञानदेव यांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, हरपाठ, योग वशिष्ठ व अभंग मार्गे सुरू केले, नामदेवांनी आपल्या अभंगातून त्या मार्गाचा विस्तार केला, संत एकनाथ महाराज यांनी एकनाथी भागवत देऊन पुढे नेले आणि संत तुकोबाराय यांनी ज्यांना ज्या भाषेत समजते त्या निर्वाणीच्या भाषेत सांगताना शिल्लक कांही न ठेवता त्याच भाषेत अभंग रचनाही केल्या म्हणून म्हणून ते या उपदेशाचे कळस आहेत. याच कारणाने देह इमारत फळाला येऊन देवालय होते. आता प्रश्न येतो या अभंगाचा वारीशी काय संबंध आहे.

वारी ही पंढरपूर अगर आळंदी अगर देहू वा अन्य तीर्थक्षेत्री चालत जाणे इतक्या गोष्टीशी मर्यादित नाही. वारी सुरू करण्याचे कारण म्हणजे हा देह इमारत फळाला आणणे होय. म्हणून वारी सर्वार्थाने समजून घेणे आवश्यक आहे. वारी या शब्दाला समानार्थी शब्द आहेत समूह, निवह, व्यूह, संदोह, विसर, व्रज, स्तोम, ओघ, निकर, व्रात, संघात, संचय, समुदाय, समुदय, समवाय, चय, गण, संहति, वृन्द, निकुरंब, कदम्बक, पेटक, वार्धक, ग्राम, सन्नय, संस्ताय, जाल, पटल, राशि वगैरे. यात कांहीं क्रियापद तर काही विशेषण आहेत. याशिवाय वारी याचा अर्थ हत्ती असा होतो. वारी म्हणजे शुद्ध जल देणारा निखळ झरा होय.

वारीचे अनेक अर्थ पाहता लक्षात येते की वारी ही मनाशी निगडित असून मनाला पवित्र करण्याची प्रक्रिया आहे. वारीचे गुपित हे पूर्वीच्या परिव्राजक या संकल्पेने दडले आहे. परिव्राजक " हा शब्द संस्कृत भाषेतील आहे, ज्याचा अर्थ आहे "परितः व्रजन्ति इति परिव्राजकः" म्हणजे "भटकणारे". परिव्राजक यांचे भटकणे नुसते वा उगाच नसते तर एका विशिष्ट ठिकाणी स्थिरावून न राहता फिरत राहतात आणि ध्यान, तपस्या यांसारख्या आध्यात्मिक साधनांवर लक्ष केंद्रित करतात. परिव्राजक हे एकटे एकटे अथवा फक्त आपले एक दोन शिष्य घेऊन भ्रमण करतात. शिवाय त्यांचे फिरणे ज्ञान ग्रहण

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

करून जीवन उन्नत करणे व आपले अनुभव लोक कल्याणार्थ लिहून ठेवणे, या मर्यादेत असते. तथापि, तथाकथित धर्म मार्तंड यांची समाजाप्रती वागणूक व समाजातील रंजले गांजले यांचे जीवनमान याचा अनुभव माउलीच्या गाठीशी होते.

चातुर्वर्य मया सृष्टं गुणकर्मविभागशः।

तस्य कर्तारमपि मां विद्धयकर्तारमव्ययम् ॥

भ.गी.अ ४ श्लो १३॥

अर्थ - मनुष्याच्या गुण आणि कृतीनुसार मी चार वर्ण निर्माण केले आहेत. जरी मी या व्यवस्थेचा निर्माता आहे, तरी तुम्ही मला कर्ता आणि अविनाशी समजा.

वर्ण हे गुण कर्म अनुकूल बदलणारी अवस्था असताना त्यास जन्मानुकुल रंग देण्यात आले. सत्य युगात रावण हा ब्राह्मण वर्णा जन्म घेतला असताना व महान शिवभक्त असूनही त्याच्या गुण कर्म कर्मामुळें राक्षस या क्षुद्र वर्णात त्याची गणना झाली, हे सामान्य जनांच्या लक्षात आले नाही. याशिवाय द्वापारयुगात कर्ण हा जन्मजात क्षत्रिय होता, पण त्याचे वर्ण कोणालाही माहित नव्हते. राधेय या रथ सारथी क्षुद्र सेवकाचा मुलगा समजून द्वंद युद्धास अपात्र ठरविले. क्षत्रियास क्षत्रिया बरोबर युद्ध करणे भाग होते. द्वंद युद्धात कर्ण यास भाग घेता यावे म्हणून दुर्योधन याने कर्ण यास अंग देशाचा राजा घोषित केले. येथे थोडा संभ्रम होण्याची शक्यता आहे. जर कर्ण याच्याकडे क्षत्रिय गुण होते तर मग त्यास क्षत्रिय का म्हटले नाही. हा संभ्रम दूर करणे आवश्यक आहे. कर्ण याच्याकडे असलेले क्षत्रिय गुण फक्त दुर्योधन यास माहिती होते. प्रथम अभ्यास आणि त्यानंतर आचरण व समाज मनातील भाव यावर लौकिक भाव यावरून वर्ण ठरते. पण कर्ण याचे गुण पहाण्याचा प्रसंग समाजाला आला नव्हता. म्हणून अंग देशाचा राजा घोषित करून त्याचे गुण आजमावून पाहण्याची संधी समाजाला दुर्योधन याने दिली. गुण कर्म यावरून वर्ण व्यवस्था असल्याचे या कलियुगात लालची धर्म मार्तंड यांनी सामान्य जनांच्या लक्षात येऊ दिले नाही. त्यामुळे जन्मानुसार श्रेष्ठत्व बिंबविण्याचा प्रयास होत गेला. माउली ही जन्माने ब्राह्मण असूनही वडिलांच्या कृतीला चुकीचे ठरवून त्याना त्रास देण्यात आला. त्यांच्या वडील गुरू आज्ञेचे पालन केले होते व त्यांचे कृत्य शास्त्रविहित होते. माउली ही भगवत गीतेची विवर्तक आहे. ज्ञानेश्वरी वा भावार्थ गूढार्थदिपिका हे गीतेचे विवर्तन आहे.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

उंचनिंच नेणे कांहीं भगवंत । तिष्ठे भाव भक्ती देखोनियां ॥

दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्या घरीं रक्षी प्रल्हादासी ॥

माउली हे जाणून होती. तात्कालीन उच्चभ्रू समाज वर्णाचा आधार घेऊन गीतेच्या उपदेश संदेशाविरुद्ध वागत असल्याचे माउलीच्या लक्षात आले. म्हणून त्यांनी गीतेचा उपदेश समाजाला समजावून सांगितले. दुर्लभ मनुष्य जन्म प्राप्त झाले, याचा अर्थ मनुष्य हा सर्व आध्यात्मिक जीवन सार्थ करण्यास पात्र आहे. अभ्यास व ज्ञान मार्गाने जीवन व जीवन सर्थकतेचे गमक तथाकथित वर्ण, करणपरत्वे जाती व्यवस्थेत नसल्याचे अशिक्षीत, अज्ञानी व दुस्तर लोकांना कळत नव्हते. भारतीय उपखंडात विविध तीर्थयात्रा, धार्मिक स्थळे आणि क्षेत्रे यांचे महत्त्व अत्यंत जास्त आहे. वारी शब्दाचा मूळ अर्थ नित्य नियमित यात्रा असाही आहे. तीर्थयात्रेचे स्वरूप माउली जाणून होते. त्यानी त्यावर उपाय शोधले. समाजातील सर्व स्तरावरील लोकांना अध्यात्मिक जीवन व ज्ञान साधनेचे धडे त्यांना कळेल त्या भाषेत सांगणे हे एकमेव मार्ग आहे, ही माउली ओळखून होती. प्रत्येक गावात जाऊन ही कार्य करणे शक्य नव्हते. समाजातील सर्व स्तरातील लोकांना एकत्रित आणणे, त्यांना सांसारिक विचारापासून वेगळे करून अध्यात्मिक शिकवण त्यांच्यात रुजविता विचार फलित होतील आणि त्यानंतर पवित्र मनातून आलेले विचाराने संसाराचा असर मोठ्या प्रमाणावर होणार नाही, याविचारातून वारीची संकल्पना समोर आली. तत्कालीन संत निवृत्तीनाथ, सोपानकाका, मुक्ताई, संत नामदेव, गोरोबाकाका, चोखामेळा, जनाई, वगैर यांनी माउलीच्या वारी विचाराला दुजोरा दिला. मग वारी प्रत्यक्षात आली.

तत्कालीन वारी ही फक्त प्रवचन, कीर्तन व व्याख्यान याचे मर्यादित नव्हते. तेंव्हा नेटाची दळण वळण व्यवस्था नव्हती. प्रत्यक्ष व्यक्ती वा खबरी जाऊन खबर दिल्याशिवाय हालहवाल कळत नव्हते. त्यामुळे वारीत जमलेल्या लोक आपसात आपल्या भागातील भौगोलिक व निसर्ग आणि परंपरा यावर चर्चा होत. या परिस्थितीवर लौकिक जीवन मार्ग आणि अध्यात्मिक विचारातून मात करण्याचे व मानसिक संतुलन समाजातील अव्यवहार्य यापासून दूर रहाण्याची दृष्टी संत मंडळी भजन, किर्तन व प्रवचन मार्गातून देत असत. हे वारीचे वैशिष्ट्य होय. कालानुरूप वारीचे उद्दिष्ट तेच असले तरी स्वरूप थोडे बदलले आहे. वारीचे स्वरूप पूर्वी धार्मिक, वैचारिक आणि सामाजिक याशी निगडीत होते. आता वारीला पुर्णतः धार्मिक ठरविण्यात आले आहे. वारी म्हणजेच भक्ताची एक पवित्र यात्रा व तर ती एक आध्यात्मिक, मानसिक आणि शारीरिक पवित्रता साधण्यासाठी केलेली यात्रा असे स्वरूप आले आहे. पूर्वी वारीने भक्ताच्या विचारात नव प्रकाश, नव चैतन्य आणि पूर्ण आनंदमय सत्य विठ्ठल अवस्थेत घेऊन जात असत आज वारी केल्यामुळे भक्ताच्या व्यवहारात एक नवा प्रकाश, एक नवा चैतन्य आणि एक नवा आनंद येतो.

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161
SHABDSANCHAY

एकूण वारीचा विचार करता साधारणपणे वारी करतांना भक्त काही गोष्टींचे पालन करतात, त्यात मुख्य म्हणजे संत वचनावर श्रद्धा ठेवणे, तृप्ततेसाठी त्यांच्याशी संवाद साधणे, आणि वारीतून पायी पंढरपूर स्थानी जाण्याची संतांच्या प्रेरणेने प्रेरित होणे. वारीचा सर्वात सुंदर आणि विशेष भाग म्हणजे वारीच्या काळात भक्ताचे हृदय संपूर्णपणे देवतेच्या पाशी अर्पण करणे. त्याच्यात शांती, साधना, आणि समर्पण यांचा संगम होतो. हे सर्व पैलू लक्षात घेतल्यास, वारी केल्याने मनाची शांती आणि जीवनाचे एक नवीन दृष्टिकोन प्राप्त होतो. प्रत्येक वारीला एक उद्देश असतो - "आपण ज्या देवतेच्या पाशी जातो, त्या देवतेच्या कृपेमुळे आपले जीवन अधिक आनंदी होईल." हे उद्दीष्ट भक्ताच्या मनात सदैव असते. काळानुरूप संत एकनाथ व संत तुकाराम यांच्या भक्ति रचनांनी पंढरपूर वारीचे महत्त्व अजूनच वाढवले आहे. पंढरपूरच्या वारीतील प्रत्येक पाऊल भक्तांच्या श्रद्धेची आणि समर्पणाची ग्वाही देतो.

पंढरीचे वारकरी । ते अधिकारी मोक्षाचे ॥

पुंडलिका दिला वर । करुणाकरें विठ्ठलें ॥

संत मंडळी वारीचे वर्णन खालील प्रमाणे करतात

संत नामदेव महाराज

आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमध्ये स्नान जे करिती ।

दर्शनहेळामात्रे तया होय मुक्ति । केशवासी नामदेव भावें ओवाळिती ।।

नित्य हरिकथा नामसंकीर्तन । संतांचे दरूषन सर्वकाळ ।।

पंढरीची वारी आषाढी कार्तिकी । विठ्ठल एकाएकी सुखरूप ।।

आ. संत नामदेव यांनी लिहिलेल्या आरतीतील वारीचा उल्लेख

आषाढी कार्तिकी हेचि आम्हां सुगी । शोभा पांडुरंगीं घनवटे ।।

टाळ नृत्य घोष पताकांचे भार । गर्जे भीमातीर सर्वकाळ ।।

कार्तिकी एकादशी । पोहा मिळाला पंढरीसी ।।

पंढरीची वारी जयाचिये कुळी । त्याची पायधुळी लागो मज ।।

नामा म्हणे धन्य झाले ते संसारी । न सांडिती वारी पंढरीची ।।

पंढरीची वारी करील जो कोणी । त्याच्या मागे पुढे चक्रपाणी ।।

पंढरीसी जावे जीवन्मुक्त व्हावे । विठ्ठला भेटावे जीवलगा ।।

संत नरहरी सोनार म्हणतात,

पंढरी नगरी दैवत श्रीहरि । जाती वारकरी व्रतनेमें ।।

आषाढी कार्तिकी महापर्वे थोर । भजनाचा गजर करिती तेथें ।।

संत जनाबाई म्हणतात,

आले वैष्णवांचे भार । झाले हरिनाम जागर ।।

ऐसा आनंद सोहळा । दासी जनी पाहे डोळा ।।

संत सेनामहाराज म्हणतात,

ऐसा नामघोष ऐसे पताकांचे भार । ऐसे वैष्णव डिंगर दावा कोठे ।।

वाट धरता पंढरीची । चिंता हरे संसाराची ।।

संत चोखामेळा

टाळी वाजवावी गुढी उभारावी । वाट हे चालावी पंढरीची ।।

कोणी पंढरीसी जाती वारकरी । तयांचे पायावरी भाळ माझा ।।

संत एकनाथ महाराज

पंढरीची वारी आहे ज्याचे घरी । तोचि अधिकारी धन्य जगीं ।।

धर्म अर्थ काम हे त्याचे अंकित । एका जनार्दनी मात धन्य त्याची ।।

'वारकरी पंढरीचा । धन्य धन्य जन्म त्याचा ।।'

जगद्गुरु तुकाराम महाराज

होय होय वारकरी । पाहे पाहे रे पंढरी ।।

पंढरीचे वारकरी । हे अधिकारी मोक्षाचे ।।

पुंडलिका दिला वर । करूणाकर विठ्ठले ।।

वारकरी संप्रदायात महत्वाच्या चार वारी योजलेल्या आहेत. चैत्र वारी, आषाढ वारी, कार्तिक वारी व माघ वारी असे चार वारी होतात. वारी केल्यामुळे फक्त भक्तीचा अनुभव घेतला जात नाही, तर शारीरिक आणि मानसिक स्तरावर देखील त्याचे फायदे होतात. शारीरिक दृष्टिकोनातून वारीच्या प्रवासामुळे शरीर तावून सलाखून निघते. एक प्रकारे वारी ही तपश्चर्या आहे म्हटले तरी आवगे होणार नाही. लांब अंतर पायदळी चालणे, उत्साही भावना आणि आदर्शप्रेरणाद्वारे शारीरिक क्षमता वाढते. मानसिक दृष्टिकोनातून, वारी करतांना शांतता आणि मानसिक शांती मिळते. पूजा, ध्यान, आणि व्रत ठेवल्याने चित्त शुद्ध होते. ध्यान आणि साधनाच्या प्रक्रियेमुळे मानसिक ताण कमी होतो, आणि एक नवा उत्साह, उमंग आणि आनंद अनुभवता येतो. वारीचे सामाजिक दृष्टिकोनाने देखील महत्त्व आहे. वारी केल्यामुळे एकता, समर्पण आणि सामूहिक भावनांचा साक्षात्कार होतो. पंढरपूर वारीमध्ये लाखो भक्त एकत्र येऊन सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. सामूहिक पूजा, भजन संध्या आणि सार्वजनिक सेवा यामुळे समाजातील

Issue II, Vol. III
March 2025
Frequency: Monthly
Publication Format: Print
Subject: Multidisciplinary Subjects
Languages: Marathi, Hindi, English and Urdu

शब्दसंचय
SHABDSANCHAY
ISSN No : 3049-0731
Impact Factor - 3.161

एकता मजबूत होते. वरील सर्व बाबी वारीच्या सुंदरतेला आणखी एक रूप देते. वारी केल्यामुळे एक व्यक्ती केवळ आत्म्याची शुद्धता साधत नाही, तर समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलतो. वारी ही एक आध्यात्मिक यात्रा आहे जी केवळ भक्तिरंगाने भरलेली नसून, ती जीवनाचे एक सुंदर अनुभव साकारते. वारीच्या प्रवासात भक्त आपल्या जीवनाच्या उद्देशांचे विवर्तन करत जातो. त्याच वेळी वारी केल्यामुळे शरीर आणि मन दोन्ही शुद्ध होतात. प्रत्येक वारीच्या गंतव्यस्थळी दिलेले आशीर्वाद आणि पुजा भक्ताच्या जीवनाला एक नवीन दिशा देतात. त्यामुळे वारी केल्याने त्या जीवनाचे सुंदर आणि पवित्र रूप मिळवता येते व भक्त स्वरूपरंगात न्हाऊन जातो. तिथे

अवघा रंग एक झाला । रंगि रंगला श्रीरंग ॥

मी तूंपण गेले वायां । पाहतां पंढरीच्या राया ॥

नाही भेदाचें तें काम । पळोनि गेले क्रोध काम ॥

देही असोनि विदेही । सदा समाधिस्त पाही ॥

पाहते पाहणें गेले दूरी । ह्मणे चोखियाची महारी ॥

बंडोपंत दि. कुलकर्णी, सोलापूर

जिल्हा न्यायाधीश, पुणे